# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ फेब्रुवारी २००६
◆ वर्ष सहावे
◆ अंक दुसरा

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
अनिरुद्ध पाटील

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | ७ |
| **लीला दीक्षित - अध्यक्षीय भाषण** | ३६ |
| **पुस्तक परिचय** | |
| **ऑक्टोपसी** : अनु. जयमती दळवी | ४० |
| **अंतरिक्षाचा वेध :** सुधा रिसबूड | ४९ |
| **युद्धकथा :** निरंजन घाटे | ५८ |
| **शोधकथा इन्स्पेक्टर** | |
| **व्ही अनंतांच्या :** अनंत वाईकर | ६४ |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ६९ |
| **पुरस्कार** | ७४ |
| **श्रद्धांजली** | ८६ |
| **दीप योजना** | ९० |
| **बालनगरी** | ९५ |
| **वाचनालयांना आवाहन** | १०१ |

मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com
Website - mehtapublishinghouse.com

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षांची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## मराठीला तिसरे ज्ञानपीठ

कविवर्य विंदा करंदीकर यांचे मन:पूर्वक अभिनंदन. वय वर्षे ८८ असणाऱ्या आणि १९८१ साली 'विरुपिका' हा पाचवा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाल्यावर काव्यलेखनाच्या संन्यासाची घोषणा करणाऱ्या या मनस्वी प्रतिभावंताला मानाचा मुजरा!

ज्ञानपीठ पुरस्कार वीस वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मराठीच्या भाग्यस्थानी अवतरला; आणि अवघ्या मराठी मनाला नवे आत्मभान लाभले. कविवर्य विंदा करंदीकर यांची या पुरस्कारासाठी निवड झाली. नवकथा-नवकाव्य पर्वावर पुन्हा एकदा नव्याने मान्यतेची मोहोर उमटली. भाऊसाहेब खांडेकरांच्या रूपाने १९३५ ते १९५० या पिढीतील अग्रगण्य कादंबरीकाराचा सन्मान झाला. कविवर्य कुसुमाग्रजांद्वारे फडके-खांडेकरांच्या पुढच्या पिढीच्या लेखनकर्तृत्वाला मुजरा केला गेला. त्या पुढच्या पिढीचा गरिमा या तिसऱ्या ज्ञानपीठाने अधोरेखित केला असे म्हणता येईल. गंगाधर गाडगीळ, श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, विजय तेंडुलकर, पु. ल. देशपांडे, जी. ए. कुलकर्णी, इंदिरा संत प्रभृतींची नावे यासंदर्भात वेळोवेळी समोर येत होती. त्यातले काहीजण काळाच्या पडद्याआड गेले. आता मात्र विंदा करंदीकरांची सरशी झाली आणि या सर्वांच्या अग्रभागी ते विराजमान झाले असे म्हणायला हवे. काळाची कसोटी खूप वेळा निर्णायक ठरते हेच खरे! आता ज्ञानपीठासाठी पुढची किमान तीन-चार वर्षे तरी मराठीचा विचार होणार नाही. त्यामुळे आणखी काहीजण आपोआप मागे पडतील, तर काही नव्याने पुढे येतील. ज्ञानपीठासाठी आपण शक्यतो ज्येष्ठ लेखकाचाच विचार करतो; सत्तरी-पंचाहत्तरी ओलांडल्याशिवाय कोणालाही अशा पुरस्कारासाठी पात्र ठरवायला आपले मराठी समीक्षक मन राजी नसते; आणि ज्ञानपीठासारखे पुरस्कार हे नवीन काही लेखन करायला प्रेरणा प्रोत्साहन मिळावे म्हणून दिले जातच नाहीत. ते जीवनगौरवाच्या स्वरूपाचेच असतात; आणि आता तुम्ही नवे काही लिहिण्याच्या अवस्थेत नाही यावर शिक्कामोर्तब करण्यासाठीच हा पुरस्कार आहे असा जणू नि:संदिग्ध संदेशच त्याबरोबर दिला जातो.

'आता उरलो केवळ आशीर्वादापुरता' असे सरळ मानायला हरकत नसते. ज्ञानपीठाच्या देव्हाऱ्यात एकदा स्थानापन्न केले की भक्तांनी बांधलेली पूजा स्वीकारत राहणे आणि आशीर्वादासाठी हात उंचावून ठेवणे एवढेच काम उरते. साठोत्तरी पिढीतील साहित्यिकांनी आता आपल्यापैकी कोणाच्या गळ्यात ही माळ पडते



याची उत्सुकतेने वाट बघणेच क्रमप्राप्त!... परंतु खरे तर आता नव्वदीच्या दशकानंतरचे काही साहित्यिक ज्या झपाट्याने पुढे येत आहेत, त्यावरून ज्ञानपीठासाठी सहस्रचंद्रदर्शनाची किंवा अमृतमहोत्सवी वर्षापर्यंत थांबवण्याची वेळ पुढच्या पुरस्कारविजेत्यावर न आली तर त्यातही काही आश्चर्य वाटू नये. आजचे काही प्रतिभावंत मागच्यांच्या तुलनेत अधिक वेगाने दौड करत आहेत आणि त्यांना नजरेआड करण्याचा प्रयत्न स्थानिक निवड समित्यांनी कितीही आडमुठेपणाने केला तरी केंद्रिय समित्यांना तसे करून चालणार नाही अशी चिन्हे दिसत आहेत.

स्वेदगंगा (१९४९), मृद्‌गंध (१९५४), धृपद (१९५९), जातक (१९६८), विरूपिका (१९८१) या पाच संग्रहांतून काव्यलेखनाचे वेगवेगळे प्रयोग सादर करणाऱ्या विंदा करंदीकरांनी ''आता माझ्याजवळ सांगण्यासारखे नवे काही नाही, म्हणून मी काव्यलेखन संन्यास घेत आहे,'' असे जाहीर केले तेव्हा त्यांचे चाहते आणि मित्र चक्रावून गेले. काव्य हे अचानक स्फुरते; त्याला काळ-वेळ नसते; आणि जीवन हे वेगवेगळे अनुभव देत असते. त्यामुळे हाडाच्या कविलेखकाला लिहिण्यावाचून राहवत नाही हा सर्वसामान्य परिपाठ. प्रतिभेला आणि चिंतनाला वय नसते. उलट परिणत प्रगल्भ प्रज्ञेला नवनवे उन्मेष फुटत राहतात; साठीसत्तरीने नोकरी-पेशाला निवृत्तीचे ग्रहण लागते; पण लेखनप्रेरणेला तसे काही बंधन नसते. तेव्हा करंदीकरांनी असे स्वत:च्याच काव्यसंन्यासाचे फर्मान काढणे हे एक अतर्क्य अघटितच! आश्चर्य म्हणजे हे स्वहस्तेच स्वेच्छया जारी केलेले फर्मान; त्याची कठोर अंमलबजावणी करण्यात त्यांनी कसूर केली नाही. अपवाद दोन-तीन वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या 'अष्टदर्शने' या छोटेखानी संग्रहाचा! त्यात त्यांनी काही तत्त्वज्ञांच्या विचारसूत्रांचा अभंगवजा मागोवा घेतला आहे. १९८१ मध्ये 'अमृतानुभवाचे अर्वाचीनीकरण' त्यांनी प्रसिद्ध केले. त्याआधी फाऊस्ट (१९६५), राजा लियर (१९७४) आणि ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र (१९५७) हे तीन अनुवादही त्यांनी सिद्ध केले. बालकवितांचे त्यांचे संग्रहही गाजले. राणीचा बाग, एकदा काय झाले, सशाचे कान, टॉप, एटू लोकांचा देश, परी ग परी, अजबखाना, सर्कसवाला, पिशीमावशी, बागुलबोवा या त्यांच्या बालगीतांमधून एक खोडकर विक्षिप्त, कल्पक, खट्याळ बालमनाचे दर्शन घडते; सहज ओठी बसावे अशा लयदार परंपरागत लोकगीतांचे वा मंत्रांचे त्यातले अनुकरणही गमतीशीर ठरते. बालवाङ्‌मय हे बहुपेडी असते; मुलांना मुलांच्या पातळीवर ते आवाहन करते, आकर्षक वाटते तसेच मोठ्यांना मोठ्यांच्या पातळीवर ते स्पर्श करते; भिडते असे त्यांचे मत होते; त्यामुळे बालसाहित्याचा पाया हा अधिक अर्थपूर्ण होतो. बालसाहित्याच्या आकलनाला, समीक्षेला एक नवी खोली व दिशा त्यामुळे मिळाली.

विंदा करंदीकर यांच्या काव्यात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेकविध रंग सर्वदूर विखुरलेले आहेत. माधव जूलियन, मर्ढेकर यांचा आरंभी त्यांच्यावर प्रभाव होता. राजाराम कॉलेजमध्ये माधव ज्यूलियन हे त्यांना प्राध्यापक म्हणून लाभले. 'स्वेदगंगा'मध्ये त्यांच्या प्रभावाखालील कविता दिसते. सानेगुरुजींच्या काव्यातील

सामाजिक जाणीवही दिसते. त्याचबरोबर मुंबई विद्यापीठातून इंग्रजीत एम.ए. करण्याच्या निमित्ताने टी.एस. इलियट, जे. एम. हॉपकिन्स वगैरे नव्या धर्तीच्या प्रयोगशील काव्याचे संस्कारही त्यांच्यावर झाले. त्यातील चिंतनशीलता आणि अभिव्यक्तीचा धसमुसळेपणा, काहीसा संदर्भसंश्लिष्ट अवजडपणा त्यांच्या काव्यातही आला. रुइया कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम करताना दिलीप चित्रे वगैरे विद्यार्थी कवींशीही त्यांचा संपर्क आला आणि त्यांच्यावर करंदीकरांचा अमिट प्रभाव पडला... वसंत बापट, मंगेश पाडगावकर आणि विंदा करंदीकर या तिघांनी काव्यदर्शनाचे संयुक्त प्रयोग सादर करण्याचा उपक्रम आरंभला; आणि काव्यवाचन या प्रकाराला 'परफॉर्मिंग आर्ट'चे स्वरूप दिले. काव्यवाचनासाठी मानधनाची प्रथा त्यांनी रूढ केली; आणि प्रसंगी तिकिटे लावून काव्यवाचनाचे प्रयोग गावोगाव होत राहतात हे सिद्ध करून दाखवले. या तिघांनी मराठी कवितेत जसे प्रयोग केले तसेच काव्यवाचनालाही नवे रूप दिले. रसिकांना काव्यवाचनाची चटक लावली. कवी आणि श्रोते यांच्यातली दरी दूर केली.

स्वत: करंदीकरांनी काव्यलेखनात अनेक प्रयोग केले. मुक्तसुनीत, तालचित्रे, विरुपिका याद्वारे आपल्या सर्जनशीलतेला साजेसे आविष्काराचे मार्ग चोखाळत करंदीकरांनी स्वानुभूतीचे अंतरंग खुले करीत जाणीव प्रकट केली; त्याचबरोबर अंतिम जीवनरहस्याचे, विश्वात्मकतेचे कोडे उलगडण्याचाही ध्यास बाळगला. संतसाहित्याचा, विशेषत: अनुभवामृताचा त्यांचा व्यासंग जीवनाचे अंतिम सत्य व रहस्य जाणून घेण्याच्या दिशेने प्रगल्भ होत गेला. त्याचे अवडंबर मात्र त्यांनी माजवले नाही. आपला कोकणी रांगडेपणा आणि व्यवहारीपणा त्यांनी कधी टाकला नाही. खोटेपणा वा दंभ यांना थारा दिला नाही. १९९३ च्या सातारच्या साहित्य संमेलनात त्यांनी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना त्यावेळच्या एकूण परिस्थितीवर जे परखड भाष्य केले ते तत्कालीन, त्या घडीच्या संपूर्ण मराठी माणसाच्या अंतरीचेच हृद्गत व्यक्त करणारे होते. ते त्यावेळी म्हणाले होते, ''मातृभूमीचे विभाजन हे पहिले पाप. समान नागरी कायदा न करणे हे दुसरे पाप. महात्मा गांधींची हत्या हे तिसरे पाप. धर्माधिष्ठित अन्यायाला अभय देणारी झुंडीच्या दबावामुळे केलेली कायद्यातील दुरुस्ती हे चौथे पाप. आणि बाबरी मस्जीद पाडणे हे पाचवे पाप; परिणामत: स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवाला मातृभूमीच्या पायापुढे आजही आम्ही कोणता नजराणा घेऊन आलो आहोत?'' हे वक्तव्य त्यांनी केले तेव्हा त्यांच्या मुखातून आपल्या सुजाण नागरिकत्वाचाच तो आवाज होता असे प्रत्येकाला आतून जाणवले. हा आपल्या सर्वांच्याच विवेकबुद्धीचा जणू उद्गार होता. आपल्या या विवेकबुद्धीचा प्रतिनिधी म्हणूनच विंदांना मिळालेला हा ज्ञानपीठाचा मान महत्त्वपूर्ण आणि आत्मसन्मान वाढवणारा ठरतो.

विंदांना आमचा मानाचा पुनश्च मुजरा.





# साहित्यवार्ता

## * गुजराती साहित्य परिषद- ४३ वे संमेलन

राष्ट्रपिता महात्मा गांधी १९३६ मध्ये ज्या साहित्य परिषदेचे अध्यक्ष होते, त्या गुजराती साहित्य परिषदेच्या ४३ व्या संमेलनामध्ये उद्घाटक म्हणून या वर्षी प्रा. केशव मेश्राम यांना मान मिळाला.

बाळकृष्ण दत्तात्रय कालेलकर हे सुद्धा एकेकाळी या परिषदेचे अध्यक्ष होते. २३, २४, २५ डिसेंबर २००५ या दिवशी कांदिवली येथे ही परिषद भरली होती. बत्तीस वर्षांनंतर मुंबईतील प्रगती मित्र मंडळाला यजमानपदाची संधी मिळाली.

कवी, साहित्यिक व इतर असे एकूण १२०० जण या परिषदेला उपस्थित होते. गुजरात सरकारने ५० लाखांचे अनुदान दिले.

साहित्याचा गंध नसलेल्या हल्लीच्या तरुण पिढीलादेखील या परिषदेचा खूप मोलाचा उपयोग होणार आहे, असे मत अध्यक्ष अरुणभाई मेहता यांनी व्यक्त केले.

## * ८६ एकांकिकांचे प्रकाशन

''प्रेक्षकनिष्ठ होताना परिवर्तनवादी विचार मराठी रंगभूमीवरून निसटून गेला. प्रेक्षकनिष्ठ तडजोडी करताना संकुचित राहिलेल्या मराठी रंगभूमीवर दलित रंगभूमीने आघात केले; मात्र ती संपवण्याचा प्रयत्न कधीही केला नाही,'' असे प्रतिपादन नांदेड अ. भा. नाट्य संमेलनाचे अध्यक्ष दत्ता भगत यांनी केले.

आभा प्रकाशन आणि संवाद प्रतिष्ठानतर्फे ३७ लेखकांच्या ८६ एकांकिकांच्या संहितांचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. 'आभा' प्रकाशनाचे संस्थापक बाळासाहेब भाटे उपस्थित होते.

श्री. दत्ता भगत म्हणाले, ''जगण्याच्या गतिमान प्रवाहाचे प्रतिबिंब मराठी रंगभूमीवर अभावानेच आढळले. प्रेक्षकाला काय रुचेल, याचा विचार करताना अनेकदा तडजोडी केल्या गेल्या. मराठी रंगभूमीच्या या मर्यादांच्या विरोधात दलित रंगभूमी उभी राहिली.''

१९६० ते १९८० चा कालावधी मराठी रंगभूमीसाठी सुवर्णकाळ होता असे सांगून ते म्हणाले, ''रंगभूमी आणि समाजातील विविध घटक यांच्यामध्ये आढळणारी संवादाची भूमिका थांबल्याने सध्या मराठी रंगभूमीपासून प्रेक्षक दूर

जात आहे. करमणूकप्रधान नाटकांचा अतिरेक सुरू आहे. नाटकातून होणारे प्रबोधन थांबले, तर मराठी रंगभूमीचा प्रेक्षक संपेल. पुण्या-मुंबईकडील प्रेक्षकांनी नाटकांबद्दल अधिक जागरूक असायला हवे. प्रबोधनात्मक आणि विचारप्रवर्तक नाटकांच्या मागे प्रेक्षक उभे राहिले तर रंगभूमी समृद्ध होईल.'' सौ. भाटे यांनी प्रास्ताविक आणि मृणालिनी चितळे यांनी सूत्रसंचालन केले.

*** साहित्यप्रेमी भगिनी मंडळ- वय वर्षे ४०**

''मुलांना विश्व व त्यातील माणुसकीचे भान येण्यासाठी बालसाहित्याची गरज आहे,'' असे मत अखिल भारतीय बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा लीला दीक्षित यांनी पुणे येथे साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या ४० व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित मेळाव्यात व्यक्त केले. लेखक आनंद अंतरकर, मंडळाच्या अध्यक्ष डॉ. मंदा खांडगे, विश्वस्त सुमन बेहेरे आदी या वेळी उपस्थित होत्या.

लीला दीक्षित म्हणाल्या, ''सर्व कलांचा निरामय आनंद मुलांपर्यंत पोहोचण्यासाठी बालसाहित्य निर्माण झाले पाहिजे. चित्रकला, रंगभूमी, चित्रपट या सर्वच माध्यमातून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करायला हवेत.''

मंडळातर्फे ज्योत्स्ना आफळे, शुभदा साने, डॉ. सुमन नवलकर, वंदना पोंक्षे, भारती पांडे, माणिक खेर, माणिक श्रोत्री यांना विविध प्रकारच्या लिखाणाबद्दल पुरस्कार देण्यात आले. मंडळातर्फे दिला जाणारा 'मालतीबाई दांडेकर जीवन गौरव पुरस्कार' डॉ. विजया राजाध्यक्ष यांना जाहीर करण्यात आला.

*** 'सकाळ ब्लॉग'**

बदलत्या जगातील संवादाचे माध्यम म्हणून प्रचलित होत असलेल्या 'ब्लॉग' या सेवेस 'सकाळ'ने एक जानेवारीपासून सुरुवात केली. इंटरनेटच्या माध्यमातून असंख्य वाचकांची विविध विषयांवरील मते जाणून घेणे, त्यांच्याशी नियमित संवाद साधणे आणि त्यांच्या मतांना योग्य न्याय देणे, हे 'सकाळ ब्लॉग'चे मुख्य उद्दिष्ट आहे.

काळाच्या सोबत राहून आवश्यक त्या ठिकाणी अत्याधुनिक तंत्रज्ञानाची आणि नव्या माध्यम साधनांची मदत घेण्यावर 'सकाळ'चा भर असतो. त्यातूनच 'गुगल'च्या 'ब्लॉगर डॉट कॉम' या 'ब्लॉग होस्टिंग' वेबसाईटच्या आधारे 'सकाळ ब्लॉग' सुरू करण्यात आला आहे.

http://sakaalblog.blogspot.com या वेबसाईटवर जाऊन 'कॉमेंट्स'वर क्लिक करता येईल.

'पोस्ट अ कॉमेंट' या सदरात आपले मत, तुमच्याकडील माहिती किंवा एखादी समस्या लिहून 'पोस्ट' करू शकता. एखाद्या विषयावरील चर्चेत मत मांडून त्यात तुम्ही सहभागीही होऊ शकता.



*** 'मौनाची भाषांतरे'ची चौथी आवृत्ती**

युवा पिढीचा कवी संदीप खरे यांच्या 'मौनाची भाषांतरे' या काव्यसंग्रहाची चौथी आवृत्ती नुकतीच प्रकाशित झाली. कॉन्टिनेंटल प्रकाशनाकडून जानेवारीमध्ये हो कवितासंग्रह रसिकांसमोर आला. अभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते फेब्रुवारीमध्ये संग्रहाचे समारंभपूर्वक प्रकाशन झाले. मार्चमध्ये दुसरी आवृत्ती आणि आता डिसेंबरमध्ये चौथी आवृत्ती प्रकाशित झाली.

*** मराठीतील संदर्भ ग्रंथांच्या अभ्यासाची गरज : पुरके**

''मराठी भाषेच्या संवर्धनासाठी या भाषेतील संदर्भ ग्रंथांच्या विस्तृत अभ्यासाची आवश्यकता आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये मराठी भाषा जागतिक पातळीवर पोहोचण्यासाठी मराठीबरोबर इतर भाषांचाही अभ्यास होणे गरजेचे आहे,'' असे मत शालेय शिक्षणमंत्री वसंत पुरके यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक संघ, पुणे जिल्हा मराठी माध्यमिक शिक्षक संघ, पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ आणि माईर्स एमआयटी संस्थेचे श्री संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय यांनी आयोजित केलेल्या मराठी विषयाच्या कृतिसत्राचा समारोप त्यांच्या हस्ते झाला. एमआयटी संस्थेचे अध्यक्ष भास्करराव आव्हाड अध्यक्षस्थानी होते. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष वसंत काळपांडे, संयुक्त मुख्याध्यापक महामंडळाचे अध्यक्ष रावसाहेब आवारी, विश्वनाथ कराड, राज्य मराठी अध्यापक संघाचे अध्यक्ष विजयकुमार लांडगे आदी या वेळी उपस्थित होते.

*** 'मुंगीची सावली'चे प्रकाशन**

''वेश्या वस्तीत चहाचे कप फिरविणारा, थिएटरमध्ये गाण्याची पुस्तके विकणारा, सायकलवरून चित्रपटाची रिळे पोहोचविणारा याकूब सईद; या 'पोरा'चा प्रवास अभिमान बाळगावा आणि आदर्श मानावा असाच आहे,'' अशा शब्दांत याकूब सईद यांच्या कर्तृत्वाचे कौतुक प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर यांनी केले.

श्री. सईद यांनी लिहिलेल्या 'मुंगीची सावली' या पुस्तकाचे प्रकाशन करताना ते बोलत होते. उत्कर्ष प्रकाशनने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. श्री. सईद यांचे ज्येष्ठ सहकारी वि. अ. जोशी, 'उत्कर्ष'चे प्रकाशक सु. वा. जोशी, निवेदक सुधीर गाडगीळ व्यासपीठावर उपस्थित होते.

दूरदर्शनवरच्या 'हास-परिहास' मालिकेद्वारा बबन प्रभू आणि याकूब सईद यांची झालेली ओळख कोणताही रसिक विसरणार नाही, असा उल्लेख नाना पाटेकर यांनी केला. या कर्तृत्वाची ओळख पुस्तकापुरती मर्यादित न राहता ती रजत पडद्यावर झळकावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

राज कपूर, देव आनंद, मोतीलाल, भगवानदादा, साधू वासवानी, बाबाजान यांचा सहवास मिळाल्याने जीवन कृतार्थ झाल्याचे श्री. सईद यांनी सांगितले. शिस्त, मेहनत आणि जिद्दीमुळे माझे जीवन मुंगीसारखेच झाल्याने पुस्तकाला नावही तसेच दिल्याचा खुलासा त्यांनी केला.

*** संभाजी महाराज समाधिस्थळासाठी एक कोटीचा आराखडा**

वढू बुद्रुक (ता. शिरूर) येथील संभाजी महाराजांच्या समाधिस्थळाच्या विकासासाठी जिल्हा परिषदेने एक कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार केला आहे, अशी माहिती जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब खैरे यांनी दिली.

राज्यशासनाच्या तीर्थक्षेत्र यादीत वढू बुद्रुक गावाचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेने विकास आराखडा तयार करून निधी उपलब्धतेसाठी शासनाला प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावात छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतिदिनी पहाटे गावातून निघणाऱ्या मूक पदयात्रेतील अंतर्गत रस्त्याच्या डांबरीकरणासाठी नऊ लाख रुपये, संरक्षण भिंतीसाठी आठ लाख ४० हजार, सांस्कृतिक भवनासाठी १२ लाख रुपये, बगीचा तयार करण्यासाठी ५ लाख ४० हजार रुपये, स्वच्छतागृहासाठी ६ लाख ४९ हजार रुपये, वाहनतळासाठी ७ लाख रुपये, भक्तनिवासासाठी २२ लाख रुपये, पाणीपुरवठा योजनेच्या विस्तारासाठी १६ लाख रुपये, विद्युतरोषणाईसाठी ६ लाख रुपये आदी योजनांचा समोवश असून, एकूण सुमारे १ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. संभाजी महाराजांच्या पराक्रमाला साजेसे वातावरण निर्माण करून महाराष्ट्रातून येथे येणाऱ्या शंभुभक्तांना सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. ही सर्व कामे जिल्हा परिषदेमार्फत केली जाणार आहेत. समाधिस्थळाच्या विकासासाठी शासन निधी उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासन जलसंपदामंत्री अजित पवार यांनी दिले.

*** साहित्य निर्मितीसाठी मासिके आवश्यक : भानू काळे**

''चांगल्या साहित्याच्या निर्मितीसाठी योग्य व्यासपीठ आवश्यक असते. उत्तम लेखक घडवण्यात आजवरच्या मासिकांचे कार्य मोलाचे असून, साहित्यनिर्मितीसाठी मासिके हे माध्यम अत्यंत प्रभावी आहे'' असे मत 'अंतर्नाद' मासिकाचे संपादक भानू काळे यांनी व्यक्त केले. साधना साप्ताहिकातर्फे आयोजित मासिक साहित्य चर्चेत ते बोलत होते. 'बदलता भारत' या त्यांच्या पुस्तकाविषयी मिलिंद जोशी आणि संतोष शेणई यांनी त्यांची मुलाखत घेतली.

ते म्हणाले, ''नवोदित लेखकांची आत्मनिष्ठा आणि आत्मभान डळमळीत झाल्याचे चित्र असून, साहित्य निर्मितीतील निष्ठा लोप पावत आहे. लेखनातून मिळणारी प्राप्ती आणि प्रसिद्धी मर्यादित असल्याने नवीन लेखक साहित्यनिर्मितीकडे



वळत नाही. देशातील सर्व भाषांमध्ये कमी-अधिक प्रमाणात हीच स्थिती आहे.''

समाजातील प्रत्येक व्यक्ती विकासाच्या वाटा शोधत असते. या विकासामुळे समाजातील दोन स्तरांमध्ये वाढणारी विषमता कमी होण्यासाठी 'नाही रे' वर्गाच्या मूलभूत गरजा भागवणे आवश्यक असून, विकासाच्या संधी त्यांच्यापर्यंत पोहोचायला हव्यात, असेही त्यांनी नमूद केले.

*** 'अरण्यवाचन'चे प्रकाशन**

''निसर्गातील अनेक गूढ गोष्टी अजून उकलायच्या आहेत. जंगल वाचताना मला ज्या गोष्टी दिसल्या- माहीत झाल्या, त्या मी 'अरण्यवाचन'मध्ये मांडल्या आहेत. जंगल अभ्यासणाऱ्यांना ही माहिती मार्गदर्शक ठरावी, हाच त्यामागे हेतू आहे,'' असे मनोगत निसर्गअभ्यासक व लेखक अतुल धामनकर यांनी व्यक्त केले.

श्री. धामनकर यांच्या 'अरण्यवाचन' पुस्तकाचे प्रकाशन 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर यांच्या हस्ते झाले. श्रीविद्या प्रकाशनाने हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. ज्येष्ठ वन्यजीव अभ्यासक डॉ. प्रकाश गोळे, डॉ. मिलिंद वाटवे आदी या वेळी उपस्थित होते.

श्री. धामनकर म्हणाले, ''मी जंगलात भटकायला- त्याचा अभ्यास करायला सुरुवात केली, तेव्हा मार्गदर्शनपर पुस्तके, माहिती मला उपलब्ध नव्हती. जी पुस्तके होती, ती इंग्रजीत; आणि त्यांच्या किमतीही अधिक होत्या. यामुळे अनेकदा लागलेला नाद सोडून दिला जातो. नव्या पिढीत अभ्यास करणाऱ्यांबाबत असे होऊ नये असे वाटत होते. मग मला मिळालेल्या माहितीचा या लोकांना उपयोग व्हावा, या विचारातून पुस्तक लिहिले. विविध गोष्टींची माहिती आधीच असेल, तर पक्का गृहपाठ करून निरीक्षणाला बाहेर पडता येते. वन्यप्राणी, जंगले धोक्यात असताना निरीक्षकांची चांगली फळी निर्माण होणे आणि जंगलाचे संरक्षण- संवर्धन होणे आवश्यक आहे.''

''चाळीसगावचे सर्पमित्र राजेश ठोंबरे, सर्पदंशावर संशोधन करणारे मुखेडचे डॉ. दिलीप उंडे आणि श्री. धामनकर यांच्यासारखे तरुण संशोधनाबरोबरच त्याच्या काटेकोर नोंदीही ठेवत आहेत. त्या पुढील संशोधनासाठी उपयोगी ठरणार आहेत. धामनकरांनी या पुस्तकात सोप्या भाषेत अरण्यवाचनासारखा विषय मांडला असून, याला संदर्भग्रंथाचे मूल्य आहे,'' अशा शब्दांत श्री. यमाजी मालकर यांनी धामनकरांचा गौरव केला.

*** विद्रोही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी आ. ह. साळुंखे**

सोलापूर येथे २८ व २९ जानेवारी २००६ रोजी होणाऱ्या विद्रोही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक, प्रसिद्ध विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांची निवड करण्यात आली आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे

सदस्य गोविंद पानसरे हे समारोपाला उपस्थित होते.

दर्जेदार संशोधन, प्राचीन वाङ्मयाचा गाढा अभ्यास आणि संवादी भाषाशैली व घणाघाती व्याख्याने यामुळे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आ. ह. साळुंखे यांनी स्थान मिळवले आहे.

'चांदण्यात भिजायचे राहून जाऊ नये म्हणून...' इत्यादी ५ ललित पुस्तकांचे लेखन त्यांनी केले आहे. 'जीवनाची लय वेदनेत' आणि 'अशी भेटत रहा तू' या दोन कवितासंग्रहांनी काव्यक्षेत्रात ठसा उमटवला आहे.

भारतीय इतिहासाचे अभ्यासक म्हणून प्रसिद्ध असलेल्या डॉ. साळुंखे यांचे 'आस्तिक शिरोमणी चार्वाक', 'विद्रोही तुकाराम', 'मनुस्मृती समर्थकांची संस्कृती', 'हिंदू संस्कृती आणि स्त्री', 'बळीवंश' इत्यादी १३ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. 'महात्मा फुले आणि धर्म', 'वैदिक धर्मसूत्रे आणि बहुजनांची गुलामगिरी', 'आता आमच्या घडावर आमचाच डोळा असेल' 'शीख धर्मातील धर्मनिरपेक्ष जाणिवा' व 'नागार्जुन' अशी पुस्तके त्यांच्या नावांवर जमा आहेत.

### * अरुंधती रॉय यांचा अकादमी पुरस्कार घेण्यास नकार

भारताची अमेरिकेबरोबरची सलगी व उदारवादी आर्थिक धोरण याविरोधात ख्यातनाम लेखिका व समाजसेविका अरुंधती रॉय यांनी साहित्य अकादमीचा पुरस्कार स्वीकारायचा नाही, असे जाहीर केले आहे.

अकादमीला पत्र पाठवून अरुंधती रॉय यांनी आपला निर्णय कळविला आहे. त्या म्हणतात– अफगाणिस्तान व इराकवरील अमेरिकी कारवाईबाबत भारताने मौन पाळले आहे. उदार आर्थिक धोरण राबविण्यासाठी हिंसक मार्गाचाही अवलंब केला जात आहे. त्याचा निषेध म्हणूनच आपण हा पुरस्कार स्वीकारणार नाही.

अरुंधती यांच्या 'द अलजेब्रा ऑफ इन्फायनाईट जस्टिस' या पुस्तकाला सर्वोत्कृष्ट साहित्यिक पुरस्कार देण्याची घोषणा अकादमीने अलीकडेच केली होती. या पुरस्काराबद्दल अरुंधती यांनी अकादमीचे आभार मानलेले आहेत.

या पुस्तकात १९९८ ते २००१ दरम्यान लिहिलेले लेख संपादित करण्यात आले आहेत. मोठी धरणे, अणुबॉम्ब, राज्यांतील लष्कराची तैनाती, आर्थिक धोरणे इत्यादी विषयांचा त्यात समावेश आहे. अरुंधती रॉय यांच्या 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' या कादंबरीला बूकर पुरस्कार मिळाला होता. शेतकरी व आदिवासींच्या हक्कांसाठीही त्या लढा देत आहेत.

### * औदुंबर साहित्य संमेलन

कृष्णाकाठचा निसर्गरम्य परिसर आणि श्री दत्तगुरूंचे तीर्थक्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या– श्री क्षेत्र औदुंबर येथे शनिवारी सदानंद साहित्य मंडळाचे ६३' वे ग्रामीण साहित्य संमेलन अत्यंत उत्साही वातावरणात पार पडले. कवी सुधांशू मात्र



वार्धक्यामुळे यावेळी उपस्थित राहू शकले नाहीत. सुधांशू यांच्या उपस्थितीत आजवर ६२ साहित्य संमेलने झाली. सदानंद साहित्य मंडळाचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत.

दरवर्षी मकरसंक्रांतीला हे साहित्य संमेलन भरते. मराठीतील दिग्गज साहित्यिक, कवी यांनी आतापर्यंत येथे आपली हजेरी लावली आहे.

यावेळच्या संमेलनाचे अध्यक्ष होते ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक. 'रसिक आणि साहित्यिक एकत्र येतात तेव्हा प्रतिभेचा खरा उत्सव सुरू होतो. अशा लहान-लहान साहित्य संमेलनातून हा उत्सव झाला तर प्रतिभेला खऱ्या अर्थाने चांगले स्थान प्राप्त होईल. प्रतिभेचा पाठलाग व बुद्धीची मशागत केल्यास सरस साहित्य निर्माण होते. त्याला जात, धर्म, पंथ कशाचेही बंधन नसते. परमेश्वराने प्रत्येकाला जन्मत:च प्रज्ञा व प्रतिभा दिलेली असते. प्रज्ञेने ऐहिक, भौतिक विकास साधता येतो. व्यंकटेश माडगूळकरांनी लिहिलेला 'माणदेश' माझ्यासारख्या कोकणी माणसालाही जवळचा वाटला. जयंत नारळीकरांना जे सुचले तो प्रज्ञेचा आविष्कार आहे. प्रज्ञा व प्रतिभा एकत्र आल्यास तो दुग्धशर्करा योग असतो,' असे कर्णिक यावेळी म्हणाले. इंग्रजांपेक्षा भारतीयांची प्रतिभा मोठी होती, पण आपल्याकडे साहित्यिकांची कदर होत नाही. प्रगतीमुळे घरातील दिवाणखान्यात सर्व भौतिक सुखे दिसतील, पण घरात ग्रंथ नसतील तर काय उपयोग? शिक्षक झालो, अनेक पदव्या घेतल्या म्हणजे ज्ञानी झालो असे नाही. इतके शिकूनही जर पसायदानातील एखादी ओळ येत नसेल तर त्याचा काय उपयोग? नवोदितांनी प्रसिद्धीमागे न लागता प्रतिभेप्रमाणे लिहीत रहावे, असे त्यांनी सांगितले.

श्रीनिवास कुलकर्णी यांनी स्वागत केले. समीक्षक म. द. हातकणंगलेकर यांनी कर्णिक यांचा परिचय करून दिला. कर्णिक यांच्या हस्ते नाशिकचे संजय चौधरी यांना यंदाचा कवी सुधांशू पुरस्कार (माझं इवलं हस्ताक्षर... या कविता संग्रहासाठी), तर मिरजेच्या ऋचा वाघमारे यांना सुरेश कुलकर्णी स्मृती पुरस्कार (आरंभ... या कविता संग्रहासाठी) देण्यात आला. सदानंद साहित्य मंडळाच्यवतीने औदुंबर येथे भव्य ग्रंथालय उभे करण्याची घोषणा यावेळी करण्यात आली.

### * मराठी साहित्यविश्वात सक्सेस स्टोरीज्!

उत्तम साहित्यात समाजमनाचे प्रतिबिंब जसे लख्ख उमटते तसेच खपणाऱ्या साहित्यकृतींवरूनही त्या समाजाची नाडी ओळखता येते.

'डिटरमिनेशन', 'डेडिकेशन' आणि 'डिसिप्लीन' या तीन 'डीं'चा मंत्र देणारे 'ऑर्किड'वाले विठ्ठल कामत काय किंवा मॅट्रिकला ५५ टक्के मार्क मिळवूनही हिंमत न हारता अमेरिकेत यशस्वी उद्योजक म्हणून नाव मिळवणारे श्रीनिवास ठाणेकर काय, हे रुढार्थाने साहित्यिक नव्हेत. पण आज कुठल्याही बड्या साहित्यिकाच्या पुस्तकांना मागे टाकत या दोघांची आत्मचरित्रात्मक पुस्तके मराठीत

बेस्टसेलर्स ठरली आहेत. कामतांच्या 'इडली'च्या दोन वर्षांत अकरा तर ठाणेकरांच्या 'इच्छे'च्या दहा महिन्यांत सहा आवृत्त्या संपल्या. यापूर्वी इतक्या कमी अवधीत एवढा खप फक्त निवडक पाककला व धार्मिक पुस्तकांचा झाला आहे.

आजच्या तरुणांमध्ये आणि पालकांमध्येही वाढलेला करिअर कॉन्शसनेस हा या पुस्तकांच्या लोकप्रियतेचा मूलाधार ठरला आहे, असे मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता यांनी सांगितले. मेहता पब्लिशिंगची 'बिझनेस लिजंड्स', 'बिझनेस महाराजे' आणि 'थॉट लीडर्स' ही सक्सेस स्टोऱ्या सांगणारी पुस्तकेही हातोहात संपताहेत. ग्रंथालीने प्रकाशित केलेले डॉ. रामाणी यांच्या यशोभरारीचे 'ताठ कणा', डॉ. अब्दुल कलाम यांचे 'अग्निपंख', कॅम्लिनच्या दांडेकरांचे 'उंटावरचा प्रवास' या पुस्तकांचाही वाचकवर्ग मोठा आहे. मराठी साहित्यातला हा नवा ट्रेंड ओळखून अनेक प्रकाशकांनी त्या दिशेने पावले वळवली आहेत.

## * पद्मगंधा साहित्य संमेलन

वाचनसंस्कृती निश्चितच वाढत आहे. मात्र या वाचन वाढीची दिशा कोणती, हा खरा मुद्दा आहे. संस्कृती समृद्ध करण्यासाठी सर्वांगीण वाचनाची आणि माणुसकी जपणारे वाचन करण्याची आवश्यकता आहे, असे मत 'सकाळ'चे संपादक (साहित्य, कला, संस्कृती) सुरेशचंद्र पाध्ये यांनी व्यक्त केले.

नाटककार दिवंगत राम गणेश गडकरी यांच्या वास्तव्याने पावन झालेल्या नागपूर जिल्ह्यातील सावनेर नगरीत अखिल भारतीय पद्मगंधा मराठी साहित्य संमेलनात 'वाचनसंस्कृती आणि प्रसारमाध्यमे' या विषयावर परिसंवाद झाला. वृत्तपत्रांतून वाचनसंस्कृतीच्या वाढीस मोठी हातभार लागत आहे. वृत्तपत्रात एखादी चूक आढळल्यास वाचक तातडीने पत्र पाठवून विचारणा करतात. मात्र 'टीव्ही' वाहिन्यांवरून दाखविल्या जाणाऱ्या धिंगाण्याबाबत सुजाण प्रेक्षक त्यांच्याकडे विचारणा का करीत नाहीत? हल्ली 'महाराज' नावाचे नवेच माध्यम उदयास आले असून लाखो लोकांना त्याने भुरळ घातली आहे. मात्र, भोंदू महाराजांच्या भाषणाने समाजाला प्रगतीकडे नेणारी दिशा मिळणार नाही, अशी टीका त्यांनी केली. मराठी नाटक, चित्रपट ही समाजाला प्रबोधन करणारी उत्तम साधने आहेत. दुर्दैवाने आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत आहोत, अशी खंत व्यक्त केली. डॉ. सुभाष सावरकर म्हणाले, जनसंवाद अधिक निरोगी होण्याची गरज आहे. अडाणी लोकांचे प्रमाण अद्याप कमी झाले नसून वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी त्यांना शिक्षित करणे ही काळाची गरज आहे. आजकाल लेखक स्वत:साठी किंवा समाजासाठी लिहीतच नाही. ते केवळ समीक्षकांसाठी लिहितो याचा विपरीत परिणाम वाचनसंस्कृतीवर होतो.



## * 'करमणूक संस्कृती'मुळे संवेदनशीलतेचा लोप

'आजची संस्कृती ही 'करमणूक संस्कृती' झाली आहे. करमणूक संस्कृतीमुळे संवेदनशीलता नष्ट झाली,' अशी खंत ज्येष्ठ समीक्षक, नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी प्रमुख डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी व्यक्त केली.

सातारा जिल्हा ग्रंथ महोत्सवाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा हेमलता ननावरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जगदीश पाटील, युनायटेड वेस्टर्न बँकेचे महाव्यवस्थापक अशोक कुलकर्णी, महाराष्ट्र बँकेचे शशिकांत वझे उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, 'भ्रमणदूरध्वनीमुळे आज एकमेकांशी प्रत्यक्ष बोलणे कठीण झाले आहे. हा भ्रमण दूरध्वनी नसून संचार ध्वनी आहे. जग जवळ आले मात्र माणसे एकमेकांपासून दूर गेली. आपल्या अवतीभवती काय चालले आहे, याचे काहीही देणे-घेणे राहिलेले नाही. व्यक्तींमध्ये आत्मदुरावा निर्माण होत आहे. आपण स्वत:पासूनच दूर जात आहोत. आजची संस्कृती 'करमणूक संस्कृती' बनली आहे. मालिका, वारंवार दाखविले जाणारे चित्रपट यामध्ये सर्वजण हरवून बसले आहेत. दिवसभर दूरदर्शन संचासमोर बसणे योग्य नाही. घरात मिठाईचे दुकान असले म्हणून कोणी दिवसभर मिठाई खात नाही. चिंतनाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष होत आहे. करमणूक संस्कृतीने संवेदनशीलता नष्ट केली आहे. पंचसंवेदना मूल्यभाव नष्ट झाला आहे. व्यक्तीला उपयोग, उपभोग व स्वार्थाची चांगली माहिती आहे.'

ते म्हणाले, 'माणूस माणूसपण हरवत आहे. अशावेळी सुख-सुविधा, तंत्रज्ञान कशासाठी असा प्रश्न पडतो. अशा परिस्थितीत ग्रंथ उपयोगी पडतात. माझ्याकडे अनेक ग्रंथ आहेत. ते मी कोणाला देत नाही कारण पुस्तके ही सर्वसामान्यांना नगण्य वाटतात, त्यामुळे ती परत केली जात नाहीत. आपण जीवनाचा मूल्यभाव, संवेदनशीलता गमावून बसलो आहोत. लेखकाचा 'लेखकराव' झालेला चालेल मात्र वाचकाचा 'वाचकराव' होऊ नये. दोनचार कथा लिहिल्यावर प्रत्येकाला मोठे साहित्यिक झाल्यासारखे वाटणे म्हणजे 'लेखकराव' होणे आहे. तसेच उगीचच 'फॅशन' म्हणून वाचणारे म्हणजे 'वाचकराव' होत, त्यामुळे काहीही लिहिणारे तयार झाले तरी चालतील; परंतु काहीही वाचणारे चालणार नाहीत. काय वाचावे, हे समजले पाहिजे. वाईट वाचल्यावरच चांगल्या साहित्याची किंमत समजेल, त्यामुळे केवळ 'वाचकराव' बनणे योग्य नाही. चांगल्या ग्रंथांची ओळख साहित्यिकांनी, प्रकाशकांनी सामान्य जनतेला करून दिली पाहिजे. ग्रंथामुळेच संवेदनशीलता जागृत होते. ग्रंथ विकत घ्यावा, हे सांगणारा मी नसून ग्रंथ आचरणात आणावा, असे माझे मत आहे. व्यक्तिमत्त्व विकासाला निर्मितीचे कोंब फुटावेत, यासाठी

तरी ग्रंथ वाचले पाहिजेत.'

ग्रंथ महोत्सवाचे स्वागताध्यक्ष शंकर सारडा यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी कार्यवाह शिरीष चिटणीस, उपाध्यक्ष वि. ना. लांडगे, कोषाध्यक्ष प्रदीप कांबळे, साहेबराव होळ, अन्य पदाधिकारी उपस्थित होते. कार्यवाह प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांनी आभार मानले.

### * पोटभरू पुस्तके लिहिणाऱ्यांनी संभाजीराजांना बदनाम केले

छत्रपती संभाजी हे शूर लढवय्ये होते. त्यांनी हिंदवी स्वराज्याचा विस्तार महाराष्ट्राबाहेरही केला होता. त्यांचा नाटककारांनी साहित्यात चुकीचा इतिहास रंगवला. शिवाय ज्यांनी पोटभरू पुस्तके लिहिली, त्यांनी संभाजीराजांना बदनाम केले अशी खंत 'पानिपत'कार विश्वास पाटील यांनी व्यक्त केली.

सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सवाच्या समारोप कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा होते तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून शिवकृपा ग्रुपचे गोरखनाथ चव्हाण, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जगदीश पाटील उपस्थित होते.

विश्वास पाटील यांनी आपल्या भाषणात छत्रपती संभाजीराजांचा इतिहास पुराव्यासह उपस्थितांच्या डोळ्यासमोर उभा केला. छत्रपती संभाजीराजांवरील कादंबरी लिहिताना आलेल्या अनुभूतीविषयी माहिती दिली. छत्रपती शिवरायांच्या निधनानंतर आठ वर्षे औरंगजेबाशी लढणारा हा बलदंड पुरुष याचा भूमीत बदनाम व्हावा, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे, असे सांगून पाटील म्हणाले, संभाजीराजांनी तामीळनाडू, गोवा, या ठिकाणचेही किल्ले जिंकले होते. पोर्तुगीजांना तर त्यांची मोठी दहशत होती. याविषयी अनेक पुरावे उपलब्ध आहेत. छत्रपती संभाजी म्हणजे पराक्रमाचा इतिहास नव्हता तर त्यांनी भोगलेल्या दैन्याचा आणि दु:खाचाही इतिहास होता. छत्रपती शिवरायांजवळ असणारी स्वामीनिष्ठ माणसे संभाजीराजांजवळही होती. त्यांची पारख करून त्यांना मोठ्या मानाने त्यांनी वागवले, असे सांगून विश्वास पाटील म्हणाले, अनेकवेळा संभाजी महाराजांबाबत मद्यपी, स्त्री लंपट असे चित्र रंगवले गेले. ज्यांनी पोटभरू पुस्तके लिहिली, त्यांनीच त्यांना बदनाम केले. त्यांच्यावर नजरकैदेत ठेवल्याचेही चुकीचे आरोप झाले.

सह्याद्रीच्या मदतीने संभाजीराजांनी आपल्या साठ हजार सैन्यासह औरंगजेबाशी लढा दिला. आठ वर्षांत औरंगजेब सह्याद्रीजवळ येऊ शकला नाही. संभाजीराजांचे युद्धनेतृत्व अलौकिक असेच होते. चुकून ठार झालेल्या सरदारांसाठीही अश्रू ढाळणारा संभाजीराजा हा एक वेगळ्या धाटणीचा राजा होता, असे सांगून विश्वास पाटील म्हणाले, युरोपातील अलेक्झांडर दि ग्रेट राजासारखेच त्यांचे नेतृत्व होते. पुढील पिढीला हा खरा इतिहास समजणे आवश्यक आहे.



छत्रपती शिवरायांनंतर साडेतीनशे किल्ले संभाजीराजांनी सांभाळून ठेवले. एकही किल्ला औरंगजेबाला जिंकू दिला नाही, असे सांगून विश्वास पाटील म्हणाले, नदीवर सिंचनाचा प्रयोग राबविणारा, गुलामगिरी नाकारणारा, स्त्रियांना मानाचा दर्जा देणारा, शिक्षण व वारकऱ्यांच्या सोयी पाहणारा संभाजीराजा हा खराखुरा न्यायी राजा होता. त्यांनी आपल्या आयुष्यात ११० लढाया खेळल्या. परंतु अखेर वतनासाठी त्यांचा घात झाला.

छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजीराजे यांना महाराष्ट्रातील बहुजन समाजानेच मोठे केले असून छत्रपतींच्या सुनाही इतिहासाच्या अभ्यासाचा स्रोत ठरतील, असे पाटील यांनी सांगितले. यावेळी शंकर सारडा, गोरखनाथ चव्हाण, शिक्षणाधिकारी गंगाधर म्हमाणे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात सांस्कृतिक कार्यक्रमातील विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. श्रीमती सुमनताई शिवाजीराव चव्हाण यांचा विश्वास पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

ग्रंथ महोत्सव समितीचे कार्यवाह शिरीष चिटणीस यांनी प्रास्ताविक केले. डॉ. यशवंत पाटणे यांनी ग्रंथ महोत्सवाचा आढावा घेतला. राजकुमार निकम यांनी आभार मानले.

### * दोन हजार अर्धवेळ ग्रंथपाल पूर्णवेळ होण्याच्या प्रतीक्षेत!

गेल्या अनेक वर्षांपासून मंत्री आणि राजकारणी नेत्यांच्या आश्वासनानंतरही सुमारे दोन हजार अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्ण वेळ करण्याबाबत कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही.

पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा ग्रंथपाल संघाचे अध्यक्ष सिद्धनाथ पवार म्हणाले, ''शालेय शिक्षण विभाग आणि वित्त विभाग यांनी शिफारस करूनदेखील अद्याप ९९१ अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याचा शासनीय आदेश निघालेला नाही. अनेक वर्षांपासून अर्धवेळ ग्रंथपाल म्हणून कार्यरत असणाऱ्यांच्या तीन हजार वेतनश्रेणीत वाढ झालेली नाही.''

सध्या राज्यातील सुमारे १५ हजार माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये चार हजार ग्रंथपाल पदे असून, त्यातील केवळ अठराशे पदांवर पूर्णवेळ ग्रंथपालांची नेमणूक करण्यात आली आहे. उर्वरित २२०० पैकी काही जणांनी राजीनामा दिला आहे.

कृषिमंत्री शरद पवार यांच्यापासून ते अनेक आमदार आणि लोकप्रतिनिधींनी अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याबाबत अनुकूलता दर्शवूनही शासन निर्णय घेत नसल्याने 'एम.लिब.' पदवी घेतलेल्यांनाही अत्यल्प पगारावर काम करावे लागत आहे.

## * डॉक्टरांचे साहित्य संमेलन १२ मार्च रोजी मुंबईत!

रुग्ण, इंजेक्शन्स, आयसीयू, इमर्जन्सी कॉल्स, औषधे आदींच्या विश्वात कायम डुंबलेल्या डॉक्टर मंडळींनाही साहित्याची उत्तम जाण असते. ती आवड अनेक डॉक्टर रसिकतेने जपतात. याच साहित्यप्रेमी 'डॉक्टरांचे दुसरे मराठी साहित्य संमेलन' १२ मार्च रोजी माटुंग्यातील यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुलात भरणार आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या मुंबई शाखेने यासाठी पुढाकार घेतला आहे.

साहित्यात रंगून जाणाऱ्या डॉक्टरांना असे संमेलन म्हणजे आगळीच संधी असते. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सर्व शाखांनी सभासदांना संमेलनाची माहिती द्यावी, असेही आवाहन आहे. संपर्क : डॉ. प्रकाश कवळी, २४३६२१२१, २४४५२८२८. कार्यालय : आयएमए हाऊस, महालक्ष्मी रेसकोर्सनजीक २४९२३२५५, २४९२५५१०.

## * वाचन संस्कृती विकसित व्हावी

''शाळेतून जे शिक्षण मिळत नाही, ते पुस्तकांमधून मिळते. वाचनामुळे माणूस घडतो. माझ्यातील 'कलावंत'देखील वाचनामुळेच घडला आहे. त्यामुळे वाचन संस्कृतीची चळवळ विकसित करण्याची गरज आहे,'' असे मत प्रसिद्ध अभिनेता मकरंद अनासपुरे यांनी परभणीला मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचा समारोप करताना व्यक्त केले.

श्री. अनासपुरे म्हणाले, ''ग्रंथासारखा दुसरा मित्र नाही. म्हणूनच प्रत्येकाने या मित्रांच्या संगतीत जास्तीतजास्त वेळ घालविण्याची (म्हणजे वाचनाची) गरज आहे,'' वीणा गवाणकर यांचे 'एक होता कार्व्हर', सआदत हसन मन्टो यांचे 'दस्तऐवज', सदानंद देशमुख यांची 'बारोमास' विश्वास पाटील यांची 'पानिपत' आणि 'झाडाझडती' या पुस्तकांचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला व आपल्यातील कलावंत घडविण्याचे फार मोठे कार्य या ग्रंथांनीच केले असल्याचे सांगितले.

प्रारंभी अ. भा. बालकुमार साहित्य संमेलन संस्थेचे अध्यक्ष शंकर सारडा यांनी ठरावांचे वाचन केले. दत्ता श्री. टोळ, आमदार संजय जाधव, खासदार तुकाराम रेंगे, स्वागताध्यक्ष फौजिया खान यांची भाषणे झाली.

ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त मराठी कवी विंदा करंदीकर यांचे अभिनंदन करणारा ठराव मंजूर करण्यात आला. याशिवाय विविध अकरा ठरावही मंजूर करीत आले आणि बालकुमार संमेलनाचे सूप वाजले. अनासपुरे यांचे भाषण ऐकण्यासाठी मुलांनी व्यासपीठाच्या चहूबाजूंनी गराडा घातला होता. त्र्यं. वि. सरदेशमुख, वसंत तुळजापूरकर, शैला सायनकर, द्वा. भ. कर्णिक, म. मा. भोसले, स. मा. गर्गे आदी साहित्यिकांच्या निधनाबद्दल शोक प्रकट करणारा ठराव सुरुवातीला मांडण्यात आला. या संमेलनाच्या स्वागताध्यक्षा फौजिया खान, संमेलनाचे सर्व पदाधिकारी, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षण संस्था या सर्वांचे अभिनंदन करणारा ठरावही या वेळी मांडण्यात आला. संमेलनासाठी दोन लाख रुपयाची मदत करणाऱ्या राज्य सरकारबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत असतानाच या संमेलनासाठी सरकारने दहा लाख रुपयांची मदत देण्याची विनंतीही एका ठरावाद्वारे करण्यात आली. अनेक विदेशी प्रकाशन संस्था उत्तम अनुवाद मराठीत आणीत असल्याबद्दल त्या संस्थांचे अभिनंदन करीत असतानाच स्वतंत्र मराठी पुस्तकेही प्रकाशित करावी अशी विनंती ठरावाद्वारे त्यांनी केली.

## * ज्ञान व संस्कृतीचे संचित

''मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती हे पुस्तक विसाव्या शतकापर्यंतचे ज्ञान, संस्कृती, विचारांचे संचित कवेत घेणारे व एकविसाव्या शतकातील संस्कृतीचा रस्ता दाखविणारे आहे,'' असे प्रतिपादन प्रा. रा. ग. जाधव यांनी केले.

पॉप्युलर साहित्य साधनाने आयोजिलेल्या या कार्यक्रमात प्रा. वसंत डहाके, विलास खोले, प्रा. सुमन बेलवलकर उपस्थित होते.

प्रा. जाधव म्हणाले, ''मराठी साहित्य परंपरेतील अनेक प्रश्नांना उत्तरे देण्याचा प्रयत्न पुस्तकात आहे. वाचकांना सोपे वाचायची सवय लागली असून या पुस्तकापासून अवघड लिखाणही वाचण्याची सवय करून घ्यावी. इतिहासाचे अभ्यासक, विचारवंत यांच्यासाठी पुस्तक उत्तम आहे.''

श्री. खोले म्हणाले, ''जागतिक पातळीवरील नवनवीन विचार, मराठी परंपरा पुस्तकात साकल्याने मांडली आहे. इतिहास, संस्कृती, साहित्य यांचा परस्परसंबंध स्पष्ट केला आहे.'' मराठीचा अभ्यास कसा करायचा, हे समजून घेण्यासाठी पुस्तक उपयुक्त असल्याचे सुमन बेलवलकर यांनी सांगितले. पॉप्युलरचे रामदास भटकळ यांनी प्रास्ताविक केले. नरेंद्र दाभोलकर यांनी आभार मानले.

## * 'हनुमान'ची पात्ररचना

''कलाकृती आकर्षक झाली, तर बॉक्स ऑफिसवर हिट ठरणार असल्याने कलाकृती ही आमच्यासाठी एकप्रकारे रेसिपीच असते.'' दीड तपाची खडतर तपश्चर्या करून फाइन आर्टिस्ट ते ॲनिमेटर असा यशस्वी प्रवास केलेल्या, 'हनुमान' पहिल्यावहिल्या पूर्ण लांबीच्या ॲनिमेशनपटाचे पात्ररचनाकार नितीन निगडे यांची ही भावना आहे. ॲनिमेशन इतकेच पाककलेवरही प्रेम करत असल्याने त्याने ही प्रतिक्रिया व्यक्त केली.

''अनुभवलेला प्रत्येक क्षण, घटनेचा मूड कलाकाराला टिपता आला पाहिजे. निरीक्षण हा कलाकाराचा पिंड असावा. त्याचा त्याला भावी काळात निश्चितच फायदा होतो. त्यातही लोक जेव्हा कलाकृतीला स्वीकारतात तेव्हा तुमच्या कामाला

न्याय मिळत असतो,'' असे सांगून ॲनिमेशनपटाची दुनिया उलगडताना श्री. निगडे म्हणाले, ''कागदावर न जाणवणारी छोटी चूकही पडद्यावर मोठी दिसत असल्याने सतर्क राहूनच काम करावे लागते. आपण उभे केलेले पात्र क्लाएंटला आवडत नाही, तोपर्यंत काम करत राहावे लागते. अक्षरश: लाखाच्या पटीत फ्रेम्स कराव्या लागतात. त्यांच्या पडताळणीनंतरच दिग्दर्शकांचा हिरवा कंदील मिळतो. त्यामुळे एखादा चित्रपट किंवा ॲनिमेशनपटासाठी कित्येक लोकांनी घेतलेले परिश्रम अनेकदा लक्षात घेतले जात नाहीत.''

*** संमेलनात 'संभाजी'चा स्वतंत्र स्टॉल**

'पानिपत' कादंबरीने मराठी वाचकांच्या गळ्यातला ताईत बनलेले नामवंत कादंबरीकार विश्वास पाटील यांची 'संभाजी' ही कादंबरी खपाचा नवा विक्रम प्रस्थापित करण्याच्या दिशेने निघाली आहे. या कादंबरीच्या निमित्ताने वेगळा आकर्षक स्टॉल ७९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मेहता पब्लिशिंग हाऊसने उभारला होता. लेखक विश्वास पाटील हेही यावेळी उपस्थित होते.

छत्रपती शिवरायांप्रमाणेच छत्रपती संभाजी महाराजांबद्दल मराठी माणसाच्या मनात विशेष आदर आहे. मराठीतील अनेक पुस्तकांमधून 'शंभूराजे' या उल्लेखाने संभाजी महाराजांना मराठी माणूस जाणतो. शंभूराजांची विलक्षण रोमहर्षक अशी चरितकहाणी सांगणारी कादंबरी पाटील यांनी लिहिली आणि प्रसिद्धीपूर्वीच पहिली आठ हजारांची आवृत्ती संपली. आता दुसरीही आठ हजारांची आवृत्ती प्रसिद्ध झाली आहे. साहित्य संमेलनात संभाजी कादंबरीचा स्वतंत्र स्टॉल राहील.

या कादंबरीत शेवटी 'संभाजी : वास्तव आणि अवास्तव' हे परिशिष्ट लेखकाने जोडले आहे. त्यामुळे संभाजीविषयक इतिहासात असलेले आणि वास्तविक नसलेले अनेक समज अथवा गैरसमज दूर होण्यास मदत होईल, असे पाटील यांना वाटते.

*** संग्रहालयाचे खासगीकरण**

मुंबईची सर्व जुनी माहिती ज्या संग्रहालयात आहे, ते मुंबईचे भाऊ दाजी लाड संग्रहालय आता खासगीकरणाच्या मार्गावर आहे. आशिया खंडात नावाजलेले हे संग्रहालय सरकारकडून खासगी मालकाकडे देता येत नाही असे काही तज्ज्ञ मंडळींचे मत आहे.

मुंबईची इत्थंभूत माहिती, पुरातन वास्तू, संदर्भ, रेल्वेचा इतिहास, जुनी कागदपत्रे आदींची माहिती जनतेला मिळावी यासाठी १८६२ साली लोकवर्गणीतून भायखळा, जिजामाता उद्यान (राणीची बाग) येथे हे संग्रहालय उभारण्यात आले होते. याचा ताबा मुंबई महानगरपालिकेकडे आहे. देखभाल व अत्याधुनिकीकरण यासाठी 'इंटक' या संस्थेला २००३ साली १५ वर्षांच्या कराराने दिले. पण आता हे संग्रहालय ९९ वर्षांसाठी देण्यात यावे असा प्रस्ताव इंटकने दिला आहे. त्यासाठी इंटकने एक नवीन ट्रस्ट स्थापन केला आहे. या १९ सदस्यांच्या ट्रस्टमध्ये महापौर दत्ता दळवी यांना अध्यक्षाचे स्थान दिले आहे.



*** बालगंधर्वांच्या कारकीर्दीला मानाचा मुजरा**

गोविंद बल्लाळ देवल यांच्या 'शारदा' या नाटकाद्वारे १९०५ मध्ये शारदेच्या मध्यवर्ती भूमिकेतून बालगंधर्वांच्या संगीत रंगभूमीवरील कारकिर्दीला आरंभ झाला. त्यास यावर्षी शंभर वर्षे झाल्याचे औचित्य साधून 'मुक्तछंद' या सांस्कृतिक मंचातर्फे बालगंधर्वांच्या गाण्याचा कार्यक्रम केला गेला. 'मुक्तछंद'च्या मेधा कुलकर्णी, अभिनेते श्रीकांत मोघे आणि नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

मराठी रंगभूमीची अधिकृत सुरुवात समजल्या जाणाऱ्या अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या 'शाकुंतल' या नाटकालाही यंदा सव्वाशे वर्षे पूर्ण होत आहेत. या दोन्ही कारणांमुळे 'बालगंधर्व गीतां'चा हा पहिलाच कार्यक्रम रंगतदार झाला.

स्वरसम्राज्ञी कीर्ती शिलेदार तसेच जयमाला शिलेदार यांनी गंधर्वांची बारा गीते सादर केली. ज्येष्ठ गायिका सरस्वतीबाई राणे आणि गंधर्वयुगातले तबलावादक अनिल देशपांडे यांचा सत्कार महापौर रजनी त्रिभुवन आणि आमदार गिरीश बापट यांच्या हस्ते झाला.

*** आंतरराष्ट्रीय पुस्तक जत्रेचे आयोजन**

विविध भाषेतील एकूण शंभर प्रकाशन संस्थांची दीड लाख पुस्तके मुंबई आंतरराष्ट्रीय पुस्तक जत्रेत प्रदर्शित करण्यात आली. असे संचालक संजीव अग्रवाल यांनी सांगितले.

हिंदी, इंग्रजी व मराठीबरोबर फ्रेंच, जर्मन, उर्दू, बंगाली व इतर भाषांतील पुस्तके या जत्रेत होती.

मकरसंक्रांतीपासून २२ जानेवारीपर्यंत चाललेल्या या पुस्तक जत्रेत १०० स्टॉल होते. हे सर्व स्टॉल वातानुकूलित होते.

धीरूभाई अंबानी शाळेपासून शालेय विद्यार्थ्यांची ग्रंथदिंडी काढण्यात आली. या फेस्टिव्हलचे हे चौथे वर्ष आहे.

*** माहितीबरोबरच ज्ञान मिळविणेही महत्त्वाचे**

''सन २०२० साठी करिअर घडवायचे असेल, तर केवळ माहितीचा उपयोग नाही. त्यातून ज्ञान कसे मिळवायचे हे शिकावे लागेल,'' असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांनी केले.

'सकाळ एज्युगेन २००६' या प्रदर्शनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले.

डॉ. कोळस्कर म्हणाले, ''सन २०२० साठी तयारी करताना आपल्याला दृष्टिकोन विस्तृत करावा लागणार आहे. माहितीचा भयानक मारा होत असताना त्यातून ज्ञान कसे मिळवायचे हे शिकणे महत्त्वाचे आहे. जागतिक स्तरावर काम करण्यासाठी उत्तम संवादकौशल्य, कामात नेमकेपणा, आत्मविश्वास, खुली मनोवृत्ती, योग्य दृष्टिकोन, स्पष्ट विचार, नावीन्याचा ध्यास ही गुणवैशिष्ट्ये आत्मसात करावी लागतील. करिअर घडवताना एका बाजूला ऊर्जा क्षेत्रात असलेल्या समस्या, पर्यावरणाचा ऱ्हास या बाबींचाही विचार करणे आवश्यक आहे.''

''नव्या काळात विस्तारत असलेल्या पर्यटन, हॉटेल व्यवस्थापन, संज्ञापन आदी क्षेत्रांमध्ये करिअर घडविण्याच्या दृष्टीने सूर्यदत्त संस्थेने अभ्यासक्रम आखले असून, त्यासाठी विद्यार्थ्यांकडून विविध प्रकल्पही करून घेण्यात येतात,'' अशी माहिती डॉ. चोरडिया यांनी दिली.

## * अमेरिकन विद्यार्थी शिकणार हिंदी भाषा

११ सप्टेंबरच्या दहशतवादी हल्ल्याने हादरलेल्या अमेरिकन प्रशासनाने देशाच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत अनेकानेक उपाय अवलंबले आहेत. यातीलच एक भाग म्हणून अमेरिकन शाळांमध्ये अगदी बालवाडीपासून ते महाविद्यालयीन पातळीपर्यंत हिंदी भाषेसह अरेबिक, रशियन, फारसी आणि अन्य परकीय भाषांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

बुश प्रशासनाने नॅशनल सिक्युरिटी लँगवेज इनिशिएटिव्ह (एनएलएलआय) हा कार्यक्रम आखला असून त्यासाठी ११४ दशलक्ष डॉलर्सचा निधी उभारला आहे. परकीय भाषा जाणून घेणे, तसेच आपले हितसंबंध असलेल्या देशांमधील घडामोडी जाणून घेणे, तसेच हितशत्रूंच्या हालचालींवर लक्ष ठेवणे, त्यांच्या सांकेतिक भाषांची उकल करणे या सर्व बाबी लक्षात घेऊन हा कार्यक्रम आखला आहे. इतरांशी त्यांच्या भाषेत संभाषण साधणे हे आमच्यापुढे आव्हान असल्याचेही या सूत्रांनी म्हटले आहे.

परराष्ट्र संरक्षण आणि शिक्षण मंत्रालयांनी एकत्र येऊन हा उपक्रम हाती घेतला आहे. शालेय तसेच महाविद्यालयीन पातळीपर्यंत या भाषांचे शिक्षण सक्तीचे असेल. शिक्षकांनाही या भाषांचे प्रशिक्षण दिले जाणार असून त्यासाठी त्रिस्तरीय आखणी करण्यात आली आहे. २००९ पर्यंत हिंदीसह अरेबिक, चिनी, रशियन, फारसी आणि अन्य आशियाई भाषा शिकणे अमेरिकन विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य असणार आहे. यासाठी क्रॅश कोर्सेसही चालविले जाणार आहेत. बुश प्रशासनाच्या या कार्यक्रमामुळे अमेरिकेतील परकीय भाषातज्ज्ञांना रोजगाराची संधी प्राप्त होणार आहे. त्यासाठी विशेष मोहीमही चालवली जाणार आहे. अमेरिकेत भारतीयांची लक्षणीय उपस्थिती असल्याने हिंदी भाषेला तिथे महत्त्व आहे. चिनी भाषाही अमेरिकेत लोकप्रिय आहे.



## * जेम्स लेनच्या आणखी एका पुस्तकावर बंदी

'शिवाजी : हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया' या पुस्तकातील शिवाजी महाराजांविषयीच्या आक्षेपार्ह विधानांनी वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या जेम्स लेन यांच्या 'द एपिक ऑफ शिवाजी' या पुस्तकावरही राज्य सरकारने बंदी घातली आहे.

विशेष म्हणजे, 'हिंदू किंग..'वर बंदी घालण्याच्या आधीचे हे पुस्तक असून २००१ सालीच ते प्रसिद्ध झालेले आहे.

ओरिएन्ट लाँगमन प्रकाशनसंस्थेने छापलेल्या या पुस्तकात कवींद्र परमानंदांच्या 'शिवभारत' या संस्कृत काव्याचा इंग्रजी अनुवाद तसेच लेन आणि बहुलकरांचा स्वत:चा अभ्यासही जोडला आहे. त्यातच शिवाजी महाराजांबाबत आक्षेपार्ह आणि वादग्रस्त विधाने असल्यामुळे बंदीची मागणी करणारी निवेदने राज्य सरकारकडे आली होती.

## * सावधान! मोबाईलमुळे कुटुंबात 'महाभारत'

मोबाईलधारकांनो सावधान! मोबाईल खासगी आयुष्यातील अमूल्य क्षणांवर विरजण पाडण्यासाठी तुमच्या दिशेने वाटचाल करीत आहे, असा इशारा एका अध्ययनाअंती देण्यात आला आहे.

विस्कॉंसिन मिलवाकी विद्यापीठाच्या प्राध्यापिका नोएल चेस्ली यांनी १३०० वयस्क मोबाईलधारकांचे दोन वर्षे निरीक्षण करून हा इशारा दिला आहे.

मोबाईलमुळे कोठेही संपर्क साधता येत असल्याने 'बॉस' अतिशय आनंदित असतात. परंतु मोबाईल कधीही खणखणत असल्याने पत्नीची व कुटुंबीयांची चिडचिड वाढते आहे. यामुळे कौटुंबिक जीवनावर कमालीचा दुष्परिणाम होत आहे. मोबाईलमुळे घराचेही आता कार्यालय बनू लागले आहे. पती-पत्नीच्या गप्पा रंगत असताना नेमका बॉसचा फोन येतो आणि त्या सुखद क्षणावर विरजण पडते असे दृश्य आता सगळीकडे दिसू लागले आहे. तर कधी कार्यालयात महत्त्वाची बैठक सुरू असताना घरून फोन येतो आणि चिडचिड वाढते. 'मॅरेज अँड फॅमिली'त प्रकाशित अहवालानुसार मोबाईल किंवा पेजर खासगी आयुष्यात तणाव निर्माण करण्याचे अस्त्र बनले आहे. पुरुषांना घरीसुद्धा कार्यालयातून फोन येत असल्याने त्यांचा बहुतांश वेळ कार्यालयावर खर्च होतो. महिलांना मात्र, दुहेरी मार सहन करावा लागतो. घरी असताना ऑफिसमधून फोन येतो तर ऑफिसमध्ये असताना घरचा फोन खणखणतो. खासगी आयुष्यात आक्रमण वाढल्यामुळे घरचे वातावरण बिघडते, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

## * विनोदाला दर्जा नाही

आजकाल विनोदी साहित्य लिहिले जात आहे; पण त्याचा दर्जा फारसा

चांगला राहिलेला नाही, अशी खंत ज्येष्ठ विनोदी लेखक द. मा. मिरासदार यांनी व्यक्त केली.

कोल्हापूर प्रेस क्लबच्या वार्तालापात त्यांनी अनेक विषयांवरील मते मांडली. विनोदी साहित्याच्या निर्मितीसाठी आज भरपूर मालमसाला आहे; राजकारणी माणसे हा त्याचा केंद्रबिंदू म्हटला पाहिजे, असा टोलाही मिरासदारांनी लगावला! ग. दि. माडगूळकर, शंकर पाटील यांची ग्रामीण कथेची आणि 'गोष्ट सांगणाऱ्या' कथेची परंपरा खंडित झाल्यासारखे दिसते खरे; पण उद्या या क्षेत्रात नवे लोक येतीलही, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

### * हीरक महोत्सवानिमित्त 'साधना' राबवणार वाचन संस्कृती मोहीम

साने गुरुजींनी स्थापन केलेल्या साधना साप्ताहिकातर्फे वाचन संस्कृती मोहीम राबवली जाणार असल्याची माहिती 'साधना'चे संपादक नरेंद्र दाभोळकर आणि प्रा. रा. ग. जाधव दिली. 'साधना'च्या हीरक महोत्सवाचे औचित्य साधून हा उपक्रम राबवला जात असून प्रत्येक महिन्याचा पहिला अंक हा पूर्णपणे साहित्याला वाहिलेला असणार आहे.

१५ ऑगस्ट २००६ ला 'साधना'चा ५९ वा वर्षारंभ अंक निघेल तर ६० वा वर्षारंभ अंक १५ ऑगस्ट २००७ ला प्रकाशित होईल. 'साधना'ची चौकट कायम ठेवून कालानुरूप योग्य ते बदल करून 'वाचनसंस्कृती अभियान' राबवले जाणार आहे.

'साधना'चा ७ जानेवारीचा अंक हा वाचन संस्कृती अभियानाचा पहिलाच अंक असून या अंकात मारुती चितमपल्ली, प्रा. केशव मेश्राम, रा. ग. जाधव, श्रीराम लागू, सुधीर रसाळ, अरुणा ढेरे, यांचे लेख आणि 'साहित्य कल्लोळ' सदराखाली सरहद्द कथा, कविता आणि आगामी पुस्तकांची माहिती देण्यात आली आहे.

### * 'झुलवा' आंतरराष्ट्रीय नाट्यमहोत्सवात

दिल्लीच्या नॅशनल स्कूल ऑफ ड्रामातर्फे आयोजित करण्यात आलेल्या आठव्या आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सवात 'रंगपीठ' संस्थेच्या वामन केंद्रे दिग्दर्शित 'झुलावा' या मराठी नाटकास आमंत्रित करण्यात आले.

एन.एस.डी.च्या यंदाच्या महोत्सवात चीन, जपान, बांगलादेश, श्रीलंका, इराण, कोरिया, पाकिस्तान, लेबनॉन, नेपाळ, सिंगापूर आदी देशांतील, तसेच भारतातील विविध भाषांमधील नाटके निमंत्रित करण्यात आली.

### * 'ग्रंथप्रदान अधिनियमा'च्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त चर्चासत्र

केंद्र शासनाने १९५४ मध्ये तयार केलेल्या 'ग्रंथ प्रदान अधिनियमा'चे यंदा सुवर्णमहोत्सवी वर्ष असून प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी यात काही सुधारणा केंद्र शासनाच्या विचाराधीन आहेत. त्यानिमित्ताने या अधिनियमातील त्रुटी, सुधारणा आणि आजवरचा आढावा घेण्यासाठी मुंबईत एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

देशात भारतीय भाषेत प्रकाशित झालेल्या प्रत्येक ग्रंथ आणि नियतकालिकाची एक प्रत राष्ट्रीय ठेवा म्हणून जतन, संवर्धन आणि संशोधनासाठी केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या देशातील चार राष्ट्रीय डिपॉझिटरी ग्रंथालयांना मोफत पाठविणे प्रकाशकांवर बंधनकारक आहे. मात्र या अधिनियमानुसार देशात प्रकाशित झालेली सर्वच पुस्तके आणि नियतकालिके या चार राष्ट्रीय डिपॉझिटरी ग्रंथालयात अपेक्षेइतक्या प्रमाणात जमा होत नाहीत, असे निदर्शनास आले आहे.

केंद्र शासनाने ग्रंथप्रदान अधिनियम १९५४ अन्वये राष्ट्रीय ग्रंथालय, कोलकाता, कोन्नेमेरा सार्वजनिक वाचनालय, चेन्नई, दिल्ली सार्वजनिक वाचनालय, दिल्ली आणि राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई या देशातील चार ग्रंथालयांची राष्ट्रीय डिपॉझिटरी ग्रंथालये म्हणून नेमणूक केलेली आहे. मुंबईत असलेल्या ग्रंथालयात दरवर्षी सुमारे २० हजार पुस्तके आणि नियतकालिके जमा होणे अपेक्षित आहे. मात्र १० ते १२ हजार पुस्तके आणि नियतकालिके येथे जमा होतात.

या चर्चासत्रासाठी देशातील राष्ट्रीय डिपॉझिटरी ग्रंथालयांचे सर्व संचालक, ग्रंथपाल, प्रकाशक आणि या क्षेत्राशी संबंधित मंडळी उपस्थित होती.

### * केंद्रीय शाळांमध्ये यापुढे 'कला व सौंदर्यशास्त्र' सक्तीचे

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचा (एनसीईआरटी) अभ्यासक्रम शिकवला जाणाऱ्या शाळांमध्ये जून २००६ पासून 'कला आणि सौंदर्यशास्त्र' हा विषय सक्तीचा असेल.

सांस्कृतिक स्रोत आणि प्रशिक्षण केंद्राने (सीसीआरटी) हा विषय अभ्यासक्रमात असावा, अशी सूचना केली होती.

पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना हा विषय सक्तीचा असेल. केंद्रीय परीक्षा मंडळाशी संलग्न असलेल्या शाळांमध्ये 'एनसीईआरटी'चा अभ्यासक्रम शिकवला जातो. संगीत, नृत्य, चित्रकला, नाटक असे कलेशी संबंधित विषय 'कला आणि सौंदर्यशास्त्र' या विषयात शिकवले जातील. त्यासाठी स्वतंत्रपणे शिक्षकांचीही नेमणूक केली जाणार आहे.

''प्रत्येक इयत्तेचा अभ्यासक्रम कलाकारांच्या समितीने निश्चित केला आहे. शालेय स्तरावर अभ्यासक्रमातच हा विषय समाविष्ट केल्यास भारतीय संस्कृती, कला याविषयीची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात लहानपणापासूनच रुजेल, या उद्देशाने हा प्रस्ताव मांडण्यात आला होता; तसेच यामुळे देशातील 'सीसीआरटी'ची शिष्यवृत्ती मिळविलेल्या अनेक कलाकारांना शाळांमध्ये शिक्षक म्हणून काम मिळू शकेल.''

'सीसीआरटी'तर्फे दहा ते चौदा वर्षे वयोगटातील ३५० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

दिली जाते. ''विसाव्या वर्षापर्यंत ही शिष्यवृत्ती मिळते. दरमहा सहाशे रुपयांपैकी ३०० रुपये गुरूसाठी आणि ३०० रुपये विद्यार्थ्यांसाठी दिले जातात. सध्या वर्षभरात यासाठी देशभरातून पाच हजार मुले अर्ज करतात. हे अर्ज 'सीसीआरटी'च्या www.ccrtindia.org या वेबसाईटवर उपलब्ध असतात.''

### * ही 'श्री'ची इच्छाची सहावी आवृत्ती

अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाचे माजी अध्यक्ष व उद्योगपती डॉ. श्रीनिवास ठाणेदार यांच्या 'ही श्री ची इच्छा' या आत्मचरित्राच्या सहाव्या आवृत्तीचे प्रकाशन मुंबई येथे 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांच्या हस्ते झाले. यावेळा ज्येष्ठ साहित्यिक विजय तेंडुलकर, रिझर्व्ह बँकेचे सल्लागार डॉ. नरेंद्र जाधव उपस्थित होते.

उद्योगपती असूनही अमेरिकेत मराठी संस्कृती जपण्यासाठी डॉ. ठाणेदार यांनी केलेले प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले.

### * संजय खानोलकरांचा 'आरसा' कविता संग्रह प्रकाशित

संजय खानोलकर यांच्या आरसा या कवितासंग्रहाचे प्रकाशन प्रा. रा. ग. जाधव यांच्या हस्ते पुणे येथे झाले. डॉ. सुनील सावंत या कार्यक्रमाला विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते.

आपल्या बालपणीच्या शालेय संस्कारांमुळे व 'खडक आणि शिंपले' या काव्यसंग्रहास मिळालेल्या अनंत काणेकर पुरस्कारामुळे प्रेरणा मिळाली, असे मनोगत खानोलकर यांनी व्यक्त केले.

प्रा. जाधव म्हणाले की, कुटुंब संस्थेचे आजचे रूप, विचार आणि विवेक जागृत करून कौटुंबिक जीवनशैली लयबद्ध भाषेत मांडणारे खानोलकर हे कवी सहज भाषेत बोलतात तसेच भावनामय भाषेत कविता करतात.

### * जगाचा इतिहास कवितेतून वाचा!

इतिहासातील रुक्ष तपशील आणि त्यातील सन-सनावळ्या यांना बिचकून राहणाऱ्यांसाठी एक खूषखबर आहे. त्यांना आता हा इतिहास कवितेतून वाचायला मिळेल. द्रविड मुन्नेत्र कळघमचे अध्यक्ष आणि सिद्धहस्त लेखक एम. करुणाकरन हा काव्यमय इतिहास लिहीत आहेत. ''जगाचा काव्यमय इतिहास लिहिणारी जगातील मी एकमेव व्यक्ती असेन,'' असा दावा करुणानिधी यांनी या वेळी केला.

करुणानिधी म्हणाले, ''जगाचा काव्यमय इतिहास लिहिण्याच्या प्रकल्पाला मी सुरुवात केलेली असून, रोज मी किमान शंभर ओळी लिहितो. विद्यार्थ्यांना, तरुणांना व या पुढील पिढ्यांनाही इतिहासाबद्दल गोडी वाटावी, यासाठी मी हा प्रकल्प हाती घेतला आहे. तरुणांनी भविष्यकाळात नवे जग निर्माण करावे व त्यासाठी माझ्या लेखनाचा उपयोग व्हावा, असे मला वाटत आले आहे.''



### * एकांकिका स्पर्धा

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद व नटराज नाट्य कला मंडळ यांच्या विद्यमाने बारामती येथे आयोजित करण्यात आलेल्या विसाव्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत पुण्याच्या वैविध्य संस्थेच्या 'मी शुभांगी देवधर' या एकांकिकेस प्रथम क्रमांक मिळाला.

द्वितीय क्रमांक शरद प्रतिष्ठानने (सोलापूर) सादर केलेल्या 'यात्रा' व पुण्याच्या कल्पनानाट्य संस्थेच्या 'हंबार' या एकांकिकांना विभागून देण्यात आला. तृतीय क्रमांक एमएमसीसी महाविद्यालय पुणेच्या 'कमिंग सून' या एकांकिकेस मिळाला. मैत्र (पुणे) यांच्या 'डॉ. दीक्षित' व क्षितिज (पुणे) यांच्या 'शिमगा' या एकांकिकांना उत्तेजनार्थ पारितोषिके मिळाली.

उत्कृष्ट दिग्दर्शन व अभिनयासाठीचे पारितोषिक वैविध्य संस्थेच्या सौरभ पारखी यांना मिळाले. उत्कृष्ट स्त्री अभिनयाचे पारितोषिक कल्पनाट्य संस्थेच्या 'हंबार' एकांकिकेतील भूमिकेसाठी उमा दामले यांना मिळाले. अभिनय प्रशस्तिपत्रके अमृता देवळे (मैत्र संस्था, पुणे), प्रिया बापट (चेरिज थिएटर, नगर), कावेरी देशमुख (कलाविष्कार, केडगाव), अमोल देशमुख (शरद प्रतिष्ठान, सोलापूर), सुनील पाडकर (समर्थ ॲकॅडमी, पुणे), राजेश चव्हाण (मैत्र, पुणे), सुभाष भणभणे (कलाविष्कार, केडगाव) व देवेंद्र गायकवाड (क्षितिज, पुणे) यांना मिळाले.

सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचे पारितोषिक कलाविष्कार, केडगावच्या किशोर सूर्यवंशी याला 'गुलामी' या एकांकिकेसाठी मिळाले. सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजनेचे पारितोषिक अरविंद सूर्य यांना 'पहाट' एकांकिकेसाठी देण्यात आले. सर्वोत्कृष्ट नेपथ्य- सौरभ पारखी, सर्वोत्कृष्ट पार्श्वसंगीत- परेश देवळणकर, रंगभूषा-वेषभूषा- सुभाष भणभणे, नवीन लेखन- क्षितिज पटवर्धन अशी इतर बक्षिसे देण्यात आली. या स्पर्धेमध्ये २८ संघ सहभागी झाले होते. परीक्षक म्हणून रवी इनामदार, प्रा. पी. आर. पाटील, प्रदीप कोथमिरे यांनी काम पाहिले.

### * दैवज्ञ साहित्य संमेलन सांगलीत

'अखिल भारतीय दैवज्ञ समाजोन्नती परिषद' आयोजित सहावे दैवज्ञ साहित्य संमेलन सांगलीत घेण्यात आले.

या संमेलनाचे अध्यक्ष रवींद्र माहीमकर तर स्वागताध्यक्ष सांगलीचे अनिल गडकरी होते. समाजोन्नती परिषदेचे अध्यक्ष जगन्नाथ गंगाराम पेडणेकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. समीक्षक प्रा. म. द. हातकणंगलेकर तसेच सांगली संस्थानचे राजे विजयसिंहराजे पटवर्धन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संमेलनात विविध विषयांवरील चर्चासत्रे, कविसंमेलन, ग्रंथदिंडी, ग्रंथप्रदर्शन आदी कार्यक्रम करण्यात आले. स्मरणिकेचेही प्रकशन करण्यात आले.

## * 'मराठी'च्या संवर्धनासाठी आता 'पूरक किमान कार्यक्रम'

मराठीच्या संवर्धनासाठी शालेय विभाग 'पूरक किमान कार्यक्रम' राबविणार असल्याची घोषणा, राज्याचे माध्यमिक शिक्षण संचालक मोहन आवटे यांनी पुणे येथे केली.

मराठी विषय सक्तीचा केला असतानाही विद्यार्थी करिअर करण्याच्या दृष्टीने ज्ञानभाषा म्हणून इंग्रजीकडे आकर्षित होतात. त्यामुळेच मराठीची पीछेहाट होत आहे. पुढील वर्षीपासून पहिली, पाचवी, नववी आणि अकरावीचा अभ्यासक्रम बदलण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी घरी किंवा शाळेत येता जाता परिसरात दिसणाऱ्या विविध गोष्टींचे वर्णन मराठी भाषेतून करावे आणि त्यातून संवाद साधावा यासाठी 'पूरक किमान कार्यक्रम' राबविण्यात येणार आहे. या कार्यक्रमामुळे विद्यार्थी मराठीतून संवाद साधू शकतील आणि त्यांना मराठीविषयी आवड निर्माण होईल. अध्ययन आणि अध्यापन या प्रक्रियेत चांगल्या प्रकारे जबाबदारी पार पाडण्यासाठी येत्या वर्षात विविध प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

## * समरसता साहित्य संमेलन

समरसता साहित्य परिषदेतर्फे सहा ते आठ जानेवारी दरम्यान आठव्या समरसता साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले. चिंचवड येथे झालेल्या या संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक डॉ. भीमराव गस्ती होते.

संमेलनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ कवी नामदेव ढसाळ यांच्या हस्ते झाले.

समरसता या मूल्याची जोपासना करणारे साहित्य समाजासमोर यावे, या दृष्टिकोनातून या संमेलनाचे आयोजन करण्यात आले. 'महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी आणि समरसता' विषयावर चर्चा झाली.

महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीची वाटचाल, स्वातंत्र्योत्तर काळातील आव्हाने व सामाजिक चळवळी, सामाजिक चळवळींचे साहित्य कृतीतील चित्रण, नवसामाजिक चळवळ- सामाजिक चळवळीचे बदलते स्वरूप या विषयांवरील परिसंवाद तसेच सामाजिक कार्यकर्त्यांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात आले.

या संमेलनात डॉ. द. ना. धनागरे, डॉ. आनंद यादव, डॉ. अशोक कामत, डॉ. रामचंद्र देखणे, डॉ. प्रभाकर मांडे, प्रा. बाळकृष्ण कवठेकर, विनायक गोविलकर, विनय सहस्रबुद्धे, डॉ. चंद्रकांत रावळ, मिलिंद कांबळे, शंकर धडके, दिलीप धारुरकर आदी वक्ते सहभागी झाले.

## * 'हॅरी पॉटर'चा नववर्षात अखेरचा अध्याय!

जगभरातील बच्चेकंपनीत ज्याच्या लोकप्रियतेने उच्चांक गाठला आहे तसेच साहित्य आणि चित्रपटाच्या दुनियेत ज्याने विक्रमी कमाई केली आहे, अशा हॅरी पॉटरचा अखेरचा 'अध्याय' या वर्षात प्रकाशित होणार आहे.



हॅरी पॉटरचे येणारे पुस्तक शेवटचे आहे, हे तमाम बच्चेकंपनीला माहीत होतेच, पण हा निर्णय बदलेल आणि पॉटरच्या मैत्रीला आपण मुकणार नाही, अशीही आशा त्यांना वाटत आहे. हॅरी पॉटरच्या लेखिका जे. के. रोलिंग यांनी आपल्या वेबसाइटवर मात्र आता येणारे पुस्तक हे अखेरचे असेल अशी घोषणा केल्याने नव्या पुस्तकाच्या गोड बातमीचा आनंद, पण हॅरी पॉटरची यानंतर नव्याने 'अक्षरभेट' घडणार नाही, अशी चुटपूटही चाहत्यांना आणि ग्रंथविक्रेत्यांना लागली आहे.

आता पुढल्या भागात काय, या प्रश्नांच्या माऱ्याला मला तोंड द्यावे लागणार नाही. हॅरीशी संबंधित अनेक प्रश्नांनी त्याचे चाहते मला भंडावून सोडत. या प्रेमळ जाचातून आता माझी सुटका होणार आहे. त्याचबरोबर हॅरीचा आणि त्याच्या कल्पनासृष्टीचा सहवासही अंतरणार अशी रुखरुख जाणवते, असे रोलिंग यांनी म्हटले आहे.

'हॅरी पॉटर अँड द कोल्ड ब्लडेड प्रिन्स' हे या मालेतले सहावे पुस्तक गत वर्षी प्रसिद्ध झाले. या पुस्तकांचा जगभरातील विक्रीचा आकडा ३० कोटीच्या घरात आहे!

## * डिजिटल युगातही डायरीची मागणी कायमच

नवीन वर्षाच्या नियोजनास उपयुक्त ठरणाऱ्या डायऱ्यांचे असंख्य आकार आणि प्रकार 'गिफ्ट शॉपी'तून पाहायला मिळत आहेत. खिशात मावतील अशांपासून 'ए-फोर'पर्यंत विविध आकाराच्या दैनंदिनी बाजारात दाखल झाल्या आहेत. त्यांच्या किमती १८ रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंत आहेत. आर्चिज, नाइटिंगेल, 'इंडिया टुडे'बरोबरच हेल्पेज इंडिया आणि 'क्राय'सारख्या स्वयंसेवी संस्थांच्या दैनंदिनीमध्ये 'कुटुंबाची मैत्रीण' ही सुजाता प्रकाशनाची अनोखी डायरी लक्ष वेधून घेत आहे. गृहिणींना डोळ्यांसमोर ठेवून तयार केलेल्या या डायरीमध्ये त्यांना उपयुक्त ठरेल, अशी माहिती आहे. 'डिजिटल डायरी'च्या जमान्यातसुद्धा वैद्यकीय डायरी, अभियांत्रिकी डायरी अशा खास व्यावसायिकांसाठी बनविलेल्या प्रकारांनी मागणी टिकवून ठेवली आहे. सर्वाधिक खपणाऱ्या 'एक्झिक्युटिव्ह' डायऱ्यांमध्ये यंदा 'बिझनेस ऑर्गनायझर' हा प्रकार लोकप्रिय होत आहे. यात 'क्रेडिट कार्ड्स'साठी स्वतंत्र कप्पे, महिनावार 'प्लॅनर', टेलिफोन डायरी, नोटपॅड यांचा अंतर्भाव आहे. या प्रकाराची किंमत १५० पासून ८०० रुपयांपर्यंत आहे. प्रत्येक महिन्याला वेगळी अशा १२ 'पॉकेट' डायऱ्यांच्या संचासही चांगला प्रतिसाद मिळतो आहे. 'एक्झिक्युटिव्ह' डायऱ्यांमध्ये पूर्वी रविवारचे पान अर्धे असे. मात्र, आता ग्राहकांच्या मागणीवरून हे पान पूर्ण आकारात छापले जात आहे. रविवारीही सुरू राहणाऱ्या उद्योगांतून ही मागणी झाली होती.

## * राजा रविवर्मा यांच्यावरील पुस्तकाचे प्रकाशन

थोर चित्रकार राजा रविवर्मा यांच्यावरील 'डिव्हाइन लिथोग्राफी' या पुस्तकाचे

प्रकाशन पुणे येथे झाले.

एनरिको कॅसेली आणि गिओव्हॅनी ॲप्राइल या संशोधकांना इटालियन सरकारकडून रविवर्मा यांच्यावरील संशोधनाकरिता मिळालेल्या अनुदानातून या पुस्तकाची निर्मिती झाली आहे.

रविवर्मा यांनी पायाभरणी केलेल्या 'शिळाप्रेस' प्रकारच्या चित्रनिर्मितीवर प्रकाश टाकण्याचा प्रस्तुत पुस्तकाचा हेतू आहे. पुस्तकाचे औपचारिक प्रकाशन गेल्याच महिन्यात नवी दिल्लीतील इटालियन दूतावासामध्ये झाले होते.

### * विश्वकोश मंडळातून अरुण टिकेकरही बाहेर

ज्येष्ठ कवी नामदेव ढसाळ यांच्यानंतर ज्येष्ठ पत्रकार डॉ. अरुण टिकेकर यांनीही मराठी विश्वकोश मंडळाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. 'सदस्य म्हणून मंडळावर नियुक्ती झाल्याबाबत अद्याप मला ना मंडळाच्या अध्यक्षा विजया वाड यांनी कळविले, ना सांस्कृतिक खात्याने! नियुक्तीविषयी माझी भूमिकाही विचारण्यात आली नाही, त्यामुळे वाड यांच्याकडे मी पत्राद्वारे राजीनामा पाठविला आहे', असे टिकेकर यांनी सांगितले.

### * बेळगावात मराठी नाट्य परिषद

नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी नववर्षाच्या आरंभीच बेळगावात नाट्य परिषदेची शाखा स्थापन करीत आहेत.

काही महिन्यांपूर्वी बेळगावच्या 'फुलोरा' या नाट्यसंस्थेच्या वीणा लोकूर यांनी मोहन जोशी यांची भेट घेऊन तेथील नाट्यरसिकांची कैफियत मांडली. वरेरकर नाट्य संघ ही तेथील जुनी नाट्यसंस्था अनेक वर्षे मराठी नाटके करत असे. तसेच मुंबईपुण्याच्या व्यावसायिक नाटकांचे दौरेही आयोजित केले जात. पण गेल्या पंधरा वर्षांपासून या संस्थेचे कामकाज थंडावले आहे. गेल्या पाच-सहा वर्षांपासून 'फुलोरा' ही संस्था जोमाने नाटके करू लागली. संस्थेत सुमारे २०० बाल कलावंत आणि ७० प्रौढ कलावंत सदस्य आहेत. हे सगळे दरवर्षी गाजलेल्या मराठी नाटकांचे प्रयोग करतात.

मोहन जोशी म्हणाले की, व्यावसायिक नाटकांचे पूर्वी बेळगावात नियमित दौरे होत. तिथला प्रेक्षक नाटकवेडा आहे आणि तो नाटकांना भरभरून दाद देतो, हे मी स्वत: अनुभवले आहे. इथून गेलेले प्रत्येक नाटक तिथे 'हाऊसफुल्ल' होते. पण गेल्या पंधरा वर्षांत मराठी नाटके तेथे जाणेच बंद झाले. याला कारण म्हणजे राज्याची सीमा ओलांडून तेथे जाणाऱ्या नाटकांना भरावा लागणारा सहा-सात हजारांचा टॅक्स. त्यामुळे नाटकांचे बजेटचे कोलमडते. सुदैवाने आता राज्यपालपदी कर्नाटकचे एस. एम. कृष्णा आहेत. नाट्यपरिषदेची शाखा तिथे स्थापन झाली की देवाणघेवाण सुरू होईल. त्यातून बसवरील हा कर कमी करण्याची मागणी



लावून धरता येईल. ती मान्य झाली तर मुंबई-पुणे-इचलकरंजी-कराड-सातारा-कोल्हापूर-बेळगाव असे नाटकांचे दौरे पुन्हा सुरू होतील.

### * समाजमनातील पापुद्रे उलगडण्याचा प्रयत्न

व्यक्तीच्या अंतर्मनातील पापुद्रे उलगडण्यापेक्षा समाजमनातील पापुद्रे उलगडण्याचा प्रयत्न मी माझ्या काही कथांमधून केला, असे निवेदन सुप्रसिद्ध लेखक ह. मो. मराठे यांनी केले.

अक्षता प्रकाशनतर्फे प्रमोदिनी वडके-काळे लिखित 'काही श्वासांसाठी फक्त' आणि 'सिमरन' तसेच डॉ. अनघा केसकर लिखित 'नामानिराळा' या कथासंग्रहाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते करण्यात आले.

मराठे पुढे म्हणाले, ''कथा हा साहित्यप्रकार अल्पायुषी आहे, असे समजण्याचे कारण नाही. बऱ्याच कथा चांगल्या कथानकामुळे, वर्णनांमुळे रचनेमुळे लक्षात राहतात. आजपर्यंत हजारो कथा, आणि कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यातील काही कथा खरोखरच मनात खोलवर घर करून राहतात.''

आपल्या स्वत:च्या लिखाणाबद्दल बोलताना मराठे म्हणाले, ''माझ्या आधीच्या साहित्यिक पिढीने लिखाणाची जी पद्धत चोखाळली ती पुढे न नेता मी वेगळी पद्धत चोखाळली याचे आज समाधान वाटते.''

लेखिका प्रमोदिनी वडके-कवळे व डॉ. अनघा केसकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

### * 'उपरा'कार लक्ष्मण माने यांचा निर्धार

''उपरा'च्या खपाची आकडेवारी विक्रमी असू शकेल, पण त्यापेक्षाही हे पुस्तक भटक्या-विमुक्तांच्या चळवळीचे हत्यार बनले. मध्यमवर्गीयांपासून राज्यकर्त्यांपर्यंत विविध घटकांनी 'उपरा'ची दखल घेतली. चळवळीच्या पातळीवर, सामाजिक पातळीवर काही बदल निश्चितच झाले. तरीही मूलभूत समस्यांसाठी संघर्ष करणे भाग पडावे, अशीच परिस्थिती आजही आहे. त्यामुळे प्रवाहाने नाकारलेल्या माणसांच्या वेदना कायम आहेत. त्या दूर करण्यासाठी, त्यांना त्यांचे हक्क मिळण्यासाठी यापुढेही हक्कांची लढाई सुरूच राहणार आहे,'' असा निर्धार 'उपरा'कार श्री. लक्ष्मण माने यांनी व्यक्त केला.

श्री. माने यांच्या 'उपरा' या आत्मकथनाने समाजासमोर एक जळजळीत वास्तव आणले. या साहित्यकृतीला नुकतीच २५ वर्षे पूर्ण झाली.

### * बोरकरांच्या हिंदी कविता

गुरुकुल प्रतिष्ठान आणि कवि बोरकर स्मृति समितीच्या वतीने कवी बा. भ. बोरकर यांच्या 'रसमानस' या हिंदी काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले.

कोकणी भाषेत सुबकता, रंजकता, ज्ञानोपासकता आणि गोडवा आहे. मात्र

सध्याच्या मराठी भाषेकडे पाहता मराठी भाषा ही पूर्वीसारखी राहील की नाही, अशी शंका वाटते. मराठी भाषेची जी अवस्था निर्माण झाली आणि तिची घडी बिघडली त्याला प्रसारमाध्यमेही जबाबदार आहेत. असे अरविंद गोखले यांनी सांगितले.

कवी बा. भ. बोरकर यांची मराठीने उपेक्षा केली असून त्यांच्या काव्यातून मराठीचेच प्रतिबिंब उमटल्याचे दिसते.

सुरेश आमोणकर यांनी ज्ञानेश्वरीच्या अनुवादामागे कुणी तरी अद्भुत शक्तीच आपल्याकडून हे काम करून घेत आहे, अशी भावना व्यक्त केली.

भारतात यापूर्वी कोणत्याही भाषेत न झालेला विश्वचरित्र तयार करण्याचे काम श्रीराम कामत करीत आहेत.

सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक डॉ. अशोक कामत यांनी केले.

### * सातवे साहित्य संमेलन

साहित्य संस्कृती संमेलनामुळे निर्मितीशक्तीला चालना आणि चेतना मिळते. यामुळेचे साहित्य व संस्कृती समृद्ध होते, असे उद्‌गार संत साहित्याचे अभ्यासक डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी काढले.

पुणे येथील सुवर्णज्योती महिला मंडळातर्फे आयोजित करण्यात आलेल्या सातव्या महिला साहित्य संस्कृती संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी अभिनेत्री सुहास जोशी, ज्येष्ठ अभिनेते निळू फुले, आदी उपस्थित होते. या वेळी निळू फुले यांचा सत्कार करण्यात आला.

उद्घाटनानंतर सुरभि ॲकॅडमीतर्फे 'शब्द झाले सोबती' हा कवितावाचनाचा कार्यक्रम झाला. हेमा लेले, अंजली कुलकर्णी, सुमित्रा भावे, अनुराधा मराठे, संगीता बर्वे यांनी कविता सादर केल्या. 'टॉक शो' कार्यक्रमात सुधीर गाडगीळ यांनी ऋतुजा बावडेकर, शुभदा पटवर्धन, शुभा मोघे यांची मुलाखत घेतली.

### * पर्यावरण विषयाचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करावा

पर्यावरण संतुलनासाठी शालेय स्तरापासून 'पर्यावरण' या विषयाचा अभ्यासक्रमात समोवश केला पाहिजे. शिक्षकांना देखील तशा प्रकारचे आवश्यक ते प्रशिक्षण दिले पाहिजे. हा विषय केवळ वर्गात बसून शिकण्यासारखा नसून त्यासाठी पशू, पक्षी, प्राण्यांची माहिती प्रत्यक्ष जंगलात जाऊन विद्यार्थ्यांना देणे गरजेचे आहे, असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नवनिर्वाचित अध्यक्ष मारुती चितमपल्ली यांनी व्यक्त केले.

श्री. चितमपल्ली पुढे म्हणाले की, आज ५० टक्के जंगले ही नष्ट झाली असून, नवीन पिढीतील विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्त्व वेळीच न समजल्यास पर्यावरण संतुलन राखणे अशक्य होईल. त्यामुळे भविष्यकाळात अनेक संकटांचा आपल्याला सामना करावा लागेल.



बचतीचे महत्त्व पशु-पक्ष्यांना कळते तितके माणसांना कळत नाही असे सांगून चितमपल्ली म्हणाले की, मी गिरसप्पाच्या धबधब्याच्या खाली असलेल्या गुहेत कबुतरांनी साठविलेले एक टन धान्य पाहिले आहे. अडचणींच्या वेळी त्यांना या धान्यांचा उपयोग होऊ शकतो. आपल्यापेक्षा जर्मन व रशियन भाषेत पशु-पक्ष्यांविषयी खूप माहिती उपलब्ध आहे. ती माहिती वाचण्यासाठी प्रथम ती भाषा अवगत करणे गरजेचे आहे. आदिवासी लोक आपल्याशी सुसंवाद साधू शकतील अशा १८ भाषांचा अभ्यास केल्याने जीवनाला वेगळा आकार मिळाला आहे, असेही चितमपल्ली यांनी सांगितले.

### * जागतिक पातळीवर शिवचरित्र पोहोचावे

जागतिक पातळीवर शिवाजीमहाराजांचे चरित्र पोहोचविण्याची इच्छा पूर्ण व्हावी एवढीच आता मोरया चरणी प्रार्थना आहे असे उद्‌गार शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी काढले.

श्री मोरया गोसावी संजीवन समाधी महोत्सवाच्या कार्यक्रमात मोरया पुरस्कार सहधर्मदाय आयुक्त सुधाकर पाध्ये यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी पुरंदरे बोलत होते.

बाबासाहेब म्हणाले की, हा पुरस्कार म्हणजे मोरया गोसावींचा महाप्रसाद आहे. माझे बालपण याच शहरात गेल्याने पिंपरी-चिंचवडशी माझा जिव्हाळ्याचा, प्रेमाचा, मायेचा संबंध आहे. आपल्याकडील महापुरुषाची नावेपण विसरली जातात ही खेदाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. पुरस्कारात दहा हजार रुपये रोख, मानपत्र, स्मृतिचिन्ह, तलवार व पुष्पगुच्छाचा समावेश होता.

### * पाटील यांची कविता मानवी अस्तित्वाचा शोध घेणारी!

वर्तमान जीवनाच्या चित्रणामधून मानवी अस्तित्वाचा गांभीर्याने शोध घेणारी प्रदीप पाटील यांची कविता ही नव्या पिढीतील महत्त्वाची कविता आहे, असे उद्‌गार कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांनी काढले. 'कोमसाप'तर्फे दिला जाणारा 'मराठी कविता राजधानी पुरस्कार' त्यांच्या हस्ते इस्लामपूरचे कवी प्रदीप पाटील यांना मालगुंड जि. रत्नागिरी येथे देण्यात आला.

कर्णिक म्हणाले की, जागतिकीकरणामुळे खेड्यापाड्यातील जीवनही आमूलाग्र बदलू लागले आहे. माणसाची उपभोगवादी वृत्ती वाढत चालल्यामुळे माणूसपण हरवले आहे, त्याचे चित्रण करणारी पाटलांची कविता उत्तम काव्यगुणांचा आविष्क करते.

पत्रकार विजय कुवळेकर म्हणाले, कवी म्हणून पाटलांची दृष्टी समकालीन भान व्यक्त करणारी आहे. पुरस्कार स्वीकारताना प्रदीप पाटील म्हणाले, 'सामान्य माणसाला सांस्कृतिक पर्यावरणात कोणतेही महत्त्व नव्हते अशा काळात केशवसुतांनी

त्याला आपल्या कवितेचे आस्थाकेंद्र केले. त्यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या या पुरस्कारामुळे माझा आत्मविश्वास वाढला आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत पुरस्कार समितीचे निमंत्रक अरुण नेरुरकर यांनी केले. कोमसापचे कार्यवाह प्रा. बी. एल. पाटील यांनी आभार मानले.

### * पानिपत, महानायक, संभाजी हा वाङ्‌मयीन अपघात

ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून नावलौकिक मिळाला असला तरी माझा ओढा सामाजिक लेखनाकडेच अधिक होता. आजच्या काळातले राजकारण 'पानिपत'मध्ये आढळले तसेच नेताजी सुभाषबाबू आणि छत्रपती संभाजी लोकांपर्यंत ज्या प्रमाणात जायला हवे होते तितके पोहोचले नाहीत म्हणून 'महानायक' आणि 'संभाजी' या कादंबऱ्यांचा घाट घातला. 'पानिपत', 'महानायक', 'संभाजी' हा निव्वळ वाङ्‌मयीन अपघात होता. पुढील काळात अशा प्रकारचे ऐतिहासिक लेखन आपल्याकडून होईल, असे वाटत नाही, असे मत ख्यातनाम लेखक विश्वास पाटील यांनी मुंबई येथे व्यक्त केले.

बोरिवली येथील 'शब्द - द बुक गॅलरी' आयोजित 'शब्दगप्पा' कार्यक्रमाचे उद्घाटन विश्वास पाटील यांच्या मुलाखतीने झाले. पत्रकार मुकुंद कुळे यांनी पाटील यांच्याशी दिलखुलास संवाद साधला. आपल्या ग्रामीण पार्श्वभूमीचे, उमेदीच्या काळाचे अनुभव सांगत पाटील यांनी मुलाखतीत रंग भरला. पाटलाच्या मुलाला उसाचा, तमाशाचा आणि कुस्त्यांचा अशा तिन्ही फडातून मुशाफिरी करावी लागते. माझाही प्रवास त्याच वाटेने झाला, पण रंगलो शब्दांच्या फडात, सह्याद्रीच्या रांगड्या रांगांनी आणि महाराष्ट्राच्या मर्दानी मातीने माझ्यावर लेखकीय संस्कार घडवले. निसर्गाने माणसाच्या अधिक जवळ जायला शिकवले. यामधूनच आपल्यातला लेखक घडत गेला.

मराठी माणसांच्या दु:खाची भळभळती जखम म्हणजे पानिपत. पूर्वी पानिपत हा शब्द अशुभ मानला जायचा; परंतु पानिपत म्हणजे 'मराठ्यांचे पुण्यपथ' ही भावना मनाशी ठाम होती. पानिपतवर आजपर्यंत अनेक पुस्तके आली. त्यातून भाऊसाहेबांची व्यक्तिरेखा ही पराभूत म्हणूनच लेखकांनी चितारली. मला हा अपयशाचा इतिहास पुसून टाकायचा होता. त्यातूनच 'पानिपत' घडली. पानिपत हा मराठ्यांच्या पराभवाचा नसून विजयाचा इतिहास आहे, अशा शब्दांत पाटील यांनी मराठ्यांची यशोगाथा मांडली.

'झाडाझडती' ही विस्थापितांच्या जीवनावर कादंबरी का लिहावीशी वाटली सांगताना पाटील म्हणाले, आपला गाव सोडून जाण्याची वेळ एखाद्यावर येते असे उदाहरण मी आपल्या गावातच पाहिले. हा प्रसंग कायम काळजावर कोरला गेला. त्याच प्रेरणेने ही कादंबरी पूर्ण झाली. मात्र या कादंबरीमुळे त्रासही प्रचंड



झाला. 'झाडाझडती'चे प्रत्येक पान शासनविरोधी आहे, हे कळल्यामुळे सरकारी पातळीवर खळबळ उडाली. मला निलंबित करण्याचा प्रस्तावही आला. या दरम्यान, वसंतदादा पाटील मुख्यमंत्री होते. त्यांनी सचिवांना सांगितले की लेखकाला लिहायचेय ते लिहू द्या. त्यांच्या लेखनाने सरकारवर कोणताही परिणाम होत नाही. यावेळी अटकाव केला तर लेखकच हीरो ठरेल. त्याला आपण विनाकारण मोठे करू. ते तुम्हाला-आम्हाला अडचणीत आणतील. याच काळात मला साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला. थोडेफार नाव मिळाले. या गदारोळात निलंबनाचा प्रस्ताव कुठल्याकुठे दूर भिरकावला गेला.

### * विकृत इतिहास लिहिणाऱ्यांना लगाम घालणारच

संशोधन आणि व्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली कोणी विकृत इतिहास लिहून मराठी अस्मितेवर घाला घालत असेल, तर अशा प्रवृत्तींना लगाम घालण्यासाठी राज्य शासन तयार आहे, असा इशारा उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांनी विजयदुर्ग महोत्सवात बोलताना दिला.

आर. आर. पाटील म्हणाले, महाराष्ट्राला पराक्रमी इतिहासाची पार्श्वभूमी आहे. परंतु संशोधनाच्या नावाखाली कोणी परकीय व्यक्ती येते आणि जिजाऊ मातेची बदनामी करण्यापर्यंत तिची मजल जाते हे महाराष्ट्राने अनुभविले आहे. या व्यक्ती चुकीचा इतिहास मांडून समाजात, जातीधर्मात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. अशा व्यक्तींनी संशोधन, व्यक्ती स्वातंत्र्य यांचा आधार घेऊन खरा इतिहास दडपण्याचे षड्यंत्र रचले आहे. राज्य शासन ते कदापि यशस्वी होऊ देणार नाही.

### * संगीताचे गतवैभव पुन्हा येईल

सध्या संगीतजगतातील घडामोडी फारशा उत्साहवर्धक नाहीत. उत्तम संगीत ऐकायला मिळणे कठीण झाले आहे. तरीही रसिकांचा अपेक्षाभंग करणारा हा काळ लवकरच सरेल आणि संगीताचे गतवैभव पुन्हा येईल, असा आशावाद गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी व्यक्त केला. त्यांच्या गाण्यांवर सारेगामा इंडियाने 'जीवनगाणे' मालिकेतील तिसरे पुष्प गुंफले आहे.

रिमिक्सचा प्रकार अत्यंत अश्लाघ्य असून कुटुंबियांसमवेत बसून ही गाणी पाहणे अशक्य आहे, असे त्या उद्विग्नपणे म्हणाल्या. अशी गाणी सादर करून गायकांची स्वत:ची ओळख कशी निर्माण होईल? सध्या एकही गाणे सहा महिन्यांवर लोकांच्या लक्षात राहत नाही. तेच पूर्वीचा काळ पाहा, अजूनही ती गाणी लोकांना आवडतात.

❐

# बालसाहित्य सुखदायी, सुंदर, संवादी, सोपे व सकस हवे

**लीला दीक्षित**

मराठी बालसाहित्याचा चिमुकला प्रवाह केव्हा सुरू झाला हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ या संतांच्या साहित्यात मुलांच्या भावना लयदार पद्धतीने साकार करणारी काही पदे आहेत. परंतु श्रीकृष्ण किंवा राम यांच्या आधारे मुलांचे बालपण येथे आकाराला येते. लोकगीतामध्ये बालगाणी आहेतच. परंतु हेतुपुरस्सर मुलांच्यासाठी आपण लिहिले पाहिजे या आस्थेने आणि आत्मीयतेने बालसाहित्य मात्र निर्माण झाले ते येथे इंग्रजांच्या संपर्कानेच.

बालसाहित्याच्या विकासात नियतकालिकांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. १८८१ साली विनायक कोंडदेव ओक यांचे मुलांसाठी 'बालबोध' हे मासिक सुरू झाले. बालबोधमेवा १८८४ मध्ये सुरू झाले. थोड्या दिवसांनी बंद पडले. ते रे. टिळकांनी पुन्हा सुरू केले. लक्ष्मीबाई टिळक, बालकवी, कुसुमाग्रज, वेणूताई मोडक यांचे अप्रतिम साहित्य यामध्ये भेटते. 'आनंद' हे मासिक वा. गो. आपटे यांनी १९०६ मध्ये सुरू केले. अत्यंत आनंदाची आणि भाग्याची गोष्ट म्हणजे आपल्या 'आनंद'ने आता शंभराव्या वर्षात प्रवेश केला आहे. 'आनंद'ची वा. गो. आपटे यांनी उत्तम आखणी केली. कथा, कविता, कोडी, सुविचार, विज्ञानविषयक माहिती, देशोदेशीचे ज्ञानविज्ञान अशी त्यातली सदरे त्यांच्या कल्पकतेची साक्ष देतात. आजचे कितीतरी वाचक आनंदमध्ये लिहून मोठे झाले. कारण आनंदमध्ये मुलांच्या लेखनाचा एक स्वतंत्र विभाग असे. १८६४ मध्ये सुरू झालेले शालापत्रक मधून मधून बंद पडत चालले. पण बालसाहित्यात त्याचे महत्त्वाचे योगदान आहेच. श्री. शं. ब. सहस्रबुद्धे यांचे 'बालोद्यान', श्री. बा. रा. मोडकांचे मुलांचे मासिक, श्री. पालवणकरांचा 'खेळगडी', पा. ना. मिसाळ यांचे 'बालसन्मित्र' हे पाक्षिक. भा. रा. भागवतांचे बालमित्र या मासिकांनी उत्तमोत्तम बालसाहित्य मुलांपुढे ठेवले.

पाठ्यपुस्तकमंडळातर्फे किशोर, मानकरकाकांचे 'टॉनिक', 'केसरी छावा' शिरवाडकरांचे 'कुमार', किर्लोस्करमधील 'बालवाडी' अशी काही नावे मला आठवताहेत. 'छात्रप्रबोधन' या कुमारांच्या मासिकाचे गेल्या दहा वर्षांत उत्तम कुमार साहित्य समाजापुढे ठेवले आहे. मामू नावाचे मासिक नुकतेच सुरू झाले आहे. माणसे निष्ठेने आजही कार्य करताहेत. पण महत्त्वाचा प्रश्न आहे ही नियतकालिके मुलांपर्यंत किती पोहोचतात? प्रत्येक शाळेत उत्तमोत्तम नियतकालिके ग्रंथालयात आली पाहिजेत, परंतु ग्रँट नाही, पैसा नाही, अनुदान नाही, हा मंत्र शासन सतत घोकत राहणार.



आज बालसाहित्याचा हा प्रवाह खळाळत वाहता आहे. कथा, कविता, कादंबरी, नाटुकली अशी विविध वाङ्मय प्रकारातून कितीतरी लेखक आपले विचार मांडत आहेत. परंतु बालसाहित्याच्या क्षेत्रात समीक्षा फारशी घडत नाही. बालसाहित्याची समीक्षा ही व्हायलाच हवी. माजी संमेलनाध्यक्ष रा. ग. जाधव यांनीही बालसाहित्य समीक्षेचे दालन समृद्ध व्हायला हवे असे म्हटले आहे. बालसाहित्य समीक्षा अत्यंत अल्प प्रमाणात झालेली आहे. सुभाष वसेकर यांच्या 'पऱ्यांची शाळा' या संग्रहाला नरहर कुरुंदकरांची प्रस्तावना आहे. विंदा करंदीकरांनी 'परंपरा आणि नवता'मध्ये बालसाहित्यावर लिहिले आहे. लीलावती भागवत, मालतीबाई दांडेकर, सुलभा शहा, देवीदास बागूल, विश्वास वसेकर यांनी बालसाहित्याचा आढावा घेणारे ग्रंथ लिहिले. त्यांचे प्रयत्न मोठे आहेत तरीही त्यामध्ये समीक्षेच्या अंगाने साहित्याचा विचार फारसा आलेला नाही. श्रीमती शांता शेळके, पाडगावकर यांनी काही बालपुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत.

वृत्तपत्रातून बालसाहित्याच्या पुस्तकाला परीक्षण म्हणून स्थान नाही. वृत्तपत्रातून सर्व वाङ्मयप्रकारावर लिहिले जाते. बालसाहित्याचे पुस्तक अभिप्रायासाठी येते त्याबरोबर एक नोंद असते– 'परीक्षण ७० शब्दांत लिहावे.' बासुंदी आटविण्यात स्त्री चतुर असली तरी तिला अक्षरे आटवणे काही शक्य नसते. त्यामुळे लिहू शकत नाही म्हणून पुस्तक परत पाठवावे असाही विचार येतो. पण ती कृती मी करीत नाही. चला, सत्तर शब्दांत छोटा परिचय तर जाईल. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे उत्तम समीक्षकांचे बालसाहित्याकडे मुळातच लक्ष जात नाही. आणि तिसरे अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे बालसाहित्य समीक्षेची गरज काय असा पडणारा प्रश्न. शंभर पानांचे तर पुस्तक, त्यात कल्पनेच्या निम्म्या भराऱ्या. मग काय लिहिणार हो! लिहाना! भराऱ्या कमी हव्यात. बालसाहित्य लिहिणारे कितीसे लेखक उत्तम समीक्षक आहेत? जे थोडे असतील त्यांनी समीक्षेला भिडायला हवे!

या ठिकाणी बालसाहित्याविषयी एक पंचसूत्री माझ्या मनात येते. ती अशी:

१) बालसाहित्य **सुखदायी** आनंददायी हवे!

२) बालसाहित्य **संवादी** हवे!

३) बालसाहित्य कलात्मक म्हणजे **सुंदर** हवे!

४) बालसाहित्य सहज सोपे हवे! म्हणजे भाषा **सुबोध** हवी.

५) बालसाहित्य भावना, विचार, ज्ञान, विज्ञान अशा जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे **सकस** हवे!

या ठिकाणी मी पाच शब्द वापरले आहेत.

सुखदायी, सुंदर, संवादी सहजसोपे आणि सकस. 'स' हे आद्य अक्षर येथे ठेवले फाहे. या अक्षरातून बालसाहित्यविषयक आशय आणि अभिव्यक्तीचे विशेष, सहजपणाने प्रतिबिंबित होतात. ❒

# राज्य पुरस्कार प्राप्त पुस्तके




## वाईज ॲन्ड अदरवाईज

**सुधा मूर्ती**

**अनु. लीना सोहोनी**

सामाजिक भान टिपून ठेवलेल्या अनुभवांचे प्रांजळ लेखन

**किंमत १५०रु.**



मा. लीना सोहोनी



मा. निरंजन घाटे

## नवे शतक

**निरंजन घाटे**

एकविसाव्या शतकातील मानवी जीवनविषयक बदलाचे प्रभावी भविष्यकथन

**किंमत १५०रु.**







## खेळणीच खेळणी

**डी. एस. इटोकर**

लहान मुलांच्या सृजनशीलता संधी मिळावी यासाठी त्यांच्या कृतिशीलतेला प्रवृत्त करणारे मार्गदर्शनपर पुस्तक

**किंमत ६०रु.**



मा. डी. एस. इटोकर

**मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे.**



# राज्य पुरस्कार प्राप्त पुस्तके




## बिजलीदेवीची कहाणी

**गोविंद लक्ष्मण परांजपे**

वीजेची संपूर्ण माहिती देणारे रोचक शब्दांकन

**किंमत ८०रु.**



स्व. गोविंद परांजपे

**तुका म्हणे साहित्य पुरस्कार २००५ साठी पात्र झालेला काव्यसंग्रह**




## उत्सव

**सुप्रिया वकील**

जीवनाच्या विविध रंगांनी उजळलेल्या मन:स्पर्शी मनस्वी अशा कवितांचा उत्सव

**किंमत ५०रु.**



मा. सुप्रिया वकील

**मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे.**




# ऑक्टोपसी

**इयान फ्लेमिंग**

**अनु. जयमती दळवी**

### जेम्स बाँडने पार पाडलेल्या देशोदेशीच्या गुप्तचर मोहिमा

कथाकादंबऱ्यांमधून कल्पनेच्या सहाय्याने लेखकांकडून रंगविण्यात आलेल्या काही व्यक्तिरेखा प्रत्यक्षातल्या व्यक्तीपेक्षाही कधी कधी अधिक वास्तव ठरतात आणि आपल्या जीवनाचा एक भाग बनून जातात; आपल्यासमोर त्या एक रोल मॉडेल म्हणून वावरत राहतात. त्या काल्पनिक व्यक्तिरेखा आहेत याचाच जणू विसर पडतो. अशा व्यक्तिरेखांची निर्मिती हे एक आव्हानच असते. एखाद्या पुस्तकापुरतीच अशी व्यक्तिरेखा मर्यादित असणे शक्य असते; पण कधी कधी या व्यक्तिरेखेभोवती अनेक कथावस्तूंची उभारणी केली जाते, आणि तिचे वेगवेगळे पैलू त्याद्वारे प्रकट होत राहतात.

ब्रिटिश गुप्तहेर ००७ जेम्स बाँड ही एक अशीच जगभरच्या वाचकांनी आणि चित्रपट प्रेक्षकांनी प्रिय मानलेली व्यक्तिरेखा आहे.

जेम्स बाँडचा मर्दानीपणा, त्याच्याकडची अत्याधुनिक हत्यारे आणि बंदुका, त्याची चपळाई, सुंदर स्त्रियांना भुरळ घालण्याची त्याची क्षमता, मद्याचा रसिकत्वाने आस्वाद घेण्याची त्याची हौस, कुठल्याही परिस्थितीतून मार्ग काढण्याची त्याची उपजत सावधानता, वेगवेगळी वाहने व माणसे हाताळण्याची त्याची कुशलता यांची मोहिनी वाचक-प्रेक्षकांना सतत झुलवत राहिली; आश्चर्याचे एकामागोमाग एक धक्के देत राहिली.

इआन फ्लेमिंग (१९०८-१९६४) याने दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटिश नौदलाच्या गुप्तहेरखात्यात संचालकाचा सचिव म्हणून काम केलेले होते तसेच मॉस्कोमध्ये वृत्तपत्र प्रतिनिधी म्हणूनही काही काळ घालवला होता. युद्धानंतर किम्स्ली न्यूजपेपर वृत्तसंस्थेच्या परदेशी विभागाचे संचालकपद भूषविले. जेम्स बाँडप्रमाणे त्यालाही वेगवान मोटार कार्स चालवण्याची हौस होती. उत्तमोत्तम



हॉटेल्समध्ये वेगवेगळे पदार्थ चोखंदळपणे चाखणे, बेदरकारपणे जुगार खेळणे, इतरांना प्रभावित करणे, हे त्याचे गुणविशेष त्याने निर्माण केलेल्या जेम्स बाँड या गुप्तहेरातही उतरलेले आहेत. आपल्या हेरगिरीतल्या आणि पत्रकारितेमधील अनेक घटनांचा वापर त्याने आपल्या कादंबऱ्यांमध्ये केलेला आहे.

वयाच्या ४४ व्या वर्षी १९५२ मध्ये त्याने जेम्स बाँड ही व्यक्तिरेखा केंद्रस्थानी ठेवणारी कॅसिनो रॉयल ही पहिली कादंबरी लिहिली. ती पुढच्या वर्षी प्रकाशित झाली. फ्रान्समधील निसर्गरम्य पर्यटनस्थळ रॉयल-लेस-इक्स येथील भपकेबाज कॅसिनोमध्ये ल चिफरे या आपल्या प्रतिस्पर्ध्याशी ००७ जेम्स बाँड हा जुगार खेळून त्याला गारद करतो... त्या कादंबरीतील जुगाराचे प्रकार आणि त्या प्रत्येक प्रकारातल्या खाचाखोचा जेम्स बाँड ज्या प्रकारे उलगडून दाखवतो, त्या वाचताना वाचकाला आश्चर्याचे धक्के बसत राहतात. खाद्यपदार्थांचा आस्वाद घेताना जेम्स बाँड मद्याचे प्रकार, आणि खाण्यापिण्यातले बारकावे दाखवतो तेही जीवनाचा उपभोग कसा आनंदी दिलदारपणे घ्यावा याचा जणू वस्तुपाठ देत असतात. जेम्स बाँडसारखे आपल्यालाही हे सारे जमायला हवे, त्यात खरी आयुष्याची खुमारी आहे असे प्रत्येक वाचकाला मनोमन वाटते. पुरुषत्वाचा आणि पराक्रमाचा तो मूर्तिमंत पुतळा वाटतो. सर्वांनाच भुरळ पाडणारा. स्वप्नातही आदर्श वाटावा असा!

**खाद्यपदार्थांचा आस्वाद घेताना जेम्स बाँड मद्याचे प्रकार, आणि खाण्यापिण्यातले बारकावे दाखवतो तेही जीवनाचा उपभोग कसा आनंदी दिलदारपणे घ्यावा याचा जणू वस्तुपाठ देत असतात. जेम्स बाँडसारखे आपल्यालाही हे सारे जमायला हवे**

लिव्ह अँड लेट डाय (१९५५), मूनरेकर (१९५५), डायमंडस् आर फॉरएव्हर (१९५६), फ्रॉम रशिया वुइथ लव्ह (१९५७), डॉ. नो (१९५८), गोल्डफिंगर (१९५८), फॉर युवर आइज् ओन्ली (१९५८), थंडर बॉल (१९५८), यू ओन्ली लिव्ह ट्वाइस (१९५८), दि मॅन वुइथ दि गोल्डन गन (१९६५); ऑक्टोपसी अँड दि लिव्हिंग डेलाइटस (१९६६) ही इआन फ्लेमिंगची पुस्तके प्रसिद्ध झाली. त्यापैकी फॉर युवर आइज ओन्ली आणि आक्टोपसी हे दोन कथासंग्रह आहेत. दि मॅन वुइथ दि गोल्डन गन ही कादंबरी अपूर्ण असतानाच १९६४ मध्ये इआन फ्लेमिंगचे निधन झाले. १९६२ साली डॉ. नो हा जेम्स बाँड नामक असणारा पहिला चित्रपट निघाला. त्याच्या इतरही कादंबऱ्यांवरचे चित्रपट गाजत राहिले आणि त्याच्या कादंबऱ्यांची विक्रीही मोठ्या प्रमाणावर होत राहिली. गेली चाळीसावर वर्षे त्याच्या कादंबऱ्यांच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघत आहेत. त्याच्या कादंबऱ्यांवरच्या चित्रकथाही लोकप्रिय झाल्या असून 'ग्राफिक नॉव्हेल्स'च्या चित्रमय

माध्यमातूनही त्याच्या कादंबऱ्या उपलब्ध आहेत. ह्या चित्रकथांचे प्रकाशन इआन फ्लेमिंगचे मित्र आणि प्रकाशक लॉर्ड बीव्हरब्रूक यांनी केलेले आहे. चित्रकथांच्या दृष्टीने पुनर्लेखन अँथनी हर्न याने केलेले असून जॉन मॅकलस्की याने चित्रे काढलेली आहेत. सीन कोनेरी याने जेम्स बाँडच्या भूमिकेत अमाप लोकप्रियता मिळवली; त्याचे चित्रपट येण्याच्या चार वर्षे आधीच प्रसिद्ध झालेल्या या चित्रकथांमधील जेम्स बाँड हा सीन कॉनेरीसारेखा चितारलेला आहे हा एक योगायोगच म्हणायला हवा.

ऑक्टोपसी हा इआन फ्लेमिंगच्या चार कथांचा संग्रह त्याच्या मृत्यूनंतर, १९६५ साली प्रकाशित झाला.

मेजर डेक्स्टर स्मिथ, ओबीई, रॉयल मरीन्स हा निवृत्त धाडसी अधिकारी वयाच्या ५४ व्या वर्षी हृदयात दोन ठिकाणी रक्ताच्या गाठी झाल्याने जमेकामध्ये राहत असतो. रोज दोन औंस व्हिस्की आणि दहा सिगरेटस असा कोटा डॉक्टरांनी ठरवून दिलेला असूनही त्याचे मद्यपान व धूम्रपान अखंड चालू असते. त्यामुळे त्याची तब्येत खूपच बिघडलेली होती. तशात दोन वर्षांपूर्वी पत्नी मेरी ही वारल्यानंतर त्याला एकाकी वाटत असे. खिन्न, उदास असे. त्याचे घर समुद्राकाठी पाच एकरात बांधलेले होते. त्यात पक्षी, किडे व मासे पाळलेले होते. पलीकडे पोवळ्याचा खडक होता. त्या पशुपक्षी संग्रहालयासाठी रखवालदार नेमलेले होते. त्यातील करकोचे, इंद्रधनुषी पोपटमासा, ज्वेल फिश वगैरे प्राणी व मासे तेथे होते. त्यातल्या त्यात स्कॉर्पियन फिश ही तेथील खासियत. बारा इंच लांब; एक पौंड वजन, समुद्रातील सर्वात भयंकर आणि कुरूप मासा. खडबडीत केसाळ डोके, लाल डोळ्यांवर लोंबकळणाऱ्या भुवया, भरपूर दातांचे सताड उघडणारे तोंड, पाठीवरील उभे पात्यासारखे, कोणत्याही त्वचेत सुईसारखे घुसणारे पर, त्यातून बाहेर पडणारे टेट्रडॉटाक्सिन विष तर जबरदस्त प्राणघातक. त्यांना पकडणे आणि आपल्या ऑक्टोपसला ते खायला देणे ह्या प्रयोगाची जबाबदारी त्याच्यावर असते. ऑक्टोपस स्वत:च हिंस्र प्राणी. त्याला स्कॉर्पिअन फिशची प्राणघातक क्षमता समजते का यावर तेथील संस्थेत संशोधन चालू असते.

**खडबडीत केसाळ डोके, लाल डोळ्यांवर लोंबकळणाऱ्या भुवया, भरपूर दातांचे सताड उघडणारे तोंड, पाठीवरील उभे पात्यासारखे, कोणत्याही त्वचेत सुईसारखे घुसणारे पर, त्यातून बाहेर पडणारे टेट्रडॉटाक्सिन विष तर जबरदस्त प्राणघातक.**

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जर्मनीचा पराभव करण्यासाठी मिसलेनिअस ऑब्जेक्टिव्ह ब्युरो (एमबीओ) स्थापन करण्यात आला होता. त्यात मेजर स्मिथला



लेफ्टनंट कर्नल हा तात्पुरता किताब दिलेला होता. त्यावेळी जर्मन भाषातज्ज्ञ म्हणून स्मिथकडे सर्व कागदपत्रे नजर टाकण्यासाठी येत. त्यावर भाष्य करून ती कागदपत्रे त्याच्या अमेरिकन बॉसला द्यावी लागत. त्यात बऱ्याच नावांच्या याद्या असत. त्या पुढे न्यूरेनबर्ग खटल्यासाठी वापरण्यात आल्या. गेस्टापो आणि ॲबवेरची गुप्त स्थळे मुक्त करण्याची कामगिरी स्मिथकडे होती. त्यावेळी ओबरहौजर या गिर्यारोहक वाटाड्याची माहिती काढून त्याला स्मिथने अटक करून आपल्या जीपमधून नेलेले असते; आणि ओबरहौजरला दोन गोळ्या झाडून ठार मारलेले असते. ओबरहौजर दारूगोळ्याची पेटी हिमनदीपलीकडे फेकतो. त्या पेटीत रेइशबँक टाकसाळीचे शिक्के असणाऱ्या सोन्याच्या दोन मोठ्या लगडी त्याला सापडतात. एका खड्ड्यात रिकामी पेटी पुरून त्या लगडी तो आपल्या जीपपर्यंत नेतो. एका खडकाच्या बेचक्यात त्या लगडी पुरून ठेवतो. सहा महिन्यांनी लढाई संपल्यावर मेजर स्मिथ लंडनला परत येतो. परंतु आपले सैन्यातले अधिकारपद कायम ठेवून एमओबीवर ब्रिटिश प्रतिनिधी म्हणून वर्णी लावून घेतो. विमानाने त्या सोन्याच्या लगडी घरी आणतो. मावशीच्या फ्लॅटच्या तळघरात त्या लगडी सुरक्षित ठेवतो. राजीनामा देऊन एका पूर्वाश्रमीच्या प्रेयसीशी लग्न करून जगभर पर्यटन करीत राहतो. जमेकात स्थायिक होतो. सोन्याच्या लगडी विकताना मात्र हे सोने तुम्हाला कोठून मिळाले असा प्रश्न हाँगकाँगमधील मेसर्स फू बंधूंची आयात निर्यात व्यापारी कंपनी विचारते. एक लाखावर डॉलर्स किंमत मिळेल असा अंदाज व्यक्त करते. लगडीचा थोडा थोडा भाग कापून फू मार्फत विकण्याचा उद्योग चालू होतो...

**लढाई संपल्यावर मेजर स्मिथ लंडनला परत येतो. परंतु आपले सैन्यातले अधिकारपद कायम ठेवून एमओबीवर ब्रिटिश प्रतिनिधी म्हणून वर्णी लावून घेतो. विमानाने त्या लगडी घरी आणतो. मावशीच्या फ्लॅटच्या तळघरात त्या लगडी सुरक्षित ठेवतो. राजीनामा देऊन एका पूर्वाश्रमीच्या प्रेयसीशी लग्न करून जगभर पर्यटन करीत राहतो.**

परंतु या प्रकाराची कुणकुण ब्रिटिश गुप्तचर विभागाला लागते; आणि जेम्स बाँडला मेजर स्मिथच्या चौकशीसाठी पाठवण्यात येते. स्मिथ त्या पूर्वस्मृतींना उजाळा देतो; तेव्हा जेम्स बाँड त्याला सांगतो, ''तुझ्या कोर्टमार्शलसाठी या हकिकतीचा वापर केला जाईल.'' ओबरहौजरला तू का मारलेस असा प्रश्न जेम्स बाँड विचारतो. तेव्हा स्मिथ म्हणतो, ''ओबरहौजर माझा मित्र होता. त्यानं मला युद्धाआधी स्किइंग शिकवलं होतं. तो वडिलधारा, आधारस्तंभासारखा होता...'' तेव्हा जेम्स बाँड निरोप घेताना म्हणतो, ''ते तुला घरी आणण्यासाठी कोणाला तरी आठवडाभरात पाठवतील.''

जेम्स बाँड असे का म्हणाला असावा असा प्रश्न स्मिथला पडतो.

आणि आपल्या ऑक्टोपसला स्कॉर्पिअन फिशची शेवटची मेजवानी देण्यासाठी तो बाहेर पडतो... होडीतून मासे पकडण्यासाठी फिरणाऱ्या दोन जमेकन तरुणांना मेजर स्मिथचे शव सापडते... पोलिस येतात. 'ऑक्टोपसने मेजर स्मिथला ठार मारले' याऐवजी 'मेजर स्मिथ यांचा बुडून मृत्यू' अशी बातमी वृत्तपत्रात येते...

'पुनर्जन्माची पहाट'मध्ये जेम्स बाँडवर नं. २७२ ला ठार मारण्याची कामगिरी सोपवण्यात येते. पूर्व बर्लिनपर्यंत तो आलेला असतो. त्याच्या मागावर केजीबी ही रशियन गुप्तचर संघटना आणि पूर्व जर्मनीची सुरक्षा सेना असते; पळून जाणाऱ्या नं. २७२ ला पकडण्यासाठी 'ऑपरेशन एक्स्टासे' योजना आखून त्यासाठी सर्वोत्तम नेमबाजांची जर्मनांनी तयारी केलेली असते... ''मग या योजनेत मी कुठे बसतो?'' असा प्रश्न जेम्स बाँड आपला बॉस एम याला विचारतो. एम त्यावर थंडपणे म्हणतो, ''तू या ट्रिगर नेमबाजाला मारायचे आहेस. त्यांनी २७२ ला टिपायच्या आधी तू त्याला मारायचे आहेस... हे काम फार घाणेरडे आहे... पण तुला करावे लागेल.'' बाँड पूर्व बर्लिनला जातो. एका हॉटेलमध्ये त्याचा कॉंटॅक्ट मॅन त्याला भेटणार असतो... २७२ च्या आयुष्याच्या बदल्यात या ट्रिगरचं आयुष्य पणाला लागणार असते. हा 'खून'च म्हणायचा तर!

**सोव्हिएत वाद्यवृंदातल्या मुली त्या दहामजली इमारतीबाहेर पडत असतात... दुर्बिणीने बाँड बघतो. एक मुलगी इतरांपेक्षा उंच असते. सुंदर सोनेरी लांब केस... वितळलेल्या सोन्यासारखे चमकणारे... मोहक चाल. हातात सेलोची पेटी... ती सुंदर आकृती क्षणभर दिसते आणि बाँडच्या हृदयात काटा टोचल्यासारखे होते...**

कॅ. सेंटर हा त्याला एका इमारतीत मुक्कामासाठी घेऊन जातो.

दहामजली नियंत्रणकेंद्रातून ट्रिगर अंधाऱ्या खिडकीतून नेम धरेल... तू तीनशे यार्डावरच्या या खोलीतून रशियन ट्रिगरला टिपायचे आहेस.'' या इमारतीत सारखी वर्दळ असते... एक बायकांचा वाद्यवृंद त्या इमारतीत प्रवेश करताना त्याला दिसतो.

मनसोक्त झोप झाल्यावर बाँड फिरायला बाहेर पडतो... सोव्हिएत वाद्यवृंदातल्या मुली त्या दहामजली इमारतीबाहेर पडत असतात... दुर्बिणीने बाँड बघतो. एक मुलगी इतरांपेक्षा उंच असते. सुंदर सोनेरी लांब केस... वितळलेल्याा सोन्यासारखे चमकणारे... मोहक चाल. हातात सेलोची पेटी... ती सुंदर आकृती क्षणभर दिसते आणि बाँडच्या हृदयात काटा टोचल्यासारखे होते...

आपला ट्रिगर दृष्टीच्या टप्प्यात आल्यावर बाँड नेम धरतो... त्याला सोनेरी केस दिसतात... बाँड कॅलश्नीकोव्ह बंदुकीच्या स्क्रूवरची बोटं इंचभर फिरवून तिचा चाप ओढतो. बंदूक स्टँडवरून निखळून खाली रस्त्यावर पडते.

गोळ्यांचा वर्षाव सुरू होतो... ट्रिगरच्या गोळीबाराचा आवाज लपवण्यासाठी



वाद्यवृंदाची सोय केली होती का? ट्रिगर सेलोच्या पेटीत रोज रायफल नेत-आणत असेल का? स्पाय पेरिस्कोपमधून तिचा नेम धरणारा सुंदर पापणीचा एक डोळा तेवढा बाँडला दिसला होता. तीन दिवस एकतर्फी प्रणय त्याने तिच्याबरोबर केला होता...

त्यानं जसं तिला मारलं नव्हतं तसं 'तेही' तिला निदान ठार मारणार नाहीत असा विचार बाँडच्या मनात येऊन जातो. तो सेंडरला म्हणतो, ''ठीक आहे. माझ्या नशिबाने मला डबल ओ नंबर गमवावा लागेल. पण स्टेशन बॉसला सांग काळजी करू नका. ती मुलगी आता कधीही नेमबाजी करू शकणार नाही. तिचा डावा हात निकामी झाला असणार... तिची जिद्द तर नक्कीच मंदावली असेल... आयुष्यातील प्रकाशच लुप्त झाला असेल... माझ्या दृष्टीनं हे पुरेसं आहे.''

'संपत्ती एका कुलीन स्त्रीची' ह्या कथेमध्ये जेम्स बाँडवर त्याचा बॉस एक वेगळीच कामगिरी सोपवतो. सोदेबी या प्रसिद्ध लिलाव कंपनीतर्फे पाचूच्या एका फॅबर्जे पृथ्वीगोलाचा लिलाव होणार असतो. त्याची किंमत एक लाख पंचावन्न हजार पौंडापर्यंत वाढते... ती बोली वाढविणारा रशियन कोण हे शोधून काढण्याचे काम जेम्स बाँडला करायचे असते. त्यासाठी त्याला मि. स्नोमन याची मदत होते; आणि लिलावाच्या वेळच्या कार्यप्रणालीचे संकेतही त्यावरून लक्षात येतात. या कथावस्तूला रहस्याची जोड मिळते ती त्या पाचूचा पृथ्वीगोलाच्या इतिहासाची; आणि तो पाचूचा गोल जिला मिळालेला असतो त्या मारिआ फ्रूडन्स्टिनच्या भूतकाळाची! १९५९ साली मारिआ सोर्बोनच्या वकिलातीत दुभाषाचे काम करते. ती अनाकर्षक असते; लेनिनग्राडच्या हेरगिरी प्रशिक्षण शाळेत एक वर्षाचा अभ्यास करून आलेली असते आणि ब्रिटिश नागरिकत्व तिने स्वीकारलेले असते. ती केजीबीसाठी मुख्य कार्यालयात काम करीत असते आणि तिच्या कामाचा पुरस्कार म्हणून तिला हा एक लाखावर पौंडांचा पाचूचा गोल देण्यात आलेला असतो. ती दिवसातून सहा वेळा सांकेतिक ब्रिटिश संदेश डिकोड करून तिखटमीठ लावून रशियन गुप्तचर संस्थेकडे पाठवत असे. ब्रिटिश सरकार तिचा उपयोग करून तिसऱ्या श्रेणीच्या बातम्या रशियाला जाव्या अशी मखलाशी करीत असते... जेम्स बाँड त्या पाचूच्या गोलाची बोली लावणाऱ्या व्यक्तीचा शोध लावतो... ती व्यक्ती नंतर रशियन वकिलातीत जाते... तिच्या पाठीवर छोटेसे कुबड असते. त्यावरून जेम्स बाँड त्या व्यक्तीला

**सोदेबी या प्रसिद्ध लिलाव कंपनीतर्फे पाचूच्या एका फॅबर्जे पृथ्वीगोलाचा लिलाव होणार असतो. त्याची किंमत एक लाख पंचावन्न हजार पौंडापर्यंत वाढते... ती बोली वाढविणारा रशियन कोण हे शोधून काढण्याचे काम जेम्स बाँडला करायचे असते.**

बरोबर ओळखतो. ''अरे, हा तर पिओटर मॅलिनोवस्की! वकिलातीत कृषिसहाय्यक म्हणून तो काम करीत असतो.. त्याला ब्रिटिश सरकार 'देशद्रोही कामांमुळे घातक व्यक्ती' म्हणून घोषित करून परत पाठवण्याचा पवित्रा घेते... जेम्स बाँड त्या दृष्टीने सर्व पुरावे तयार करतो...

न्यूयॉर्कबद्दलही जेम्स बाँडच्या मनात काहीशी नाराजी असते; असे इआन फ्लेमिंग दाखवतो. लंडनच्या तुलनेने न्यूयॉर्क त्याला तेवढेसे भावत नाही. १९६३ मध्ये 'न्यूयॉर्क हेरल्ड ट्रिब्युन'मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'गुप्तहेर ओओसेवन न्यूयॉर्क'मध्ये या मजकुराचा ऑक्टोपसी या संग्रहात प्रथमच समावेश झाला आहे. या मजकुराला कथा म्हणणे अवघडच आहे. न्यूयॉर्कबद्दल व्यक्त केलेल्या कठोर भावनांमुळे काही अमेरिकन वाचकांना धक्का बसेल, खेद वाटेल याची आपल्याला जाणीव आहे; ते तसे न वाटले तरच आपल्याला आश्चर्य वाटेल अशीही शेरेबाजी तो करतो. मात्र जेम्स बाँडला जे वाटते आहे, ते त्याचे मत आहे; तेच आपले मत आहे असे समजू नये असा इंट्रोही तो या मजकुराच्या आरंभ देतो.

जेम्स बाँड बीओएसी या विमानाने लंडनहून न्यूयॉर्कच्या विमानतळावर सप्टेंबरच्या सोनेरी सकाळी दहा वाजता उतरतो... क्यूमध्ये उभा राहतो. क्यूमध्ये किंचाळणारी रडणारी काही मुले असतात. इमिग्रेशनची तपासणी १५ मिनिटे चालते. डेव्हिड बालॉ, व्यापारी या नावाने त्याचा पासपोर्ट असतो. इमिग्रेशन व कस्टमची तपासणी कोणाही पर्यटकाला दु:खीकष्टी करणारी आणि अवमानकारक वाटावी अशी जाणीव प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उमटत असते. प्रत्येक बॅगेची कसून तपासणी... दुर्बिणीतून कोणीतरी मध्यमवर्गीय गृहस्थ पलीकडच्या काचेमागून बघत असल्याचे लक्षात आल्यावर जेम्स बाँड चपापतो. त्याचा उद्देश चोरीचा तर नसावा ना असा संशय त्याला येतो... बाँडला घेण्यासाठी कॅडिलक घेऊन कमांडर कॅरे आलेला असतो. सुंदर गाडी, उत्तम ड्रायव्हर, कडक शिस्त व पूर्ण तारतम्य असलेली कार रेंटल एजन्सी त्याची ठरलेली होती... न्यूयॉर्कचा व्हॅनवाइक एक्सप्रेस हायवे वर्ल्डफेअरसाठी तोडफोड करून नव्याने बांधला जात होता. 'द ॲस्टर' या टाइम्स स्क्वेअरमधल्या हॉटेलात उतरायचे ते ठरवतो... इतर हॉटेल्सना आता उतरती कळा लागलीय असे तो मानतो. **उसासे टाकणाऱ्या लिफ्टस्, शिळी हवा भरलेल्या खोल्या, पातळ कॉफी, निळ्यापांढऱ्या पडलेल्या अंड्याचा नाश्ता, ओलसर टोस्ट...** हे सर्वच त्याला खटकणारे, न आवडणारे असते. ॲस्टरच त्यातल्या त्यात बरं! हॉटेलात गेल्यावर काही किरकोळ खरेदी करायची असते... (पण सगळ्या वस्तू मेड इन युरोप... मग त्या अमेरिकेत मुद्दाम खरेदी कशाला करायच्या?) ओवेनचे टूथब्रश, जिलेटचे शेव्हर्स, फ्रेंच गोल्फचे पायमोजे.. रोमांचक पुस्तकं.. इत्यादी वस्तू त्याला हव्या असतात. रात्रीचे जेवण... ल्यूटेस या सर्वोत्तम रेस्टॉरंटमध्ये.. दोन ड्राय मार्टिनी. घरगुती व्हिस्कीबरोबर बीफ इटर्सजित... कालवांचं साय असलेलं स्ट्यू, मिलर हाय लाइफ व्हिस्की... प्लाझाची एडवर्डियन रूम... पॅव्हिलियनमध्ये सुंदर तरुणींच्या परफ्युमच्या वासामुळे गोंधळात पडणारे रसनेंद्रिय... सालमन मासा... स्क्रँबल्ड एग्जची भुर्जी... पण एकूण न्यूयॉर्क हॉटेलातले मांस शिळेच असते. शीतगृहातले... त्यामुळे त्याला चव नसते. आरोग्यालाही अपायकारक... ब्ल्यू फिल्म, लैंगिक सुख क्रूरपणे घेणाऱ्यांचे सोलँगे... न्यूयॉर्कला सगळं काही आहे... आणि नाहीही. स्वप्नातील हे सर्व कार्यक्रम सोडून बाँडला ऑफिसात जावे लागते. त्यामुळे त्याची ही मध्यरात्रही बेचव ठरते...

या सगळ्यामुळे जेम्स बाँडचा हा न्यूयॉर्क दौरा काहीसा अपेक्षाभंग करणारा होतो. आणि त्याचे खापर तो न्यूयॉर्कवर फोडतो. हा न्यूयॉर्कचाच प्रमाद आहे, दोष आहे असे त्याला वाटते.

न्यूयॉर्कमधील वाहतूक, हॉटेल्स, रेस्टॉरंटस व त्यातून मिळणारे शिळे मांस, दुकानांमधील परदेशी वस्तू... लैंगिक संबंधातील क्रौर्य व दिखाऊपणा... या सर्वांमुळे न्यूयॉर्क आता आधीसारखे टवटवीत आणि उत्फुल्ल, चित्तथरारक राहिलेले नाही अशी खंत त्याला वाटते... आणि तीच प्रकट केल्यामुळे आपल्यावर न्यूयॉर्कर नाराज होतील याची त्याला थोडीशी धाकधूक वाटते.

एकूणच जेम्स बाँड हा जीवनाकडे, प्रत्येक क्षणाकडे आनंदवादी उत्सुकतेने पाहणारा आहे. प्रत्येक गोष्टीचा आनंद लुटण्यासारखा असतो– असे मानणारा आहे. त्या आनंदाचा निर्भेळपणा जपू पाहणारा आहे. आपलाही जीवनविषयक दृष्टिकोन उन्नत, प्रसन्न करणारा आहे.

**पृष्ठे : ९६ ● किंमत : ८०रु. ● सभासदांना : ६० रु. ● पोस्टेज : २०रु.**

**प्रत्येक बॅगेची कसून तपासणी... दुर्बिणीतून कोणीतरी मध्यमवर्गीय गृहस्थ पलीकडच्या काचेमागून बघत असल्याचे लक्षात आल्यावर जेम्स बाँड चपापतो. त्याचा उद्देश चोरीचा तर नसावा ना असा संशय** त्याला येतो...

**न्यूयॉर्कमधील वाहतूक, हॉटेल्स, रेस्टॉरंटस व त्यातून मिळणारे शिळे मांस, दुकानांमधील परदेशी वस्तू... लैंगिक संबंधातील क्रौर्य व दिखाऊपणा... या सर्वांमुळे न्यूयॉर्क आता आधीसारखे टवटवीत आणि उत्फुल्ल, चित्तथरारक राहिलेले नाही अशी खंत त्याला वाटते... आणि तीच प्रकट केल्यामुळे आपल्यावर न्यूयॉर्कर नाराज होतील याची त्याला थोडीशी धाकधूक वाटते.**

# वेरूळ लेण्यातील शिल्पवैभव

**राधिका टिपरे**



अनेक आकर्षक फोटो आणि
ऐतिहासिक माहितीच्या संदर्भासह
वेरूळ लेण्यातील शिल्पवैभव
टिपणारे शब्दशिल्प

किंमत २०० रु.

या शिल्पकृती आपल्याशी मूकपणे बोलतात. त्यांच्या बंद ओठातून उमटणारे निस्तब्ध बोल आपल्या कानात गुंजत राहतात. गर्भरेशमी वस्त्रांची सळसळ आपल्याला जाणवते नुपूरांची छन् छन् कंगणांची किणकिण आणि दमदार लयीतील पावलांचा पायरव ....

सगळ काही उमजतं... समजतं....

फक्त हे सर्व जाणणारं मन हवंच...



# अंतरिक्षाचा वेध

**सुधा रिसबूड**



**हे विश्वजसे आहे तसा त्याचा अभ्यास म्हणजे खगोलशास्त्र**

हे विज्ञानतंत्रज्ञानाचे युग आहे. त्याचे आपले आकलन जितके नेमके असेल तेवढी प्रगती आपण करू. डॉ. स्टिफन हॉकिंग, डॉ. ॲसिमोव्ह, आर्थर सी. क्लार्क, डॉ. कार्ल सागान वगैरेंनी विज्ञानतंत्रज्ञान सुगम सुबोध रूपात पेश करून फार मोठे काम केले आहे.

डॉ. कार्ल सागान यांची **कॉसमॉस** ही मालिका अमेरिकन दूरदर्शनवरून गाजली होती. या विश्वाचे स्वरूप, अंतरिक्षातीले ग्रह, पृथ्वी, पृथ्वीवरील जीवसृष्टीची उत्क्रांती, सूर्य, सूर्याची ग्रहमाला, वेगवेगळे ग्रह व तारे, स्थलकालातील प्रवास, ग्रहताऱ्यांचे जीवन, उत्क्रांत मानव, वगैरे विषयांबद्दलचे उपलब्ध ज्ञान आकर्षकपणे या मालिकेद्वारे उलगडून दाखवण्यात आले होते. त्या मालिकेवर आधारित पुस्तकही खूप गाजले. ब्रोव्हाज ब्रेन, मर्मर्स ऑफ अर्थ, द ड्रॅगन ऑफ एडन वगैरे त्यांच्या पुस्तकांमध्येही वैज्ञानिक संकल्पनांचा कौशल्यपूर्ण वापर केला गेला आहे. व्हॉयेजर यानामध्ये ठेवण्यात आलेल्या कालकुपीतील माहिती तयार करण्यात आणि मरीनर, व्हायकिंग आणि व्हॉयेजर यांच्या अंतरिक्ष मोहिमेतही त्यांचा प्रामुख्याने सहभाग होता. अंतरिक्षविषयक संशोधकशास्त्रज्ञ म्हणूनही त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. शुक्रावरील ग्रीनहाऊस परिणाम, मंगळावरील वादळे, टायटन भोवतालचे ढग, आण्विक हिवाळा याबाबतचे त्यांचे संशोधन महत्त्वपूर्ण मानले जाते. 'कॉसमॉस'च्या आधारे 'अंतरिक्षाचा वेध' हे पुस्तक सुधा रिसबूड यांनी तयार केले आहे. मराठी वाचकांना त्यामुळे या सृष्टीची आणि अंतरिक्षाची, सजीव सृष्टीच्या निर्मितीची आणि जीवसृष्टीच्या उत्क्रांतीची बरीचशी ओळख होऊ शकेल. विज्ञान-तंत्रज्ञानातील कल्पना-संकल्पना मराठीत आणणे ही तशी सोपी

गोष्ट नाही; परंतु सुधा रिसबूड यांनी ते काम खूपच कसोशीने केले आहे.

या सृष्टीचे, या पृथ्वीचे रहस्य जाणून घेण्यासाठी माणसाने आपली बुद्धी आणि प्रतिभा पणाला लावली. एकेक तर्क करीत वास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मागच्यांचा आधार घेत, खंडनमंडन करीत ज्ञानक्षेत्रातला पुढचा टप्पा गाठला. सृष्टीतील एकेका वैशिष्ट्यावर लक्ष केंद्रित करून त्याचे अंतर्बाह्य स्वरूप स्पष्ट करून घेण्याचा आटापिटा केला. त्याचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात कसा होऊ शकतो याचा मागोवा घेतला. जे ज्ञान गवसले, ते लिखित वा अन्य स्वरूपात पुढच्यांसाठी संचित करण्याचे मार्ग मानव शोधत राहिला. **''हे विश्व जसे आहे तसा त्याचा अभ्यास म्हणजे खगोलशास्त्र.''**(२८) साधारणत: दहा ते वीस अब्ज वर्षांपूर्वी एका प्रचंड विस्फोटातून हे विश्व निर्माण झाले.

पाश्चिमात्य खगोलशास्त्रीय परंपरेपेक्षा आपणा भारतीयांची अभ्यासाची परंपरा प्राचीन आहे आणि खगोलशास्त्र व ज्योतिर्विद्या यात आपण आधीपासूनच फरक केलेला आहे. भारतीयांनी वेदांच्या अभ्यासासाठीही शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, ज्योतिष व छंद या सहा पद्धतींचे आकलन आवश्यक मानले होते. लगाध हा वेदान्त ज्योतिषाचा आद्यलेखक असून त्याने इ.स.पूर्व ९०० मध्ये ग्रहताऱ्यांची निरीक्षणे नोंदवली होती. सत्तावीस नक्षत्रांची साद्यंत माहिती त्याने दिलेली आहे. ऋग्वेद काळातही महिना ३० दिवसांचा, प्रत्येक दिवस ३० मुहुर्तांचा आणि प्रत्येक मुहुर्ताचे १५ उपमुहुर्त– मानण्यात येत.

**पाश्चिमात्य खगोलशास्त्रीय परंपरेपेक्षा आपणा भारतीयांची अभ्यासाची परंपरा प्राचीन आहे आणि खगोलशास्त्र व ज्योतिर्विद्या यात आपण आधीपासूनच फरक केलेला आहे. भारतीयांनी वेदांच्या अभ्यासासाठीही शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, ज्योतिष व छंद या सहा पद्धतींचे आकलन आवश्यक मानले होते.**

लगाधाच्या मते सूर्य पृथ्वीभोवती फिरत असून, त्याच्या वार्षिक गतीचे मोजमाप करण्यासाठी त्याने राशिचक्राची कल्पना मांडली.

'अंतरिक्षाचा वेध'मध्ये अवकाश निरीक्षणाच्या दृष्टीने आजवर झालेल्या संशोधनाची नेटकी माहिती देण्यात आली आहे.

आधुनिक ज्योतिषशास्त्राचा जनक म्हणून टोलेमी (इ.स. दुसरे शतक) याचा उल्लेख होतो. तो अलेक्झांड्रियाच्या ग्रंथालयात काम करे. त्याने बाबिलोनियन ज्योतिषशास्त्राची परंपरा, कालगणनेची पद्धत यांचा अभ्यास केला.

इ.स. १५४३ मध्ये निकोलस कोपर्निकस याने पृथ्वी हा विश्वाचा केंद्रबिंदू नसून पृथ्वी सूर्याभोवती फिरते व पृथ्वी हा सूर्यापासून तिसरा ग्रह आहे असे



प्रतिपादन केले. त्याचे हे प्रतिपादन बायबलमधील विधानांना छेद देणारे होते, त्यामुळे त्याच्या पुस्तकावर १६१६ मध्ये बंदी घालण्यात आली.

योहानेस केपलर (जन्म १५७१) या जर्मन धर्मोपदेशकाने खगोलशास्त्राचा अभ्यास केला आणि पृथ्वीऐवजी सूर्य हा विश्वाचा केंद्रबिंदू असून अन्य विश्वे त्याच्याभोवती फिरत आहेत असा सिद्धान्त मांडला. त्याच्या वेळी बुध, शुक्र, मंगळ, पृथ्वी, गुरू आणि शनी हे सहाच ग्रह मानले जात. केपलरने ही संख्या जास्त असणार असे मानून अभ्यास पुढे चालवला. टायको ब्राहे या गणितज्ञाकडे ग्रहाविषयीच्या निरीक्षणाची अचूक नोंद होती; तो रोमन राजा रुडॉल्फ याच्या दरबारातला गणिती होता. टायकोने आपल्या नोंदी केपलरला देण्याचे टाळले; परंतु पुढे मरतेवेळी त्या केपलरला देण्याचे औदार्य दाखवले. तीन वर्षे त्यांचे अध्ययन केल्यावर ग्रहांच्या कक्षा काटेकोर वर्तुळाकार नसाव्यात; अंडाकृती असाव्यात; वर्तुळाकार कक्षा व खरी कक्षा यातील फरक ओळखण्यासाठी अपोलोनिअसच्या लंबवृत्ताचे सूत्र वापरावे लागेल हे त्याच्या लक्षात आले. 'हार्मनीज् ऑफ द वर्ल्ड' या पुस्तकात त्याने तीन सिद्धान्त मांडले. कुठल्याही ग्रहाला त्याच्या कक्षेतील एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या वेळाचा वर्ग हा त्या संग्रहाच्या सूर्यापासूनच्या अंतराच्या घनाच्या प्रमाणात असतो हा केपलरचा तिसरा नियम होय. त्याचबरोबर सूर्याचा ग्रहांच्या गतीवर होणारा परिणाम– शोधण्याचाही त्याने प्रयत्न केला. खगोलशास्त्र हा भौतिकशास्त्राचाच एक भाग आहे, विश्वाच्या निर्मितीमागे दैवी कल्पनांचा आधार घेण्याची गरज नाही असे मत त्याने मांडले. तो पहिला खगोलशास्त्रज्ञ ठरतो. चर्चच्या प्रचलित मतप्रणालीच्या विरोधी भूमिका मांडल्याने त्याला निर्वासिताचे जीवन जगणे भाग पडले; त्याच्या आईला तुरुंगात डांबण्यात आले. का? तर केपलरने लिहिलेल्या एका विज्ञानकथेतला नायक टायको ब्राहेला भेटतो आणि त्याची आई चेटूक तंत्रमंत्रावर विश्वास ठेवणारी असते असे त्या कथेत म्हटलेले असते. आईला मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली तेव्हा केपलरने वैज्ञानिक भूमिकेतून युक्तिवाद केला; आणि तिला मृत्युदंडाऐवजी हद्दपारीची सजा सुनावण्यात आली. विज्ञानधिष्ठित सत्याने अंधश्रद्धेवर मात केली याचे हे पहिले उदाहरण. पुढे अर्थार्जनासाठी केपलरला सरदारांच्या कुंडल्या मांडून भविष्यकथन

**खगोलशास्त्र हा भौतिकशास्त्राचाच एक भाग आहे, विश्वाच्या निर्मितीमागे दैवी कल्पनांचा आधार घेण्याची गरज नाही असे मत त्याने मांडले. तो पहिला खगोलशास्त्रज्ञ ठरतो. चर्चच्या प्रचलित मतप्रणा लीच्या विरोधी भूमिका मांडल्याने त्याला निर्वासिताचे जीवन जगणे भाग पडले; त्याच्या आईला तुरुंगात डांबण्यात आले.**

करणे भाग पडले. पृथ्वीवरून लवकरच अवकाशयाने फेऱ्या मारतील हे त्याचे भविष्य– आज प्रत्यक्षात उतरले आहे.

आयझॅक न्यूटनचा जन्म केपलरच्या मृत्यूनंतर ३६ वर्षांनी, २५ डिसेंबर १६४२ रोजी झाला. ज्योतिर्विद्या, युक्लिडची भूमिती वगैरे पुस्तके त्याने ऐन कुमारवयात वाचली. १६६६ मध्ये त्याने डिफरेन्शियल आणि इंटेग्रल कॅलक्युलस, प्रकाशाचे स्वरूप, गुरुत्वाकर्षण सिद्धान्ताचा पाया हे शोध लावले. गतीचे तीन नियम मांडले. न्यूटनने हे नियम पूर्णतया गणिताच्या आधारे मांडले व सिद्ध केले. पुढे लेबनिझने स्वतंत्ररीत्या डिफरेन्शियल आणि इंटेग्रल कॅलक्युलस शोधून काढले. केपलर आणि न्यूटन या दोघांनी ही सृष्टी काही विशिष्ट नियमांनी बद्ध आहे आणि हे नियम विश्वव्यापी आहेत हे माणसाच्या लक्षात प्रथम आणून दिले. त्यामुळे त्या दोघांना मानवी इतिहासात मानाचे स्थान आहे. न्यूटननंतर भौतिकशास्त्रात क्रांतिकारक प्रमेय मांडण्यात आले ते आइनस्टाइनकडून, हे येथे जाता जाता नमूद करायला हवे.

**ज्योतिर्विद्या, युक्लिडची भूमिती वगैरे पुस्तके त्याने ऐन कुमारवयात वाचली. १६६६ मध्ये त्याने डिफरेन्शियल आणि इंटेग्रल कॅलक्युलस, प्रकाशाचे स्वरूप, गुरुत्वाकर्षण सिद्धान्ताचा पाया हे शोध लावले. गतीचे तीन नियम मांडले. न्यूटनने हे नियम पूर्णतया गणिताच्या आधारे मांडले व सिद्ध केले.**

सूर्याच्या ग्रहमालेतील प्रत्येक ग्रहाचे स्वरूप वेगळे व वैशिष्ट्यपूर्ण आहे.

शुक्र ग्रहाला आपण सौंदर्याचे प्रतीक मानतो; परंतु तो एक दु:सह ग्रह आहे. तेथील ढग आणि वातावरण हे प्रकाशाच्या दृष्टीने अर्धपारदर्शक आहे. दृश्य प्रकाशामुळे शुक्रावरील पृष्ठभाग तापतो व उष्णता पुन्हा परावर्तित करतो. सूर्याच्या मानाने शुक्र फारच थंड आहे. तो आपली उष्णता दृश्य प्रकाशाऐवजी अवरक्त लहरीतून परावर्तित करतो; त्यामुळे ती उष्णता साठवली जाते व पृष्ठभागाचे तापमान वाढते. खालील वातावरण, पृष्ठभागातला शोषला गेलेला प्रकाश आणि उत्सर्जित होणाऱ्या अल्पस्वल्प अवरक्त लहरी यांचे संतुलन साधेपर्यंत हे तापमान वाढत राहते.

सूर्यमालेतील सर्वच ग्रहांवर नैसर्गिक उत्पात होत असतात. भूकंप, ज्वालामुखी, पडझड यामुळे भुपृष्ठाची रचना बदलत राहते.

पृथ्वीवरील तापमान वाढण्यामागे मात्र नैसर्गिक उत्पाताबरोबरच माणूसही तितकाच कारणीभूत ठरत आहे.

पेट्रोलियमजन्य खनिजे हे पृथ्वीवरील संस्कृतीचे उर्जास्रोत ठरले आहे. पृथ्वीवरील वातावरण जीवनसृष्टीच्या अस्तित्वाला आणि वाढीला पोषक आहे. अन्य ग्रहांवर सजीवसृष्टी असल्याचे अजून तरी आढळलेले नाही. एकूण विश्वाच्या पसाऱ्यात



पृथ्वी हा ग्रह फार लहान आहे. त्यामुळे त्यावरील प्रदूषणापासून वातावरण मुक्त राहण्यातच जीवसृष्टीचे अस्तित्व अवलंबून आहे.

मंगळ हा ग्रह पृथ्वीसारखाच आहे. मंगळावर पृथ्वीप्रमाणेच बर्फाळ ध्रुवीय वातावरण आहे; तरंगणारे पांढरे ढग, धुळीची वादळे मंगळावर आढळतात. पर्सिव्हल लॉवेल, गीथोव्हानी शिआपरेली, अल्फ्रेड रसेल वॉलेस यांनी मंगळाविषयी काही अंदाज वर्तवले; ते मरीनर-९ या यानाने पाठवलेल्या छायाचित्रांवरून बहुतांशी चुकीचे असल्याचे निष्पन्न झाले. मंगळाच्या पृष्ठभागावर मोसमानुसार बदलणारी किनार आहे; ती विवरांच्या आजूबाजूला भिंतीसदृश भागाला जोडली गेलेली आहे; असे या छायाचित्रांवरून जाणवते.

ज्यांच्या शरीरात पाणी द्रवरूपात आहे असे सजीव मंगळावर असणे संभाव्य नाही; कारण तेथील वातावरणाचा दाब कमी असल्याने शरीरातले पाणी बाहेर येण्याची शक्यता अधिक असणार. कार्ल सॅगन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रयोगशाळेत मंगळसदृश वातावरण असणारे कक्ष तयार करून त्यात पृथ्वीवरचे काही जीवाणू सोडले. (मार्स जार्स) ...त्यातील बहुतेक जीवाणू पहिल्याच रात्री गोठून मेले; काही बचावले पण त्यांची पुनरुत्पादनाची प्रक्रिया थांबली. पाण्याचा अंश असलेल्या भागात मात्र जीवाणू जगले.

कार्ल सॅगन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रयोगशाळेत मंगळसदृश वातावरण असणारे कक्ष तयार करून त्यात पृथ्वीवरचे काही जीवाणू सोडले. (मार्स जार्स) ...त्यातील बहुतेक जीवाणू पहिल्याच रात्री गोठून मेले;

**मंगळावरचे वातावरण थंड आहे. स्वच्छ गुलाबी रंगाचे आकाश आहे.** मंगळावर वाऱ्याचा वेग प्रचंड असतो तेव्हा त्यावर दिसून येणारे काळसर आणि चकचकीत आकार बदलताना दिसतात. मंगळाची भूमी लालसर आहे. मात्र तेथे कालवे, पायाचे ठसे, उंदीर, माणूस– वगैरे कशाचेही अस्तित्व जाणवले नाही. मंगळाच्या पृष्ठभागावर बरीच विवरे आहेत. तेथे पाणी व कार्बन आहे, त्यामुळे मंगळावर जर जीवन असलेच तर ते कार्बनी रसायनशास्त्रावर आधारित असणार असा अंदाज शास्त्रज्ञ व्यक्त करतात.

गुरू हा ग्रह शक्तिशाली भारवाहक कणांनी वेढला गेलेला आहे. त्यामुळे तो धोकादायक मानला जातो. व्हॉयेजर-१ ने गुरूच्या गॅलिलिअन या उपग्रहाची छायाचित्रे पाठवली. गुरूचा आयो हा उपग्रह रंगाने तांबडालाल आहे. आयोच्या कक्षेत सल्फर, सोडिअम, पोटॅशिअमच्या अणूंची नळी आहे. आयोवर सतत शिळांचा, उल्कांचा मारा होत असणार. विवरेही असणार. मात्र तसे विवर प्रत्यक्षात

आढळलेले नाही. आयोच्या पृष्ठभागावरील ज्वालामुखी जमिनीच्या पोटातील गंधक बाहेर टाकतात. ते तप्त गंधक वितळून पृष्ठभागावर साठते. आयोचा पृष्ठभाग दरमहा बदलत राहतो. आयोवरील ज्वालामुखीतून निघणाऱ्या ज्वाळा प्रचंड उंचीच्या असतात. गुरू हा सर्वात मोठा ग्रह आहे आणि त्याला सूर्याकडून जी उर्जा मिळते, त्याच्या दुप्पट उर्जा गुरू ग्रह अवकाशात परावर्तित करत असतो. तेथील प्रचंड दाबामुळे हायड्रोजन अणूतील इलेक्ट्रॉन एकमेकांजवळ येतात व त्यातून द्रवरूप हायड्रोजन तयार होतो. पृथ्वीवर द्रवरूप हायड्रोजन कधीच आढळत नाही. पृथ्वीच्या पृष्ठभागावरील वातावरणाच्या दाबापेक्षा गुरूच्या अंतर्भागातील दाब तीस लक्ष पटींनी जास्त आहे. गुरूच्या वातावरणात अमोनिया हा वायूही आढळला आहे.

सूर्य कालांतराने जसजसा लाल होत जाईल तसतसे सूर्याच्या ग्रहमालेतील ग्रहांचे भविष्य धूसर बनेल... सुपरनोव्हा म्हणजे स्फोट पावणारा तारा. त्याच्या अंतर्भागात प्रचंड तापमान असते. हेलियम व न्यूट्रॉन यांच्या एकत्रीकरणाने नवीन मूलद्रव्ये निर्माण होतात. ताऱ्यांचे आकुंचन होते व नंतर तो स्फोट होतो. सुपरनोव्हा फुटून होणाऱ्या स्फोटामुळे ग्रह वितळणार मात्र नाहीत. सूर्यापेक्षा मोठे असलेले तारे अधिक काळ टिकून राहतील.

**सूर्य कालांतराने जसजसा लाल होत जाईल तसतसे सूर्याच्या ग्रहमालेतील ग्रहांचे भविष्य धूसर बनेल... सुपरनोव्हा म्हणजे स्फोट पावणारा तारा. त्याच्या अंतर्भागात प्रचंड तापमान असते. हेलियम व न्यूट्रॉन यांच्या एकत्रीकरणाने नवीन मूलद्रव्ये निर्माण होतात. ताऱ्यांचे आकुंचन होते व नंतर तो स्फोट होतो.**

सूर्यापेक्षा वीसपट जास्त वस्तुमान असणारा तारा गुरुत्वीय बलामुळे आकुंचन पावत जाईल. त्याचा आकार कमी होईल. स्थळकाळाच्या स्वत:च निर्माण केलेल्या फटीतून तो निसटेल आणि आपल्या विश्वातून अदृश्य होईल...(१२८)

प्रकाशकिरण सरळ रेषेत जातात; परंतु त्याचे गुरुत्वीय बल हजार-लाख पटींनी वाढवले तर सर्व विश्व चिरडले जाईल; ते अब्ज पटींनी वाढवत नेले तर प्रकाशकिरण वक्राकार होऊन त्या ठिकाणापासून बाहेर पडण्याची शक्यताच दुरावते. अशा ठिकाणाला कृष्णविवर म्हणतात. या कृष्णविवरात प्रकाशकिरण अडकून राहतात. कृष्णविवर दिसत नाही पण त्याच्या गुरुत्वीय बलामुळे त्याचे अस्तित्व जाणवते. (१२८) कृष्णविवराला तळ नाही; अंत नाही. पण कृष्णविवर सतत फिरत असते असे गृहीत धरले जाते. कृष्णविवरांचा वापर कालयंत्रासारखा होऊ शकेल अशी कल्पना विज्ञानकथाकार मांडतात.



आकाशगंगा कशी दिसेल याबद्दलची एक कल्पना अशी मांडता येईल.

चारशे अब्ज खगोलांना घेऊन फिरणारी, मध्यबिंदूकडे चक्राकार गतीने जाणाऱ्या असंख्य बिंदूंनी साकार झालेल्या आकृतीप्रमाणे, प्रचंड मेघांनी आकुंचन पावणाऱ्या ग्रहमालांनी भरलेली, देदीप्यमान, रक्तवर्णी, श्वेतवर्णी ताऱ्यांनी जडवलेली, न्यूट्रॉन ताऱ्यांची, नोव्हा-सुपरनोव्हा मेघ:पुंजांची, कृष्णविवरांची, रत्नांकित आकाशगंगा किती विलक्षण, सुंदर दिसेल?... या आकाशगंगेमधूनच आपल्याला आपल्या पृथ्वीचं, आपलं, आपल्या जीवनाचं दर्शन घडू शकेल. (१३१)

महास्फोटानंतर साधारणत: एक अब्ज वर्षांनी या विश्वातील वस्तुमान अस्ताव्यस्त झाले... ताऱ्यांचा उदय, सुपरनोव्हाचे स्फोट, गुरुत्वाकर्षणामुळे त्यांचे आकुंचन अशा अनेक प्रक्रियांतून विश्वात आकाशगंगा आणि तारे उदयाला आले. जॉर्ज गॅमॉव या शास्त्रज्ञाने विश्वाची निर्मिती महास्फोटातून झाली असावी असा सिद्धांत प्रथम मांडला (१९४८). त्याच्या पुष्टीसाठी महास्फोटानंतर ३ लक्ष वर्षे हे विश्व आहे त्याच स्थितीत होते. तोपर्यंत अणू व अणुकेंद्रे निर्माण झाली नव्हती...

**चारशे अब्ज खगोलांना घेऊन फिरणारी, मध्यबिंदूकडे चक्राकार गतीने जाणाऱ्या असंख्य बिंदूंनी साकार झालेल्या आकृतीप्रमाणे, प्रचंड मेघांनी आकुंचन पावणाऱ्या ग्रहमालांनी भरलेली, देदीप्यमान, रक्तवर्णी, श्वेतवर्णी ताऱ्यांनी जडवलेली, न्यूट्रॉन ताऱ्यांची, नोव्हा-सुपरनोव्हा मेघ:पुंजांची, कृष्णविवरांची, रत्नांकित आकाशगंगा किती विलक्षण, सुंदर दिसेल?...**

दुर्बिणीने आपल्या दृष्टिपथावर येणारे विश्व हे साधारणत: दशअब्ज प्रकाशवर्षाइतक्या लांबीचे आहे...

विश्वाच्या निर्मितीबाबत 'विश्व हे देवाने शून्यातून निर्माण केले' ही अनेक संस्कृतींनी मांडलेली कल्पना भारतीय तत्त्वज्ञानाने स्वीकारलेली नाही. **विश्व हे देवाने निर्माण केले असे मानायचे तर देव कुठून आला असा सवाल भारतीय तत्त्वज्ञान करते.** नासदीय सूक्तात म्हटले आहे,

*तम आसीत्तमसा गूळ्हमग्रेऽ प्रकेतं सलीलं सर्वमा इदम्*
*तुच्छयेनाभ्वपिहितं यदासीत्तपसत्तन्महिना जायतैकम्।। (१०.१२९)*

सृष्टीच्या प्रारंभी अप्रकाशित अस्तित्व अंधारातच जाणिवेच्या पार दडून होते. (ब्रहन आणि माया) यांचे अविभाज्य अस्तित्व तरंगरूपात सर्वत्र अस्तित्वात झाले. त्याने सर्व विश्व स्वत:त सामावून घेतले. ते स्वत:च्या अत्युच्च तापमानामुळे अस्तित्वात आले. आपल्या ऋग्वेदकालीन ऋषींनी पुंजयामिकाचे (क्वांटम मेकॅनिक्सचे) आणि सापेक्षतावादाचे नियम आपल्या प्रतिभेने विश्वोत्पत्तीबाबत मांडलेले होते– असे म्हणावे लागते.

(सत्चा) हा निसर्ग म्हणजे पसारा कशापासून किंवा कोठून आला? हे यापेक्षा विस्ताराने कोण सांगणार? हे कोण निश्चित जाणतो? देवही या सृष्टीच्या निर्मितीनंतरचे. मग ती जेथून निघाली ते उगमस्थानात कोण जाणणार?

सत्चा हा निसर्ग म्हणजे पसारा जेथून निर्माण केला गेला, तो परम आकाशात असणारा या जगाचा जो अध्यक्ष (हिरण्यगर्भ) तो जाणीत असेल किंवा नसेल? (कोणी सांगावे?)

संपूर्ण विश्वच जन्म आणि मृत्यूच्या चक्रातून फिरत आहे असे मानणारा हिंदू हा एकमेव धर्म आहे असे डॉ. कार्ल सॅगन म्हणतात. ब्रह्मदेवाचा एक दिवस व रात्र ही प्रत्येकी ८.६४ अब्ज वर्षांची असे मानले जाते. आधुनिक विज्ञानानुसार महास्फोटाला आता १७.२८ अब्ज वर्षे (ब्रह्मदेवाचा एक दिवस) झाली आहेत. हे विश्व म्हणजे ब्रह्मदेवाला दर शंभर वर्षांनी पडणारे स्वप्न आहे असे वैदिक तत्त्वज्ञानात म्हटले आहे.

**ब्रह्मदेवाचा एक दिवस व रात्र ही प्रत्येकी ८.६४ अब्ज वर्षांची असे मानले जाते. आधुनिक विज्ञानानुसार महास्फोटाला आता १७.२८ अब्ज वर्षे (ब्रह्मदेवाचा एक दिवस) झाली आहेत. हे विश्व म्हणजे ब्रह्मदेवाला दर शंभर वर्षांनी पडणारे स्वप्न आहे असे वैदिक तत्त्वज्ञानात म्हटले आहे.**

या सृष्टीत सजीव प्राण्याची निर्मिती व उत्क्रांती कशी होत गेली याबद्दलही खूप तर्कवितर्क व संशोधन झालेले आहे. आजही चालू आहे.

देवमासा आणि माणूस यांच्या डीएनएमध्ये ५ × $१०^{९}$ बिट्स इतकी माहिती साठवलेली असते.

माणसाचा मेंदू हा लक्षावधी वर्षांच्या उत्क्रांतीनंतर आजच्या अवस्थेला आलेला आहे. तो आतून बाहेर उत्क्रांत झालेला आहे.

मेंदूच्या मुळाशी असलेला मस्तिष्कस्तंभ हा भाग अत्यंत प्राचीन आहे. हा भाग सजीवांना आवश्यक त्या मूलभूत घटना पार पाडतो. उदा. हृदयाचे स्पंदन, श्वासोच्छ्वास.)

जालरचना (आर कॉम्प्लेक्स) ही मस्तिष्क स्तंभाची टोपी आहे. आक्रमकता, ममत्व, समाजरचना, कर्मकांड या गोष्टींच्या ज्ञानासाठी आवश्यक ते केंद्र यात असते.

या जालरचनेवरचा भाग म्हणजे परिघी संस्था (लिम्बिक सिस्टिम). या भागावरील मेंदूचा भाग हा बुद्धिमत्तेचा द्योतक.

मेंदूच्या वरच्या आवरणाला मस्तिष्क बाह्यांग (सेरेब्रल कॉर्टेक्स) म्हणतात.



मानवी मन, संवेदना, चेतना या साऱ्या जाणिवांना हा भाग कारणीभूत आहे.

मेंदूच्या बाह्यांगातील चेतापेशींच्या जोडणीची संख्या $१०^{१४}$ आहे. जीन्स व मेंदू या व्यतिरिक्त ज्ञान स्वत:च्या सोयीने साठवू शकणारा माणूस हा एकमेव प्राणी आहे.

हे ज्ञान माणसाने पुस्तकांच्या रूपाने साठवले आहे.

ज्यांना रेडिओ तंत्रज्ञान वापरता येते ती प्रगत जीवसृष्टी. तिला N समजू या.

No आकाशगंगेतील तारे

fp असे तारे की ज्यांना त्यांच्या स्वत:च्या ग्रहमाला आहेत.

ne जीवसृष्टी निर्माण होण्याजोगे ग्रह

fl ज्या ग्रहांवर जीवसृष्टी आहे असे ग्रह

fi ज्या ग्रहांवर प्रगत जीव उत्क्रांत झाले आहेत असे ग्रह

fc ज्या ग्रहांवरे संपर्काचे प्रगत तंत्रज्ञान निर्माण झाले आहे.

fL ज्या ग्रहांच्या आयुष्यकाळात प्रगत जीवसृष्टी आहेतच.

N = No fp nes fl fi fc fL

No = ४ × $१०^{११}$

तारे हे दीर्घायुष्यी आहेत. ते जवळपासच्या ताऱ्यांना उत्क्रांतीसाठी आवश्यक त्या शक्ती पुरवू शकतील. म्हणून ग्रहमाला असलेल्या तारकांची संख्या N.fp = १.३ × $१०^{११}$ इतकी असू शकेल. इत्यादी तर्क मांडण्यात आलेले आहेत.

**मेंदूच्या बाह्यांगातील चेतापेशींच्या जोडणीची संख्या $१०^{१४}$ आहे. जीन्स व मेंदू या व्यतिरिक्त ज्ञान स्वत:च्या सोयीने साठवू शकणारा माणूस हा एकमेव प्राणी आहे.**

आपल्या आकाशगंगेत लक्षावधी जीवसृष्टी असतील; त्यापैकी सर्वात जवळची जीवसृष्टी ही २०० प्रकाशवर्षे दूर असेल.

आपली संस्कृती ही अत्यंत मागासलेली आहे. परग्रहावरील जीवसृष्टी अधिक सुसंस्कृत असेल किंवा आपली सृष्टी कधी कुणी शोधलीच नसेल.

मानवी आयुष्याला एक मर्यादा आहे. ज्ञान, शास्त्र आणि तंत्रज्ञानातील प्रचंड प्रगती यामुळे ही मर्यादा ओलांडता आली तर– कदाचित दुसऱ्या प्रगत संस्कृतीशी, जीवसृष्टीशी आपला संपर्क येऊही शकेल. पण देश, धर्म, जात, परंपरा, अहंकार, सत्ताभिलाषा यांनी त्यामध्ये आड येता कामा नये. एकूणच अंतरिक्षाबद्दल आपले कुतूहल वाढविणारे हे पुस्तक आहे.

**पृष्ठे : २०८ ● किंमत : १५०रु. ● सभासदांना : ११३रु. ● पोस्टेज : २५रु.**




## युद्धकथा

**निरंजन घाटे**

**दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील अचाट पराक्रमाच्या रोमांचकारक कहाण्या**

निरंजन घाटे विज्ञानविषयक माहितीपर पुस्तकांच्या लेखनासाठी प्रसिद्ध आहेत; तसेच सदर लेखनासाठी आकर्षक अन्य विषयही हाताळण्यात कुशल आहेत. युद्धाशी संबंधित अशा अनेक घटना आणि पराक्रम गाजवणाऱ्या व्यक्ती यांच्यावर युनिक फिचर्ससाठी त्यांनी लेखमाला लिहिली. तिचे संकलन युद्धकथा या नावाने १९९७ साली प्रसिद्ध केले. त्या पुस्तकाची दुसरी आवृत्ती नुकतीच बाजारात आली आहे. युद्धस्य कथा रम्य असे म्हणतात; आणि पराक्रमाचे वेगवेगळे किस्से ऐकायला, सांगायला सर्वांना आवडते. युद्धावरचे चित्रपटही लोकप्रिय होतात. युद्धामध्ये गाजवलेल्या शौर्यधैर्याचे कौतुक आणि माहात्म्य कथादंतकथांच्या रूपाने पिढ्यानुपिढ्या प्रेरणादायक ठरते.

निरंजन घाटे यांनी दुसऱ्या महायुद्धातल्या अनेक घटनांवर आणि वीरपुरुषांवर प्रकाश टाकला आहे. काही व्यक्ती त्यामुळे आपल्याला नव्यानेच परिचित होतात.

**जर्मनांचा कर्दनकाळ मालान**

पहिल्याच लेखात जर्मनांचा कर्दनकाळ सेलर मालान याची माहिती आली आहे. त्याच्या नावावर शत्रूची ३५ विमाने पाडल्याचा पराक्रम नोंदवला गेला आहे. तो जन्माने दक्षिण आफ्रिकन होता. त्याचे मूळ नाव ॲडॉल्फ गिल्बर्ट मालान. परंतु हिटलरमुळे बदनाम झोलेले ॲडॉल्फ हे नाव त्याने शाळकरी वयातच सोडून दिले आणि तेराव्या वर्षी तो शाही नौदलात भरती झाला. वैमानिक बनायचे त्याचे स्वप्न होते. १९३६ साली ब्रिटिश शाही विमानदलाला वैमानिकांची गरज आहे असे त्याला कळले आणि त्याने आपली आधीची नोकरी सोडून विमानदलात प्रवेश घेतला. मालानने १०० कामगिऱ्यांमध्ये भाग घेतला; एकदा तर त्याच्या स्पिटफायटरवर तोफेचा गोळा पडला आणि तो गोळा विमानाचे



पोट फाडून पुढे गेला; मालानच्या हाताला व मांडीला जखमा झाल्या; तसेच विमान वळवणाऱ्या पंख्याचा भाग तुटून खाली पडला. विमान उतरवायला चाकेच उरली नाहीत. तरीही त्याने आपले विमान इंग्लंडमध्ये परत आणले आणि चाके नसतानाही धावपट्टीवर व्यवस्थित उतरवले... या पराक्रमाबद्दल त्याला डिस्टिंग्विश्ड् फ्लाइंग क्रॉस मिळाला. राजे सहावे जॉर्ज यांनी त्याच्या छातीवर मानचिन्ह लावले आणि स्वत: चर्चिलही विंग कमांडर मालान ह्याचा सल्ला घेऊ लागले. मालानने शत्रूची ३५ विमाने पाडून एक विक्रमच केला. त्याच्यापेक्षा जास्त ३ विमाने जॉनी जॉन्सनने पाडली होती; त्यामुळे मालानचा क्रमांक दुसरा आला.

**जपानचा पहिला मोठा पराभव**

७ डिसेंबर १९४१ रोजी जपानी विमानांनी पर्ल हार्बरच्या अमेरिकन तळावर हल्ल चढवला आणि तेथील अमेरिकेचे आरमार बहुतांशी नष्ट केले. पुढच्या सहा महिन्यांत मलेशिया, इंडोनेशिया, सिंगापूर काबीज करून ब्रह्मदेशाकडे कूच केले; ऑस्ट्रेलियाकडेही सैन्य वळवले. त्यावेळी ॲडमिरल यामामोटो याने अमेरिकेच्या ताब्यातील मिडवे प्रवाळद्वीप समूहावर हल्ला करण्याचा घाट घातला. मिडवे बेट जिंकून घेतले तर अमेरिकनांचे उरलेसुरले आरमारही नष्ट करता येईल हा त्याचा होरा.

जपानी सैनिकांनी मिडवेवरील हल्ल्याची जय्यत तयारी केली. दहा मोठ्या युद्धनौका, आठ विमानवाहू नौका, चोवीस छोट्या युद्धनौका (क्रूझर), सत्तर विनाशिका; पंधरा पाणबुड्या, चाळीस सैन्यवाहू जहाजे एकत्र करून तीन मुख्य गट पाडले. फर्स्ट कॅरिअर टास्क फोर्सचे नेतृत्व नगुमो या दर्यासारंगकडे होते. मिडवेची कामगिरी नगुमोवर सोपवण्यात आली. ४ जूनला नुगमोंनी आपल्या बाँबफेकी विमानांना दक्षिणेकडे ३२० किलोमीटरवर असलेल्या मिडवेवर हल्ला चढवा असा आदेश दिला. एकशे सहा विमानांची टोळी मिडवेकडे निघाली. तेव्हा अमेरिकेनेही आपली बी-१७ विमाने कर्नल वॉल्टर स्वीनी याच्या नेतृत्वाखाली पाठवली. जपानी वेगवान विमानांनी अमेरिकेच्या जुनाट विमानांचा काही मिनिटांतच खिमा केला. सव्वीसपैकी फक्त दहा विमाने मिडवेवर परतली. जपानी विमानांनी केलेल्या बाँबहल्ल्यात एक तेलटाकी पेटली. वीजकेंद्राला आग लागली. दहा मिनिटांतच बरेच काही उद्‌ध्वस्त केले गेले. परंतु धावपट्टी शाबूत होती. तोफाही व्यवस्थित होत्या तेव्हा आणखी एक हल्ला करायला हवा असा संदेश नगुमोंनी लेफ्टनंट टोगोनागा यांना पाठवला... त्याच

**जपानी सैनिकांनी मिडवेवरील हल्ल्याची जय्यत तयारी केली. दहा मोठ्या युद्धनौका, आठ विमानवाहू नौका, चोवीस छोट्या युद्धनौका (क्रूझर), सत्तर विनाशिका; पंधरा पाणबुड्या, चाळीस सैन्यवाहू जहाजे एकत्र करून तीन मुख्य गट पाडले.**

वेळी अमेरिकेची बॉंबफेकी विमाने नगुमोंवर पाणतीर फेकू लागली; जपान्यांनी अमेरिकेची आठ विमाने पाडली आणि आठ निकामी झाल्याने मिडवेला परतली. जपानी जहाजांचे काहीही नुकसान झाले नाही. अमेरिकन काफिल्यात विमानविरोधी नौका नव्हत्या हे नगुमोला कळताच त्याने मिडवेवर हल्ला करण्याचे ठरवले. त्याचवेळी अमेरिकेची नॉटिलस ही पाणबुडी त्या भागात आली... तिला परतवून लावण्याच्या प्रयत्नात जपानी विनाशिका अडकून राहिली.

या मोहिमेचा शेवट मात्र नगुमोला अवाक् करणारा ठरला. मॅक्क्लुस्कीच्या विमानांनी सहा मिनिटांत जपानच्या तीन विमानवाहू नौकांचा धुव्वा उडवला आणि लढाईचे पारडे फिरले... जपानी हिर्यू या बोटीला जलसमाधी मिळाली. नगुमोंच्या अधिपत्याखालील सर्व विमानवाहू नौका, विमाने व वैमानिक या लढाईत नष्ट झाले. अमेरिकनांनी या लढाई १५० विमाने, ३०७ सैनिक गमावले. जपानने ४ विमानवाहू नौका, २५३ विमाने, ३५०० सैनिक गमावले. जपानी नौदलाचा हा साडेतीनशे वर्षांतला पहिला मोठा पराभव होता. या पराभवाने दुसऱ्या महायुद्धात जपानच्या लष्करी प्रभुत्वाला पहिल्यांदाच मोठा हादरा बसला.

**नगुमोंच्या अधिपत्याखालील सर्व विमानवाहू नौका, विमाने व वैमानिक या लढाईत नष्ट झाले. अमेरिकनांनी या लढाई १५० विमाने, ३०७ सैनिक गमावले. जपानने ४ विमानवाहू नौका, २५३ विमाने, ३५०० सैनिक गमावले.**

**रग्बी फोर्सचा विजय**

द्राग्विना येथे आक्रमक जर्मन सैन्याला तोंड देत राष्ट्रांचे सैनिक जंगल व नद्या पार करून जर्मनांच्या पिछाडीला पोहोचले. त्यांनी जर्मन सैन्याचे मुख्यालय उद्ध्वस्त केले. साडेतेराशे जर्मन सैनिकांना शरण येण्यास भाग पाडले. या हल्ल्यात ९७३२ सैनिक, २२१ जिप्स, २९३ तोफा, १ लक्ष किलो युद्धाहित्य आणि ४०७ ग्लायडर्स वापरण्यात आले. अमेरिकेच्या 'रग्बी फोर्स'ने मिळवलेला हा विजय जर्मनांचे मनोधैर्य खच्ची करणारा ठरला.

**विनगेटचा गनिमी कावा**

१९४३ मध्ये आठ ब्रिटिश तुकड्यांनी गुप्तपणे भारतातून ब्रह्मदेशात प्रवेश करून तेथील जपानी सैनिकांना गनिमी काव्याने तीन महिने सळो की पळो करून सोडले. त्यांचे नेतृत्व विनगेट यांजकडे होते. त्यांनी जपानी ठाणी उद्ध्वस्त केली. पूल उडवले, विमानतळ उद्ध्वस्त केले. रेल्वेरूळ उखडले... विनगेटने ब्रह्मदेशात तीनशे मैल घुसून जो धुमाकूळ घातला त्याला संताजी-धनाजीच्या पराक्रमाचीच उपमा शोभेल. असा धुमाकूळ घालून हे सैनिक बहुतांशी भारतात सुखरूप परत आले. त्यात भारतीय, गुरखा, ब्रह्मी, अमेरिकन आणि ब्रिटिश



सैनिक होते. सगळे विवाहित होते. आधी त्यांनी जंगल कधी बघितलेले नव्हते. परंतु सहा महिने त्यांना जंगलात फिरणे, नद्या ओलांडणे, जळवा काढणे, जड ओझे घेऊन मैलोगणती चालणे वगैरे प्रशिक्षण देण्यात आले. या तुकडीकरिता कलकत्त्याच्या एका हॉटेलमधून २०० किलो चॉकोलेट तयार करून ख्रिसमससाठी. विमानाने पाठवण्यात आले होते. १९४४ साली एका विमान अपघातात विनिगेटचे निधन झाले. त्याला लॉरेन्स ऑफ बर्मा, न्यू लॉरेन्स म्हणून ओळखले जाई.

**फ्रेंच भूमिगत कार्यकर्ता**

ब्रासोलेत द ब्रेव्ह हा फ्रेंच भूमिगत कार्यकर्ता इंग्लंडमध्ये येण्याच्या प्रयत्नात असतो. तो एका मच्छिमारी पडावातून फ्रान्सचा किनारा सोडतो; पण वादळात तो पडाव फुटतो. ब्रासोलेतला किनाऱ्यावर फ्रेंच पोलिस पकडतात आणि रेनेच्या तुरुंगात टाकतात. ही बातमी कळल्यावर त्याचा मित्र थीओ-थॉमस त्याला सोडवण्यासाठी रेने तुरुंगाच्या परिसरात हवाई छत्रीने उतरतो. आत प्रवेश करून ब्रासोलेतला सोडवण्याची योजना आखतो... पण तो आपल्या मदतीला येणाऱ्या तरुणाची वाट पाहात असताना पोलिसांच्या कचाट्यात सापडतो. गेस्टापो त्याला पोलिस ठाण्यावर नेतात. त्याला मारहाण करतात. त्याच्याबरोबर ब्रासोलेतलाही तेथे आणण्यात येते तेव्हा पाचव्या मजल्यावरून उडी मारून ब्रासोलेत आत्महत्या करतो... थीओ थॉमसला जर्मनीच्या बुखेनवाल छळछावणीत हलवतात. मानवी गिनिपिग म्हणून त्याचा देह वापरायचे ठरवतात.. त्याचवेळी एक डॉक्टर त्याला पळून जायला मदत करतो... थीओ थॉमस फ्रान्समध्ये परत येतो... मानाने त्याला इंग्लंडमध्ये आणले जाते. 'विंग कमांडर' केले जाते. अनेक पदके त्याला मिळतात. त्याच्या आख्यायिका सर्वदूर पसरतात. 'व्हाइट रॅबिट' म्हणून लोक त्याचा प्रेमाने उल्लेख करतात. ब्रॉसोलेतला वाचवण्यात यश न मिळाल्याची खंत मात्र त्याला वाटत राहते.

**१९४३ मध्ये आठ ब्रिटिश तुकड्यांनी गुप्तपणे भारतातून ब्रह्मदेशात प्रवेश करून तेथील जपानी सैनिकांना गनिमी काव्याने तीन महिने सळो की पळो करून सोडले. त्यांचे नेतृत्व विनगेट यांजकडे होते. त्यांनी जपानी ठाणी उद्ध्वस्त केली. पूल उडवले, विमानतळ उद्ध्वस्त केले. रेल्वेरूळ उखडले...**

**हिरोशिमा-नागासाकी**

अणुबॉंबने हिरोशिमा आणि नागासाकी ही जपानी शहरे उद्ध्वस्त करण्यात येतात. त्यावेळची वैमानिकांची मन:स्थिती, त्याबाबत राखलेली गुप्तता वगैरे तपशीलही या युद्धकथांमध्ये देण्यात आले आहेत.

अनेक अज्ञात शूर, पराक्रमी व्यक्तींची आणि घटनांची नव्याने ओळख करून देण्याचे काम 'युद्धकथा' द्वारे निरंजन घाटे यांनी केले आहे. जर्मन, फ्रेंच,

जपानी, ब्रिटिश, अमेरिकन– अशा अनेक देशांतील सैनिकांनी देशप्रेमासाठी आपल्या प्राणांचे बलिदान केलेले आहे, त्याचे स्मरण ठेवायला हवे.

**द मॅन हू नेव्हर वॉज**

युद्धामध्ये अनेकदा शत्रूची दिशाभूल करण्यासाठी खोटी कागदपत्रे तयार करून संबंधितांपर्यंत पोहोचवण्याची कटकारस्थाने रचली जातात. 'युद्धकथा'मध्ये अशी खोटी कागदपत्रेच नव्हे तर खोटी व्यक्तीही निर्माण केल्याची एक हकीकत आली आहे. **'दि मॅन हू नेव्हर वॉज'** हा चित्रपट याच हककीकतीवर आधारलेला आहे. सिसिली बेटावर जर्मनांचा हल्ला होण्याची दाट शक्यता ध्यानात घेऊन, जर्मनांची दिशाभूल करण्यासाठी काहीतरी करायला हवे असे ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या डोक्यात आले. त्याबद्दल चर्चा चालू असताना एका अधिकाऱ्याच्या मनात एक भन्नाट कल्पना आली. जर्मनांची दिशाभूल होईल अशी कागदपत्रे तयार करून ती एखाद्या प्रेताबरोबर पाठवायची. स्पेनच्या किनाऱ्यावर हे प्रेत सोडले तर जर्मन हेर त्या प्रेताबरोबरची कागदपत्रे बघतील आणि सिसिलीऐवजी जर्मनांचे सैन्य सार्डिनियाकडे केंद्रित करतील अशी त्यामागची कल्पना... आता हे प्रेत समुद्रकिनाऱ्याला लागायचे तर मरणोत्तर तपासणीत त्याच्या फुफ्फुसात पाणी असून चालणार नाही. कारण माणूस मेल्यावर त्याचे प्रेत पाण्यात टाकले तर त्यात पाणी सापडत नाही. तेव्हा वैद्यकीय तज्ज्ञांशी चर्चा करण्यात येते आणि न्यूमोनियाने मेलेली व्यक्ती आणि पाण्यात बुडालेली व्यक्ती या दोहोंच्याही फुफ्फुसात पाणी असते असे लक्षात येते. तेव्हा सार्वजनिक रुग्णालयात सापडलेल्या तशा एका व्यक्तीचे प्रेत मिळवून त्याला मेजर विल्यम मार्टिन, रॉयल मरीन्स अशी नवी ओळख देण्यात येते... त्याच्याजवळची कागदपत्रे अस्सल वाटावी, त्याची स्वत:ची कौटुंबिक आणि व्यावसायिक आयडेंटिटी असावी वगैरे बाबतीत दक्षता घेऊन... ते प्रेत स्पेनच्या किनाऱ्यावर टाकले जाते... त्या प्रेताबरोबरच्या कागदपत्रांमुळे जर्मन सैन्य खरोखरच सिसिलीकडे दुर्लक्ष करून सार्डिनियाकडे आपले सैन्य एकवटते; आणि सिसिली ताब्यात घेणे दोस्त राष्ट्रांना सोपे जाते... या मार्टिनची कबरही जिब्राल्टरच्या उत्तरेला १३० मैलांवरील स्पॅनिश खेड्यात आहे... या मेजर मार्टिनमुळे जर्मनांची कशी फसगत झाली हे युद्धसमाप्तीनंतर अनेक वर्षांनी जर्मनांची गुप्त कागदपत्रे ब्रिटिशांच्या हाती लागल्यावर उघडकीला आले... 'युद्धकथा'मधील हे एकूणच प्रकरण थक्क

> **युद्धामध्ये अनेकदा शत्रूची दिशाभूल करण्यासाठी खोटी कागदपत्रे तयार करून संबंधितांपर्यंत पोहोचवण्याची कटकारस्थाने रचली जातात. 'युद्धकथा'मध्ये अशी खोटी कागदपत्रेच नव्हे तर खोटी व्यक्तीही निर्माण केल्याची एक हकीकत आली आहे. 'दि मॅन हू नेव्हर वॉज' हा चित्रपट याच हककीकतीवर आधारलेला आहे.**



करणारे आहे.

...युद्धाच्या कथा रम्य असे त्यामुळेच म्हणतात. त्यात व्यक्तींच्या पराक्रमाबरोबर, व्यूहरचना, कटकारस्थाने यांचेही इरसाल व रोमांचकारक नमुने बघायला मिळतात. फील्ड मार्शल अर्विन रोमेल, जनरल जॉर्ज पॅटन, कॉरे गिडारच्या लढाईत गाजलेला जेसे कॅस्टिल्लो (प्रायव्हेट फर्स्ट क्लास), मायक्रोवेव्ह मॅग्नेट्रान बनविण्यात हातखंडा असलेला फ्ला. ले. हॉवर्ड गुल्डिंग कुंडाल, कॉंग्रेसशनल मेडल ऑफ ऑनर मिळवणारा फादर ओकॅलाहान, इंग्लंडसाठी हेरगिरी करणारी भारतीय राजकन्या नूर इनायतखान... अशा अनेक व्यक्तींच्या कामगिरीची आणि कर्तृत्वाची ओळख या पुस्तकामुळे वाचकांना होईल.

**पृष्ठे : १६४ ● किंमत : १२०रु. ● सभासदांना : ९०रु. ● पोस्टेज : २०रु.**


**वास्तवाचा संदर्भ असलेल्या थरारक युद्धप्रसंगांवर आधारित रामहर्षक कादंबऱ्या**




**साऊथ बाय जावा हेड**

ॲलिस्टर मॅक्लीन अनु. अशोक पाध्ये

**२५०रु.**

**वॉर्सा ते हिरोशिमा**

वि. स. वाळिंबे

**३००रु.**






**द फिस्ट ऑफ गॉड**

फ्रेडरिक फोरसीथ अनु. अनिल काळे

**३००रु.**




## शोधकथा
### इन्स्पेक्टर व्ही अनंतांच्या
**अनंत वाईकर**

**तल्लख बुद्धीच्या पाताळयंत्री गुन्हेगारांचाही शोध शेवटी लागतोच!**

'शोधकथा'मध्ये इन्स्पेक्टर व्ही. अनंत यांनी उलगडून दाखवलेल्या रहस्यमय गुन्ह्यांच्या नऊ कथा संकलित करण्यात आलेल्या आहेत. 'बाईसाहेब' (कथा) आणि 'छोटी आई' (कादंबरी) या पुस्तकांद्वारे प्रा. अनंत वासुदेव वाईकर यांनी साहित्यक्षेत्रात प्रवेश करून काही पुरस्कारही मिळवले आहेत. गुन्हेगारकथांकडे प्रा. वाईकर यांनी आता आपला मोर्चा वळवला आहे. त्यासाठी इन्स्पेक्टर व्ही. अनंत हा प्रामाणिक, कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी केंद्रवर्ती ठेवून, खुनासारख्या घटनांचा उलगडा करण्यात त्याने दाखवलेले कौशल्य या कथांमधून अधोरेखित करण्यात आले आहे.

आजकाल पोलिस तपासाच्या कामातही राजकारणी, समाजकंटक, व्यावसायिक गुन्हेगार, भ्रष्टाचारी लोक हस्तक्षेप करतात; नाना प्रकारे दडपणे आणतात; त्यामुळे गुन्हेगारांना पकडणे वा त्यांना शासन होईल अशा प्रकारे कारवाई करणे अवघड होत राहते. काही वेळा अशा प्रामाणिक अधिकाऱ्यांनाच कुठल्यातरी प्रकरणात अडकवले जाते.

प्रा. वाईकर यांच्या या कथा पूर्णपणे काल्पनिक आहेत, मात्र त्यातील घटना सर्वसामान्यतया कुठेही घडू शकतील अशा असल्याचा निर्वाळा दिला आहे. खून-हत्या घडल्यावर खऱ्या गुन्हेगारापर्यंत पोहोचण्यासाठी वेगवेगळे मार्ग हाताळावे लागतात. रहस्यकथांमध्ये त्यामुळे उत्कंठा, पुढे काय याचे नाट्य वाचकाला अपेक्षित असते. अशा पोलिसकथांना व कृ. जोशी यांनी वास्तवाचे अधिष्ठान देऊन विश्वासार्हता मिळवून दिली. 'दक्षता' किंवा पोलिस टाइम्स वगैरे साप्ताहिकांतूनही तसेच दूरचित्रवाणीवरील सीआयडी, क्राइम डायरी वगैरे मालिकांमधून



पोलिस अधिकाऱ्यांच्या चातुर्याची आणि कुशलतेची ग्वाही आपल्याला मिळत असते.

प्रा. वाईकर यांच्या कथांमधील वेगवेगळे सामाजिक व व्यावसायिक स्तर लक्षवेधक ठरतात.

'पुष्पांजली'मधील माणिकशेठ हे नव्या पुलाच्या बांधकामाचे टेंडर भरण्यासाठी निघणार असतात; परंतु कागदपत्रे घेऊन येणारे यशवंतराव वेळेवर न आल्याने ते संतप्त असतात. यशवंतराव उशिरा येतात आणि आपली कन्या पुष्पांजली ही आदल्या दिवसाच्या सकाळपासून गायब आहे असे सांगतात... तिच्या शोधात गुंतल्याने वेळेवर न आल्याचा खुलासा करतात... माणिकशेठ पो. इ. व्ही. अनंत यांना सांगतात, ''पुष्पांजली नागपूरला माझ्या पत्नीकडे गेलेली आहे का याचीही मी चौकशी केली...'' तेव्हा व्ही. अनंतांना थोडे आश्चर्य वाटते. ''आम्हाला मुलगी नसल्याने यशवंतरावांच्या मुलींवर स्वत:च्या मुलीप्रमाणे आमचे प्रेम आहे असा खुलासा ते करतात... पहाटे एक मुलगी टॅक्सीतून गेली असे रिक्षावाल्यांकडून कळल्यावर त्या टॅक्सी ड्रायव्हरला ताब्यात घेण्यात येते... ती कुठे उतरली त्यावरून तिच्या मैत्रिणीचा शोध घेण्यात येतो... तेवढ्यात एका विहिरीत एका तरुणीचे प्रेत सापडते. ते पुष्पांजलीचे असते. तिच्या कमरेला १५ किलो वजनाचा दगड बांधलेला असतो. मरणोत्तर तपासणीत मुलीचा पाण्यात गुदमरून झाल्याचे व ती दोन महिन्याची गरोदर असल्याचे डॉक्टरांच्या लक्षात येते. तसेच पोटात झोपेच्या गोळ्याही मिळतात... तिच्या प्रियकराचा छडा लावला जातो...

**पलंगावर ती व्यक्ती मृतावस्थेत आढळते... टेबलाजवळ सूटकेस, खोली आतून बंद- तेव्हा आत्महत्या असावी... पण वैद्यकीय तपासणीत मृत्यू विषप्रयोगाने झाल्याचे आढळते. ते विष सापाचे असते. मात्र सर्पदंशाची खूण अंगावर नसते... इन्स्पेक्टर जळगावला चौकशीसाठी जमादार जाधव यांना पाठवतात...**

एका हॉटेलमधून इन्स्पेक्टर व्ही. अनंत यांना फोन येतो, ''साहेब... आमच्या इथे एक कस्टमर... त्याने काल रात्रीपासून रूमचा दरवाजा उघडलेला नाही...'' पाचच मिनिटांत इन्स्पेक्टर त्या लॉजवर पोहोचतात... जुगलकिशोर गांधी. वय ४५. जळगाव अशी नोंद रजिस्टरमध्ये असते. रूमचे दार तोडण्यात येते... पलंगावर ती व्यक्ती मृतावस्थेत आढळते... टेबलाजवळ सूटकेस, खोली आतून बंद– तेव्हा आत्महत्या असावी... पण वैद्यकीय तपासणीत मृत्यू विषप्रयोगाने झाल्याचे आढळते. ते विष सापाचे असते. मात्र सर्पदंशाची खूण अंगावर नसते... इन्स्पेक्टर जळगावला चौकशीसाठी जमादार जाधव यांना पाठवतात... त्याचवेळी

एसटी स्टँडवर प्लॅटफॉर्मवर एक पन्नाशीतला गृहस्थ मृतावस्थेत आढळतो... तोंडातून फेस आलेला– श्रीमंत. जवळ सूटकेस. तिच्यावर लेबल. मोहनराव कुलकर्णी... धुळे... नातलगांकडे चौकशी– ते नाशिकला जमीनखरेदीसाठी गेलेले होते असे कळते. शवविच्छेदनात त्यांच्याही पोटात सापाचे विष आढळते... सूटकेसमध्ये साठेखत मिळते. ते लिहून देणार म्हणून अब्दुल गफूर खान ९७५ पंचवटी नाशिक असा उल्लेख असतो. प्लॉटची किंमत साडेचार लाख. साठेखताची रक्कम २५ हजार... नाशिकच्या त्या पत्त्यावर चौकशी करता तेथे ५०० वर घरक्रमांकच नाही– तशी व्यक्तीही कोणाला ठाऊक नाही असे कळते... जमादार जाधवे तपास करून येतो. तो सांगतो– गांधी येथे साठेखतासाठी आले होते. अब्दुल गफूरकडून ते जागा घेणार होते. सात लाख रुपये घेऊन ते आले होते...

आता गुन्ह्याच्या स्वरूपाचा थोडाफार उलगडा होऊ लागतो. या अब्दुल गफूरला कसे गाठायचे...? त्यासाठी व्ही. अनंत वेगळीच शक्कल लढवतात. ती शक्कल कोणती हे मूळ कथा वाचल्यावरच कळेल.

**अक्षर चांगले म्हणून मिसेस नाडकर्णी वामनरावांना आपले लेख लिहून घेण्यासाठी घरी बोलावतात... कधी त्यांच्या गळयात पडतात... तेव्हा नोकरीपेक्षा चारित्र्य महत्त्वाचं म्हणून ते दार उघडून पळ काढतात... पण नंतर मिसेस नाडकर्णी मृतावस्थेत सापडतात. शवविच्छेदनानंतर पाठीवर व पोटावर तीक्ष्ण हत्याराने वार...**

चांगोजीराव देशमुख. गावात प्रतिष्ठित. किंग मेकर. पत्नीच्या मृत्यूनंतर गेली दोन वर्षे ते मळ्यातच मुक्कामाला असत... वाड्यात क्वचित येत. त्यांचा मुलगा प्रदीप. त्याची पत्नी अनुराधा... या चांगोजीरावांचा मळ्यातच एके रात्री निर्घृण खून होतो. छातीवर धारदार वस्तूने प्रहार झालेला असतो... खोलीत सोनेरी रंगाच्या बांगडीचे तुकडे सापडतात... खोलीमागे नारायण या सालदार मजुराचे कुडाचे घर... पण तेथे उंची पलंग. मऊ गाद्या... गोदरेज कपाट... दिसते. नारायणची बायको चहा आणते तेव्हा तिच्या हातातल्या सोनेरी रंगाच्या बांगड्या इन्स्पेक्टरांचे लक्ष वेधून घेतात... आणि खुनाचा उलगडा होण्याची शक्यता त्यांना दिसते... परंतु एवढ्यावरच तपासाची अखेर होत नाही... आणखी रहस्य राहतेच...

अक्षर चांगले म्हणून मिसेस नाडकर्णी वामनरावांना आपले लेख लिहून घेण्यासाठी घरी बोलावतात... कधी त्यांच्या गळ्यात पडतात... तेव्हा नोकरीपेक्षा चारित्र्य महत्त्वाचं म्हणून ते दार उघडून पळ काढतात... पण नंतर मिसेस नाडकर्णी मृतावस्थेत सापडतात. शवविच्छेदनानंतर पाठीवर व पोटावर तीक्ष्ण



हत्याराने वार... रक्तस्रावाने मृत्यू... सुरीवर वामनरावांच्या बोटाचे ठसे असे आढळते... खुनाच्या रात्री मिस्टर नाडकर्णी पुणे येथे गेलेले असतात... आणि काही वेगळीच वास्तवता पुढे येते. (बाईसाहेब)

शिवणी येथे महिला सुधाराश्रमातील महिलांची वैद्यकीय तपासणी करायला गेलेल्या डॉ. सुधा घोडके तीनचार दिवस होऊनही परत येत नाहीत म्हणून त्यांचे यजमान इन्स्पेक्टर व्ही. अनंत यांना भेटतात... डॉ. सुधा घोडके यांचे प्रेत शिवणी येथील एका विहिरीत सापडते... पोस्टमार्टेममध्ये त्यांच्या फुफ्फुसात पाणी सापडते... ही आत्महत्या नव्हे... आधी गळा दाबून ठार करून नंतर प्रेत विहिरीत टाकले हे स्पष्ट होते... मग हे काम कोणी केले असावे? सुधारगृहातील महिलांच्या आरोग्य तपासणीत सर्वांची तब्येत 'व्हेरी गुड' असल्याचे शेरे दिसतात. पण सह्या मात्र खोट्या असतात... व्ही. अनंत आपल्या महिला पोलिसांना त्या सुधारगृहात निराधार महिला म्हणून पाठवतात– आणि त्या सुधारगृहात चालणाऱ्या गैरप्रकारांची फाइल तयार करतात... खरा खुनी कोण याचा तपास लावणे मग अवघड ठरत नाही. परंतु त्यासाठी पुरावेही जमवावे लागतात. ते कसे जमवले जातात हेही पोलिस खात्याच्या चलाखीवर आणि सर्वदूर पोहोचू शकणाऱ्या यंत्रणेवर अवलंबून असते. त्याचीही झलक या कथांमधून बघायला मिळते.

**गुन्हेगाराला बोलते करण्यासाठी लाडीगोडीपासून झापड लावणे आणि बर्फाच्या लादीवर झोपवणे यासारखे कितीतरी प्रकार उपयोगात आणले जातात. काही वेळा गुन्हा करणारा शिक्षेला पात्र ठरतो; पण त्यामागचा सूत्रधार नामानिराळा राहून समाजात उजळ माथ्याने वावरत राहतो.**

गुन्हेगाराला बोलते करण्यासाठी लाडीगोडीपासून झापड लावणे आणि बर्फाच्या लादीवर झोपवणे यासारखे कितीतरी प्रकार उपयोगात आणले जातात. काही वेळा गुन्हा करणारा शिक्षेला पात्र ठरतो; पण त्यामागचा सूत्रधार नामानिराळा राहून समाजात उजळ माथ्याने वावरत राहतो. अनेक प्रकरणे हाताळल्यामुळे पोलिसांच्याही गुन्हा तपास तंत्राला सफाई आलेली असते. त्यांचे काही आडाखे बसलेले असतात. मनुष्यस्वभावाची त्यांची पारखही चांगली अंतर्भेदक असते. ''साहेब, काही वेळेला जगाला दाखवण्यासाठी आई असते पण स्वत:साठी बाई असते असे अनेकदा आढळले आहे... बाईच्या त्या वक्तव्यावर विश्वास ठेवू नये'' (१२७) यासारखी निरीक्षणे साधा हवालदारही निर्भीडपणे व्यक्त करू शकतो.

गुन्हेगाराला शोधण्यासाठी पोलिस कधी कधी नाटकही करतात; बनावट

मुखवटे धारण करून गुन्हेगाराला विश्वासात घेऊन सत्याचा माग काढतात. 'पोलिसांचं नाटक' या कथेत असाच प्रकार दिसतो. पंचनाम्यातील विसंगती, संबंधितांच्या साक्षीतील विसंगती वगैरे शोधून काढण्यातही पोलिस पटाईत असतात.

न्यायालयात खरे-खोटे पुरावे सादर करताना आणि निरनिराळ्या घटनांची पेशकश करताना उलटसुलट युक्तिवाद केले जातात. एकाच घटनेचा अन्वयार्थ पोलिस, आरोपी आणि वकील वेगवेगळ्या प्रकारे लावून दाखवतात. 'क्रूरकर्मा' या कथेत सीमा शहाच्या खूनाबद्दलचा आरोप असणाऱ्या अरुण शहा या तिच्या पतीला न्यायाधीश मुक्त करताना म्हणतात, ''अरुण शहांच्या वस्तू खुनासाठी दुसऱ्याच कोणी वापरल्या असणे शक्य आहे. म्हणून मी त्यांची जामीनावर सुटका करतो.''

समाजात गुन्हे घडत असतात. माणसे क्रूरपणे नीच कृत्ये करीत असतात. नरपशूप्रमाणे वागत असतात. अशा व्यक्तींशी नेहमी संबंध आल्याने पोलिसांच्या एकूण जीवनदृष्टीवरही त्याचा प्रभाव पडतच असणार. तरीही सत्याची, सद्वर्तनाची, सज्जनांची बूज राखणे, नीतिमत्ता व मूल्ये यांचे भान ठेवणे त्यांजकडून अपेक्षित असते.

> **माणसे क्रूरपणे नीच कृत्ये करीत असतात. नरपशूप्रमाणे वागत असतात. अशा व्यक्तींशी नेहमी संबंध आल्याने पोलिसांच्या एकूण जीवनदृष्टीवरही त्याचा प्रभाव पडतच असणार. तरीही सत्याची, सद्वर्तनाची, सज्जनांची बूज राखणे, नीतिमत्ता व मूल्ये यांचे भान ठेवणे त्यांजकडून अपेक्षित असते.**

व्ही. अनंत एका अशा गुन्हेगाराला म्हणतात, ''अरे नीच माणसा, एखादा राक्षससुद्धा अशी कृती करणार नाही. तू जिवंत राहणे म्हणजे समाजामध्ये पेटता अग्नी राहणे होय... दुसऱ्यांच्या स्त्रियांना जाळ्यात ओढून तू त्यांचे शील आणि कुटुंब उद्ध्वस्त करणारा आहेस. खोट्या सह्या करून बँकांना फसवणारा आहेस... एका निष्पाप बालकाचा तू खून केला आहेस. माझ्या हातात न्यायदानाचा अधिकार असता तर मी तुला येथेच आणि याच क्षणी फाशी दिले असते. पण हा अधिकार न्यायालयाला आहे. तुला फाशीची शिक्षा लवकरात लवकर कशी होईल हे मी पाहतो...'' (२२२) अशी नीतिमूल्यांची चाड असणारे पोलिस अधिकारी असतात म्हणून पोलिसखात्याचा वचक राहतो. असे अधिकारी जास्तीत जास्त असतील तर पोलिसखात्याची प्रतिमा अधिक उजळून निघेल.

**पृष्ठे : २२८ ● किंमत : १६०रु. ● सभासदांना : १२०रु. ● पोस्टेज : २०रु.**



## साधंसुधं...

### आनंदाचं एक अक्षर

**प्रमोदिनी वडके-कवळे**

माझी मुलगी प्राथमिक शाळेत होती तेव्हाची गोष्ट. एक दिवस तिच्या रिक्षावाल्या काकांनी तक्रार केली. ''अबोली सारखी रिक्षातून बाहेर रस्त्याकडे वाकून बघते.''

मी तिला त्याबद्दल विचारलं तेव्हा ती म्हणाली, ''मला हिरवी कार बघायची असते ना...''

''कशाला?'' मी आश्चर्याने विचारलं. १९९० साली चारचाकी वाहन ही मध्यमवर्गीयांसाठी चैनीचीच गोष्ट होती. मुलांसाठी कारबीर घेण्याचं स्वप्न पडावं एवढे काही आम्ही श्रीमंत नव्हतो.

'''अगं, हिरवी कार दिसली की दिवस मस्त जातो. मैत्रिणीशी भांडण होत नाही. गणितं पटापट सुटतात. बाई रागावत नाहीत.'' तिने तिच्या आनंदाच्या जागा सांगितल्या.

मला एकदम आमचे अण्णाच आठवले.

तसे अण्णा अंधश्रद्धाळू नव्हते. पण सकाळी घराबाहेर पडताना मांजर आडवं गेलं, किंवा समोरून रिकामा घडा घेतलेली बाई आली की परत घरी येऊन पुन: नव्यानं बाहेर पडायचे. भरलेला घडा घेतलेली बाई समोर आली तर मात्र अण्णा खूष. आज आपली सगळी कामं यशस्वीरीत्या पूर्ण होणार याची खात्रीच पटून जायची त्यांना आणि त्याच आनंदात ते दिवसभर तरंगत रहायचे. तसं झालं नाही (आणि बरेचदा तसं व्हायचं नाहीच.) तरी त्यांच्या आनंदात काही फरक पडायचा नाही.

आम्ही त्यांना चिडवायचो 'अण्णा भरल्या घागरीची बाई समोर न आली तरी तुमची कामं झाली असती की!'

अण्णा शांत स्वरात म्हणायचे, ''ते मलाही ठाऊक आहे. पण आज आपला दिवस चांगला जाणार आहे, असा विश्वास सकाळीसकाळी मिळाला की आपला दिवस जास्त चांगला जातो की नाही? अरे आपण सामान्य माणसं! आपले आनंदही सामान्यच असतात. एखाद्या छोट्याशा घटनेत, एखाद्या माणसाच्या भेटीत, एखाद्या कौतुकाच्या वाक्यात, कधीकधी तर अगदी एखाद्या अक्षरातसुद्धा आपला आनंद दडलेला असतो. आपणच चष्मा हरवल्यासारखे वागतो. अशा

आनंदाकडे वळून बघतच नाही.''

''एका अक्षरात आनंद?''

''हो. आपण केलेल्या कामाला कुणी नुसतं 'वा' म्हटलं तरी आनंद होतो की नाही? गाण्याच्या भेंड्या खेळताना समोरच्या माणसावर ड ख असलं विचित्र अक्षर आलं की आपल्याला आनंदाच्या उकळ्या फुटतात की नाही?'' अण्णांनी आपल्या स्वभावानुसार सटासट उदाहरणं दिली.

नव्या वर्षाच्या आगमनाप्रीत्यर्थ सोसायटीत जोरदार कार्यक्रम चालू होते. तरुण पोरापोरींनी प्रौढ, ज्येष्ठ सगळ्यांना त्या आनंदोत्सवात ओढलं होतं. रात्री उशिरापर्यंत वेगवेगळे खेळ खेळून झाल्यावर मग सिनेमाच्या नावाच्या भेंड्यांची टुम निघाली. तरुण मुलं विरुद्ध प्रौढ आणि ज्येष्ठ अशी विभागणी झाली. हिंदी सिनेमांची नावं!... प्यार, जान, खून असले शब्द घालून कुणी काहीही नावं सांगावीत आणि दुसऱ्या बाजूच्या भिडूंनी जोरदार विरोध करावा असा दंगा सुरू होता. आरडाओरडा करण्याचा कंटाळा असलेल्या आम्ही काहीजणी वर्गातल्या टवाळ विद्यार्थ्यासारख्या मागच्या बाजूला बसून होतो. आपल्यावर कोणतं अक्षर येईल याचा आधीच अंदाज बांधणं, आमच्या टीमवर एखादं अवघड अक्षर आलं तर मागून रसद पुरवणं, पलीकडच्या बाजूला भेंडी चढवायच्या दृष्टीने चर्चा करणं अशी निरुपद्रवी कामं करत होतो.

माझ्या शेजारी 'बी' विंगमधल्या शेंडे आजी बसल्या होत्या.

शेंडे कुटुंब एक नंबरचं खडूस म्हणून सोसायटीत प्रसिद्ध होतं. आजींची सून तर फारच शिष्ट होती. आजींच्या चेहऱ्यावरही कायम नाराजीचा मेकअप. कुणाकडे बघून साधं हसणंही जिवावर आल्यासारखा!

समोरच्या बाजूवर प अक्षर आलं. जगदाळेबाई म्हणाल्या, ''प्यार झुकता नही, टिकता नही, सुकता नही असं काही तरी सांगून टाका.''

त्यावर शेंडेआजी गडबडीने म्हणाल्या, ''कशाला? प चा एक फार सुरेख सिनेमा होता. परिणय. शबाना आझमीने त्यात काम केलं होतं.''

''हो. हो. मी पाहिलाय तो.'' मी घाईघाईने म्हटलं. माझ्या स्वरात आश्चर्य आणि आनंदही काठोकाठ भरलेला. आश्चर्य शेंडेआजींच्या उत्साहाबद्दल आणि आनंद कुणीतरी 'परिणय' पाहिलेला असावा आणि त्या व्यक्तीच्या तो इतका लक्षात असावा याबद्दल. कारण माझं त्या सिनेमाशी अतिशय नाजूक नातं होतं.

आमचं लग्न झाल्याझाल्या ह्यांची नगरला बदली झाली. एकमेकांशी पुरती ओळख व्हायच्या आतच 'दोन ध्रुवावर दोघे आपण'चा प्रयोग सुरू झाला. भरीस भर म्हणजे माझी आठवड्याची सुटी गुरुवारी आणि त्यांची रविवारी. शनिवारी रात्री हे उशिरा यायचे आणि सोमवारी सकाळच्या गाडीने परत जायचे. आमचं



पंचवीस माणसांचं एकत्र कुटुंब. त्यातही आम्ही धाकटे. सगळ्या मोठ्यांची मानमर्यादा राखून बोलायचं म्हणजे आम्हाला आठवड्याकाठी चार ताससुद्धा निवांत मिळायचे नाहीत. त्यावेळी फोनबीन इतके सर्रास नव्हते आणि दर एका आठवड्यानं भेटायचं असतानाही बायकोला पत्र पाठवलं तर घरात सगळे काय म्हणतील ही भीती. त्यामुळे पत्रही नाही. जोडीला नव्याने रूळ बदलताना होणारी भांडणं... प्रेम, सहजीवन वगैरे सगळे शब्द अगदी परग्रहावरचेच वाटायचे.

एकदा असेच एका सोमवारी हे जाताना आमचं जोरदार भांडण झालेलं. शनिवारी रात्रीचे दहा वाजले तरी यांचा पत्ता नाही. घरातले सगळे झोपायला निघून गेले होते. मी एकटीच हॉलमध्ये त्यांची वाट पहात जागत बसले होते. आवाजाची सोबत असावी म्हणून टी.व्ही. लावला होता. पण माझं लक्ष त्याच्याकडे नव्हतं. माझं लक्ष आपलं खिडकीतून दिसणाऱ्या रस्त्याकडे. मधेच टी.व्ही.कडे नजर गेली तेव्हा लक्षात आलं कुठला तरी हिंदी सिनेमा चालू आहे. शबाना आझमी आणि रोमेश शर्मा किंवा अनिल धवन असाच कुणीतरी गोडगोड चेहऱ्याचा नायक. दोघांचा प्रेमविवाह झालेला. पण घरची परिस्थिती भिन्न. ती आधुनिक विचारसरणीच्या संपन्न घरात वाढलेली. तर त्याच्यावेर 'साधी राहणी उच्च विचारसरणी'चे संस्कार. प्रेमात असताना जाणवलं नव्हतं पण आता लग्नानंतर दोन्हीतली तफावत जाणवून दोघांच्या संबंधातला तणाव आता अबोल्यापर्यंत पोहोचला. दोघांनाही खरं म्हणजे तो मिटवायचाय. पण छोट्या छोट्या प्रसंगांतून उलट तो वाढतच चाललाय... असं काहीतरी त्या सिनेमाचं कथानक होतं. नव्हाळीच्या दिवसातला तणाव आणि ओढ दोन्ही वाढवणारे साधेसाधे प्रसंग त्यात लहानसहान बारकाव्यासहित फार छान फुलवले होते.

पाहता पाहता मी त्या सिनेमात गुंतले. माझ्याच आयुष्याचं प्रतिबिंब वाटणारे प्रसंग आणि संवादही! दोघांचीही बाजू मांडणारे ते रागरुसवे पडद्यावर एक त्रयस्थ बनून पाहताना मला माझ्या वागण्यातल्या काही चुका उमगायला लागल्या. ह्यांची कुठे आणि कशी घुसमट होत असेल ते जाणवायला लागलं. आणि मागे वळून आमच्या भांडणाचे प्रसंग आठवताना त्यातून ह्यांचं माझ्यावरचं प्रेम प्रतीत व्हायला लागलं. माझ्या बालिश वागण्याने ह्यांना किती त्रास झाला असेल अशा पश्चात्तापभावनेने माझे डोळे भरून गालावरून वहायला लागले. आणि तेवढ्यात पडद्यावर कसल्याशा धार्मिक समारंभाच्या निमित्ताने एक गाणं सुरू झालं.

**तपते दिलोंको मिले जो तरूवरकी छायाऽऽ**
**वैसाही मन मेरा तेरी शरणमे आयाऽऽ**

असे काहीसे त्या गीताचे शब्द होते. (चूकभूल देणे घेणे.) राजनसाजन मिश्रा किंवा डागर बंधू गायक असावेत. भक्ताने देवासाठी आळवलेले पण नवराबायकोच्या नात्यालाही चपखल वाटणारे असे त्या गाण्याचे शब्द होते.

पंचवीस वर्षांनंतरही मला स्पष्टपणे आठवतोय तो त्या भजनस्वरूप गाण्याने माझ्यावर केलेला खोलखोल परिणाम. ते गाणं चालू असतानाच कधीतरी दारावरची बेल वाजली. मी दार उघडलं आणि दारातच ह्यांच्या गळ्यात पडून मुसमुसायला लागले. ज्याचे कथा आणि संवाद मनावरून पुसट झाले होते पण परिणाम मात्र अजूनही स्पष्ट होता असा, अजाण वयातल्या चुकांची जाणीव देऊन मला आणि माझ्या संसारालाही सावरणारा तो सिनेमा आज मला पुन्हा आठवला. आणि महत्त्वाचं म्हणजे त्याची आठवण करून दिली होती शेंडेआजींनी. त्यांच्याशी आजवर माझा चार शब्दांचाही संवाद नव्हता.

''प चा आणखी एक फार छान सिनेमा आहे.'' ऐकायला श्रोता भेटल्यावर शेंडे आजी चांगल्याच रंगात आल्या होत्या.

''खूप वर्षांपूर्वी मी दूरदर्शनवर बघितला होता तो. प्रकाश झा याचं दिग्दर्शन होतं. परिणती नाव होतं त्याचं. काय अप्रतिम सिनेमा होता. सुरेखा सिकरीने काय सुंदर काम केलं होतं...''

आजी सांगत असताना मला तोही सिनेमा पाहिल्याचं आठवलं.

राजस्थानी खेड्याची पार्श्वभूमी लाभलेला, साध्या प्रामाणिक कुटुंबाला पैशाचा लोभ कसा जडतो आणि हळूहळू तो लोभ त्यांना विनाशाकडे कसा नेतो हे हळुवार पण परिणामकारक रीतीने सांगणारा तो सिनेमा तेव्हा माझ्याही मनात ठसला होता. पुढे कधीच मी त्या सिनेमाचं नाव ऐकलं नाही. पण त्याला नक्कीच महत्त्वाचे पुरस्कार मिळाले असतील असं मला उगीचच वाटतं. शेंडेआजींनाही तो सिनेमा आठवावा? मी लग्गेच त्यांना आनंदाची टाळी दिली.

''आणि परिणिता? बंगाली कादंबरीवर आधारलेला? पाहिलायेस?'' आजी एकेक गुगली टाकत मला चकित करीत होत्या.

एव्हाना मला खूपच जवळीक वाटायला लागली होती त्यांच्याविषयी. ''तुम्हाला सिनेमाचं एवढं वेड आहे?''

''वेड असं नाही. पण असं वेगळं काहीतरी ऐकापहायला आवडतं मला. माझी बुद्धी तल्लख आहे. जुना काळ आणि परिस्थिती यामुळे शिकता आलं नाही मला फारसं. पण अभिजात गोष्टींची जाण येते. तुम्ही आजच्या भाषेत काय ते सहावं ज्ञानेंद्रिय म्हणता ना तसं लाभलंय मला. आणि उगीच लोकांच्यात मिसळून कुचाळक्या करण्यापेक्षा असे वेगळे सिनेमे बघण्यात खूप आनंद मिळतो. उगीच वय झालं म्हणून देवदेव करण्यापेक्षा जगात जे चांगलं आहे त्याचा आस्वाद घेतला तर कुठे बिघडतं?''

मी विचारात पडले. आमच्यात न मिसळणाऱ्या शेंडेआजींबद्दल आम्ही किती वेगळा विचार करत होतो आणि त्या किती वेगळ्या विचारांच्या होत्या!



समोरचा गलका वाढला. आमच्या बाजूला पुन्हा प अक्षर आलेलं दिसत होतं. ''परिणिता परिणिताऽ'' आजी लहान मुलीच्या उत्साहाने हात वर करत ओरडल्या.

''अय्या मला कसा आठवला नाही हा पिक्चर?'' आमच्या पुढेच बसलेली एक कॉलेजकन्यका उद्‌गारली. मागे वळून तिने आजींच्या दिशेने कौतुकाचा कटाक्ष फेकला. आणि गुणगुणायला सुरुवात केली... ''पियू बोलेऽ''

आजी खूष! त्याही गुणगुणायला लागल्या. पण ते गाणं १९४० सालातलं असावं. त्या दोघींच्यात काय घोटाळा झाला ते फक्त माझ्याच लक्षात आलं. आजी सांगत होत्या तो परिणिता जुना आणि चैत्रालीला आठवत होता तो अलीकडचा नवा सिनेमा.

त्यांच्यातला गैरसमज पुसावा म्हणून मी पुढे सरसावले. पण मग वाटलं, नकोच तसं करायला. आपापल्या परीने त्या दोघीही आनंदात होत्या.

त्या दोघींचंच नव्हे, आम्हा तिघींचंही आनंदाचं अक्षर एकच तर होतं...

**प्रमोदिनी वडके-कवळे**
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८

# पुरस्कार

## * 'बिजलीदेवीची कहाणी'ला राज्य पुरस्कार

मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे प्रकाशित 'बिजलीदेवीची कहाणी'या पुस्तकाला २००३-२००४ साठीचा भौतिकशास्त्र व तंत्रविज्ञान या वाङ्मय प्रकारातील 'सी. डी. देशमुख पुरस्कार'प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र शासनाचे मानपत्र, मानचिन्ह व रु.१०,००० रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

स्व. गोविंद लक्ष्मण परांजपे लिखित बिजलीदेवीची कहाणी हे वीजेची निर्मिती व वीजेसंदर्भात संपूर्ण माहिती असलेले पुस्तक आहे.



श्रीमती.रजना परांजपे पुरस्कार स्विकारताना

'नाशिक' येथे दिनांक १७ डिसेंबर रोजी महाकवी कालिदास कलामंदिरात श्री. गोविंद परांजपे हयात नसल्याने त्यांच्या पत्नी श्रीमती. रजनी परांजपे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

पुरस्काराची घोषणा होताच सूत्रसंचालिकेने श्री. गोविंद परांजपे यांचे नाव दोन-तीन वेळा पुकारले मात्र श्रीमती रजनी परांजपे यांनी गोविंद परांजपे हे स्वर्गवासी झाल्याचे सांगताच सारे सभागृह हळहळले.

## * देशपांडे दांपत्याला यंदाचा 'नातू पुरस्कार'

मेळघाट परिसरात काम करणाऱ्या सुनील व निरुपमा देशपांडे या दांपत्याला, नातू फाउंडेशन पुरस्कार तर 'स्व-रूपवर्धिनी'च्या ज्ञानेश पुरंदरे यांनी 'सेवाव्रती कार्यकर्ता' पुरस्कार ९ जानेवारी रोजी मेधा पाटकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

ग्रामीण भागात किमान दहा वर्षे प्रत्यक्ष राहून काम करणाऱ्यांना 'महादेव बळवंत नातू' पुरस्कार देण्यात येतो. मेळघाटातील २५ गावांमध्ये 'संपूर्ण बांबू केंद्रा'मार्फत बांबूच्या वस्तूंची निर्मिती व विक्री, बांबूपासून घरउभारणी; तसेच महिलांचे बचत गट व कर्जवाटप अशी विविध विकासात्मक कामे केल्याबद्दल देशपांडे दांपत्याला रोख एक लाख रुपये, शाल व मानपत्र असा पुरस्कार दिला गेला.



ध्येयवादी दृष्टीने किमान पाच वर्षे पूर्ण वेळ सामाजिक काम करणाऱ्या कार्यकर्त्याला 'सेवाव्रती कार्यकर्ता' पुरस्कार देण्यात येतो. श्री. पुरंदरे गेल्या दहा वर्षांपासून पुण्यातील 'स्व-रूपवर्धिनी संस्थेमार्फत उपेक्षित व कामगार वर्गातील मुला-मुलींसाठी संस्कार आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे उपक्रम राबवीत आहेत. २५ हजार रुपये रोख व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

संस्थेतर्फे ज्ञान प्रबोधिनीचे अंबाजोगाई केंद्र, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, ज्ञान प्रबोधिनी क्रीडाकुल, जिजामाता प्रबोधन केंद्र (शिवापूर), ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्ट, गंगोत्री आदी संस्थांना प्रत्येकी एक लाख रुपयांची देणगी देण्यात आली. मूकबधिर शिक्षण संशोधन व विकास केंद्र आणि श्री संतसेवा केंद्र यांना अनुक्रमे ५० हजार व ३५ हजार रुपयांची देणगी दिली गेली, अशी माहिती नातू ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त ब्रिगेडियर प्रतापराव जोशी यांनी दिली.

## * महाकवी संत 'विष्णुदास पुरस्कार'

राज्यात साडेतीन पीठांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र माहूर येथील मठातर्फे 'महाकवी संत श्री विष्णुदास पुरस्कार' ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे, ज्येष्ठ पार्श्वगायिका उषा मंगेशकर या मान्यवरांना देण्यात आले.

सात जानेवारी रोजी माहूर येथे विष्णुकवी मठात हे पुरस्कार भय्यू महाराज यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. वसंतराव झुरळे महाराज, निवेदक दिवाकर चौधरी, किशनराव भोयर, पत्रकार संजीव कुलकर्णी यांनाही पुरस्कार देण्यात आले आहे. काव्य पुरस्कारासाठी अमृत देशमुख (नांदेड), सुहासिनी शिराढोणकर (औरंगाबाद), क. रा. काटवले (गोंदिया), जगदीश्वर मुनघाटे (चंद्रपूर), कुलकर्णी (वसमत), स्वामी कौडे (नागपूर), पूरणदास लेणारे (भंडारा), सविता पाटील (आर्वी), शंकर इहरे (दारव्हा), गोवर्धन काळे (आरमोरी), नलिनी देशमुख (बडोदा) यांची निवड करण्यात आली आहे.

## * अजित कुलकर्णी यांना साहित्य गौरव पुरस्कार

धाराशिव येथील 'लोकजनशक्ती विश्वकल्याण लोकसेवा अकादमी'तर्फे संतसाहित्याचे अभ्यासक अजित कुलकर्णी यांना समाजप्रबोधन, आध्यात्मिक; तसेच साहित्य व काव्य क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कार देण्यात आला.

## * श्याम भुर्के यांना नाथमाधव पुरस्कार

उत्कृष्ट साहित्यनिर्मितीसाठी उद्योगपती सतीश तोडणकर न्यासातर्फे देण्यात येणारा कादंबरीकार नाथमाधव पुरस्कार श्याम भुर्के यांना सांगली येथे सहाव्या दैवज्ञ साहित्य संमेलनात ज्येष्ठ समीक्षक म. द. हातकणंगलेकर यांनी प्रदान केला. श्री. भुर्के यांनी 'पुणं एक साठवण', 'सभेत कसे बोलावे', 'आणखी एक सिंहासन' आदी पुस्तके लिहिली आहेत.

### * सहकारमहर्षी साहित्य पुरस्कार

समाजात साहित्यासाठी भरपूर विषय आहेत, परंतु काही अपवाद वगळता बहुसंख्य साहित्यिक वास्तवतेला तिलांजली देतात. साहित्यामध्ये वास्तव स्वरूप मांडले जात नाही, अशी खंत व्यक्त करीत ज्येष्ठ विदर्भ कवी प्रा. विठ्ठल वाघ यांनी वास्तवतेतून लोकजागृती होऊन समाजाला दृष्टी आणि कार्याला गती मिळते, असे मत व्यक्त केले.

सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील प्रतिष्ठानच्या वतीने प्रासिद्ध कादंबरीकार विश्वास पाटील (संभाजी कादंबरी), कविता महाजन (ब्र कादंबरी) व गोव्याचे विश्वचरित्र संशोधन केंद्र (मराठी विश्वचरित्र कोश) यांना सहकारमहर्षी साहित्य पुरस्कार तर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. निर्मलकुमार फडकुले यांना सहकारमहर्षी जीवनगौरव पुरस्कार शिक्षणमंत्री प्रा. वसंत पुरके यांच्या हस्ते देण्यात आले.

प्रत्येकी दहा हजार रोख, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

शिक्षणमंत्री प्रा. पुरके म्हणाले की, अनुभवातून निर्माण झालेले साहित्य हेच अस्सल असते. साहित्य निर्मितीला अनुभूतीचे अधिष्ठान प्राप्त झाले पाहिजे. दीन-दलित, आदिवासींचे दु:ख शासनाकडे मांडण्याची गरज आहे. मदतीचा व कारुण्याचा हात दिल्याशिवाय आदिवासी माणूस माणसासारखे जीवन जगणार नाही. साहित्यकांकडून हेच अपेक्षित आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

पुरस्काराचे मानकरी 'संभाजी'कार विश्वास पाटील यांनी संभाजीराजांचा इतिहास वास्तवतेला सोडून आहे, त्यांचा अभ्यास ज्या पद्धतीने व्हायला हवा होता त्या पद्धतीने तो झाला नाही, इतिहासाच्या अंधारात खितपत पडलेल्या संभाजीचे पराक्रम कादंबरीच्या रूपाने आपण उजेडात आणल्याचे सांगितले. संभाजीवर मराठी भाषेत पोवाडे कमी आणि नाटके जास्त आहेत. नाटककारांनी त्यांना बदफैली, व्यसनी, मद्यपी ठरविले. मराठी लेखक आपल्या मनाची भूक भागविण्यासाठी संभाजीच्या अभ्यासाचे निमित्त करून बायांच्या माड्या फिरून आले. पाच लाख सैन्य व चार लाख घोडे, उंट घेऊन दक्षिणेवर चाल करून येणाऱ्या शहेनशहा औरंगजेब यास आपल्या केवळ साठ हजार सैन्याच्या ताकदीवर आठ वर्षे संभाजीने झुंजविले. आपल्या जीवनात १०८ ते ११० लढाया संभाजीने केल्या आहेत. त्याने वसईपासून ते पणजीपर्यंतची पोर्तुगीजांची बेटे पेटवून दिली होती. त्या काळात कोणत्याही नदीवर पूल व धरणे बांधणे धर्माने निषिद्ध मानले जात असताना संभाजीने विशालगडाच्या बाजूला दाभोळ येथे नदीवर पूल बांधले. ज्या बायाबापड्यांच्या नावे संभाजीला बदनाम केले गेले, त्या बाया-बापड्यांना त्याने संरक्षण दिले. आपली पत्नी येसूबाईकडे राज्यकारभार सोपविला. संभाजी महाकवी होते. त्यांची महाकाव्ये आजही काशी येथे आहेत. परंतु त्यांचा अभ्यास फारसा झाला नाही, अशी खंत पाटील यांनी व्यक्त केली.



### * राजन खान यांना बनहट्टी पुरस्कार

पुणे मराठी ग्रंथालयातर्फे देण्यात येणारे राजेंद्र बनहट्टी कथा पारितोषिक यंदा कथा लेखक राजन खान यांना जाहीर झाले. पाच हजार रुपये रोख आणि मानचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे.

### * डॉ. अशोक कामत यांना महात्मा गांधी पुरस्कार

पुणे विद्यापीठाच्या संत नामदेव अध्यासनाचे प्रमुख डॉ. अशोक कामत यांची यंदाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. ३० जानेवारी रोज वर्ध्यातील सेवाग्राम येथे तो प्रदान करण्यात येईल. प्रादेशिक भाषा व राष्ट्रभावनेच्या माध्यमातून राष्ट्रीय भावनिक ऐक्यासाठी मौलिक लेखन-संशोधन करणाऱ्या व्यक्तीस या गांधी पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. ताम्रपट, शाल-श्रीफळ, एकावन्न हजार रुपये असे त्याचे स्वरूप आहे. यापूर्वी आचार्य विनोबा भावे, आचार्य काका कालेलकर, आचार्य दादा धर्माधिकारी, पांडुरंगशास्त्री आठवले आदींना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

### * विदर्भ साहित्य संघाचा जीवनव्रती पुरस्कार

''संतवाङ्मय आणि सद्विचारांच्या प्रचारासाठीच्या ज्ञानयज्ञात स्वत:ला वाहून घेणारे प्रा. राम शेवाळकर यांचे आयुष्यच ज्ञानयज्ञ बनले,'' असे भावपूर्ण उद्गार कालनिर्णयकार ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर यांनी नागपूर येथे काढले.

८३ व्या वर्धापनदिनानिमित्त विदर्भ साहित्य संघाचा ग. त्र्यं. माडखोलकर जीवनव्रती पुरस्कार प्रा. शेवाळकर यांना संघाचे अध्यक्ष आणि 'लोकमत'चे संपादक प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या हस्ते देण्यात आला. मारुती चितमपल्ली यांचाही या वेळी विशेष सत्कार करण्यात आला.

याच वेळी वि. सा. संघाचे वाङ्मय पुरस्कार आणि राज्य पुरस्काप्राप्त लेखक; नागपूर, अमरावती विद्यापीठांतून वाङ्मयात आचार्य उपाधी प्राप्त करणाऱ्या अभ्यासकांचा सत्कारही करण्यात आला. साळगावकर म्हणाले, ''शेवाळकर यांचा सत्कार हा सद्गुणांचा सत्कार आहे. त्यांना उदंड लोकप्रियता मिळाली. वि. सा. संघात ४६ वर्षांपूर्वी विष्णू केशव पाळेकर, 'अप्रबुद्ध' यांचा सत्कार झाला, तेव्हा माडखोलकर यांनी 'हे गुणांचे पूजन आहे' असे म्हटले होते. आज असेच गुणांचे पूजन होत आहे.''

सत्काराला उत्तर देताना प्रा. शेवाळकर म्हणाले, ''आजचा पुरस्कार दिला नसता, तरी वि. सा. संघाचे सौहार्द मी नाकारले नसते. मी संघाशी एकरूप झालेलो आहे. साहित्य संघाने नेहमीच वैदर्भीय साहित्य बुद्धिमत्तेवर पाखर घालण्याचे कार्य केले आहे.''

या वेळी पु. य. देशपांडे स्मृती कादंबरी पुरस्कार 'वारुळ'साठी बाबाराव

मुसळे, कुसुमानिल स्मृती समीक्षा पुरस्कार 'भालचंद्र नेमाडे यांची समीक्षा'साठी डॉ. किशोर सानप, गो. रा. दोडके स्मृती ललित गद्य पुरस्कार 'गुलाबपाणी'साठी आशा सावदेकर, शरच्चंद्र मुक्तिबोध स्मृती काव्य पुरस्कार 'ब्रह्मसोपान'साठी रेषा आकोटकर, वा. कृ. चोरघडे स्मृती कथा पुरस्कार 'किनखापी मोर'साठी सुप्रिया अय्यर, नवोदित साहित्य लेखन पुरस्कार 'इतिहास लेखनाच्या परंपरा'साठी डॉ. प्रभाकर गद्रे, 'महारुद्र'साठी जी. बी. देशमुख यांना देऊन गौरविण्यात आले.

*** डॉ. अनिल अवचट यांना लाभसेटवार पुरस्कार**

स्वातंत्र्यासाठी गरीब अजूनही गरिबीतच आहे की खरोखरच देशात मोठ्या प्रमाणावर मध्यमवर्ग तयार झाला आहे? आर्थिक महासत्ता होण्याची क्षमता आहे की नाही, कसे आहे भारताचे चित्र? यावर ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंत गोवारीकर आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल अवचट यांच्यातील सवालजवाब ऐकण्याची संधी पुणेकरांना मिळाली.

डॉ. अनंत व लता लाभसेटवार न्यास आणि लाभसेटवार प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा साहित्य पुरस्कार डॉ. अवचट यांना डॉ. गोवारीकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या निमित्ताने हे विचारमंथन झाले.

डॉ. अवचट म्हणाले, ''खासगीकरणाच्या नावाखाली गरिबांना प्रवेश बंद होत आहे. हातगाडी ओढणाऱ्यांची हातगाडी आजही कायम आहे. बेकारी प्रचंड वाढत असताना, आपण अत्याधुनिक यंत्रे आणत आहोत. नव्या आर्थिक युगात सहृदयता गमावून बसलो आहोत. पैसा, पैसा करणाऱ्या अमेरिकी संस्कृतीचा अंगीकार सर्वजण करत आहेत. खर्चिक, निसर्गाचे शोषण करणारी जीवनशैली यातून रुळत आहे. समूह म्हणून माणसांबद्दल वाटणारी आस्था आम्ही गमावले आहे. शेजारच्या घरात मृत्यू झाला म्हणून दरवाजे बंद करणारे आपण पाहात आहोत, याची शरम कशी वाटत नाही? आपल्या परंपरेत एकमेकांच्या सहकार्याची भावना होती. बदलत्या रचनेत हे सारे आपण विसरून गेलो आहोत.''

अशा अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांनी डॉ. अवचट यांनी आपले भाषण संपविले व डॉ. गोवारीकर अध्यक्षीय भाषणास उभे राहिले. डॉ. अवचट यांच्या कलेचा, साहित्यिक गुणांचा आणि समाजसेवेचा गौरव त्यांनी केला. मात्र डॉ. अवचटांनी उभे केलेले देशाचे चित्र तसे नसल्याचे सांगितले.

ते म्हणाले, ''एका शास्त्रज्ञाच्या नजरेतून मी देशाकडे पाहतो आहे. स्वातंत्र्यापूर्वी स्केलपट्ट्या बनविण्याची क्षमता आपल्याकडे नव्हती. दहातले नऊ जण गरीब होते व सरासरी आयुर्मान केवळ २१ ते २२ वर्षे होते. आता देशातील दहापैकी सात जण मध्यमवर्गात पोहोचले आहेत. त्यांची गरिबी कमी झाली आहे. अर्थात आणखी ३० ते ३५ कोटी लोक दारिद्र्यात आहेत. मात्र देशाच्या सध्याच्या प्रगतीचा वेग कायम राहिला तर, येत्या दहा वर्षांत गरिबी संपेल, असा विश्वास



पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी व्यक्त केला आहे. हा अंदाज एका राजकारण्याचा नसून डॉ. सिंग यांच्यासारख्या नामवंत अर्थतज्ज्ञाचा आहे. माहिती तंत्रज्ञान कंपन्या, आऊटसोर्सिंग, या बाबींमुळे देशाला महत्त्व प्राप्त झाले आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत 'आऊटसोर्सिंग' हा महत्त्वाचा मुद्दा ठरतो. जॉर्ज बुश यांना हिंदी भाषेचे महत्त्व पटते. याकडे कसे दुर्लक्ष करून चालेल?''
श्रेष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव प्रकाशक अनिल मेहता, विजय ढवळे, डॉ. सुशीलकुमार लवटे, डॉ. अनंत जोग लाभसेटवार आणि लता लाभसेटवार आदी या प्रसंगी उपस्थित होते.



डॉ. अनिल अवचट- लाभसेटवार पुरस्कार स्विकारताना

*** प्रा. ना. ग. पवार यांना पुरस्कार**

शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक आणि महाराष्ट्र अध्यापक शिक्षण परिषद संयुक्त विद्यमाने प्रा. ना. ग. पवार अमरावती यांना डॉ. आनंद वास्कर पुरस्कार 'Teacher in Emerging Indian Society' या पुस्तकाबद्दल देण्यात आला. बुक एनक्लेव, जयपूर (राजस्थान) या संस्थेने हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

*** पठ्ठे बापूराव पुरस्कार**

''लोककलावंतांना मुद्राभिनय असतो, गळा असतो; पण त्यांचयकडे शब्द नसतात. अशा कलावंतांना लोकशाही पठ्ठे बापूरावांनी शब्द दिले,'' असे प्रतिपादन खासदार श्रीनिवास पाटील यांनी केले.

पुणे महापालिकेतर्फे 'काळू-बाळू' म्हणून परिचित असलेले ज्येष्ठ तमाशा कलावंत लहू संभाजी खाडे व अंकुश संभाजी खाडे यांना महापौर रजनी त्रिभुवन

यांच्या हस्ते यंदाचा लोकशाहीर पठ्ठे बापूराव पुरस्कार प्रदान करण्यात आला. आमदार उल्हास पवार, डॉ. रामचंद्र देखणे, उपमहापौर नीलेश मगर, स्थायी समितीचे अध्यक्ष रशीद शेख, शिक्षण मंडळ सदस्य रवींद्र माळवदकर उपस्थित होते. पंचवीस हजार रुपयांचा हा असे पुरस्कार आहे.

''लावणी आणि वगनाट्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे,'' असे आमदार उल्हास पवार यांनी सांगितले.

